# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक

# कायदेमंडळ

अधिवेशन नववें

१९४२

# अहवाल

१९४३

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक

# कायदेमंडळ

अधिवेशन नववें

१९४२

# अहवाल

१९४३

# अनुक्रमणिका.

**मंगळवार ता. १८-८-१९४२ इ.**


| विषय | पान |
|---|---|
| १ अधिवेशनाचा कार्यक्रम ... ... ... | १—२ |
| २ कायदेमंडळाच्या सभासदांची यादी ... ... | ३—४ |
| ३ सन्मान्य सभासदांचा शपथविधि ... ... | ५ |
| ४ श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचें भाषण ... | ५-११ |
| ५ मे. रा. ब. अध्यक्ष यांचें भाषण ... .. ... | १२-१३ |
| ६ प्रजापक्षाचे अध्यक्ष श्री. बंगी यांचें पत्र ... ... | १२ |
| ७ स. स. सौ. लक्ष्मीबाई आपटे यांचे प्रश्न, उपप्रश्न व उत्तरें ... | १४-१६ |
| ८ स. स. अप्पाराव शिंदे यांचे प्रश्न उपप्रश्न व उत्तरें ... ... | १६-१८ |
| ९ बजेटकमिटीची निवड ... ... ... | १८-१९ |
| १० ऑडिट कमिटीचा रिपोर्ट व त्याचें वाचन व चर्चा ... | १९-२२ |
| ११ रा. ब. दिवाण यांचें मंडळापुढें राखीव खात्याचें बजेट पुढें मांडणें व त्यावरील भाषण ... ... ... | |
| १२ रा. सा. मंत्री यांचें सोंपीव खात्याचें बजेट पुढें मांडणें व त्यावर भाषण | २२-३० |
| १३ रा. सा. न्यायमंत्री यांचें जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळयाबाबतचा कायदा सन १९३८ चा ४ यांत दुरुस्ती करण्याबाबत बिल व त्याचें पहिलें वाचन ... ... ... | ३०-३७ |
| १४ रा. सा. न्यायमंत्री यांचा क्रिमिनल प्रोसीजर सुधारणेचा इंडिया ॲक्ट नं. १५ सन १९४१ चा जरूर त्या फेरफारांसह लागू करणेचा बिलस्वरूपी ठराव व त्यावरील भाषणें ... ... ... | ३७ |
| १५ स. स. वाटवे यांचा श्रीमंत भाऊसाहेब बावडेकर यांच्या निधनानिमित्त दुखवट्याचा ठराव ... ... ... | ३७ |
| १६ स. स. सौ. लक्ष्मीबाई आपटे यांचा मुलामुलींची प्राथमिक शाळा व इंग्रजी एक ते तीन इयत्तापर्यंतची शाळा दुपारीं भरवणेबाबत ठराव व त्यावरील भाषणें ... ... ... | ३७-३९ |

१७ स. स. आप्पाराव शिंदे यांचा शारदा कायद्यांत जरूर ते फेरफार करून तो कायदा संस्थानांत लागू करणेचा ठराव व त्यावरील भाषणें... ३९–४०

१८ स. स. वाटवे यांचा मंडळाचीं अधिवेशनें निदान दोन वेळा भरविणेचा ठराव व त्यावरील भाषणें ... ... ... ४०–४१

१९ स. स. नवणी यांचा म्युनिसिपॅलिट्यांतून हरिजनांना रिझर्व्ह जागा देणें-बाबत ठराव व भाषणें व ठराव परत घेणें ... ... ४१–४२

२० स. स. चि. वि. आपटे यांचा विणकऱ्यांच्या व्यापारवाढीबाबत समिति नेमण्याबाबत ठराव व त्यांवरीलें भाषणें ... ... ४२–४३

## बुधवार ता. १९–८–४२ इ.

| विषय | पान |
|---|---|
| २१ स. स. वाटवे यांचे प्रश्न, उत्तरें व उपप्रश्न ... ... | ४३–४५ |
| २२ स. स. नवणी यांचे प्रश्न, उत्तरें व उपप्रश्न ... ... | ४५–४६ |
| २३ स. स. चि. वि. आपटे यांचे प्रश्न व उपप्रश्न व उत्तरें ... | ४६–४७ |
| २४ स. स. चौधरी यांचे प्रश्न, उत्तरें व उपप्रश्न ... ... | ४७–४८ |
| २५ स. स. तोटनगौडा पाटील यांचे प्रश्न, व उत्तरें व उपप्रश्न ... | ४८–४९ |
| २६ स. स. वाटवे यांचें बजेटवरील भाषण ... ... | ४९–५६ |
| २७ स. स. सोहोनी यांचें बजेटवरील भाषण ... ... | ५६–५७ |
| २८ रा. ब. दिवाणसाहेब यांचें बजेटावरील उत्तरादाखल भाषण ... | ५७–५८ |
| २९ रा. सा. मंत्री यांचें बजेटावरील उत्तरादाखल भाषण ... | ५८–६० |
| ३० रा. सा. न्यायमंत्री यांच्या सहकारी मंडळाच्या कायद्याच्या दुरुस्ती बाबतच्या बिलाबद्दल चर्चा, दुसरें व तिसरें वाचन... ... | ६० |
| ३१ स. स. सौ. लक्ष्मीबाई आपटे यांचा हायस्कूलच्या विद्यार्थिनींना गृहोपयोगी शिक्षणाची सोय करणेबाबत ठराव व भाषणें व उपसूचना ... | ६०–६२ |
| ३२ स. स. वाटवे यांचा मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना फिजियॉलॅजी व हायजीन शिकवणेंबाबतची सोय करण्याबद्दल ठराव व भाषणें ... | ६३ |
| ३३ स. स. नवणी यांचा मागासलेल्या वर्गाच्या सक्तीच्या शिक्षणाबाबत ठराव व भाषणें व उपसूचना ... ... ... | ६४–६५ |
| ३४ स. स. चि. वि. आपटे यांचा बन्हट्टी येथील इंग्रजी शाळा पूर्ववत् सरकारमार्फत चालूं करणेंबाबत ठराव व भाषणें व ठराव परत घेणें | ६५–६६ |

३५ स. स. चि. वि. आपटे यांचा गरीब लोकांवर फौजदारी काम चालतेवेळीं नेमण्यांत आलेल्या आरोपीच्या वकिलांना मेहेनताना देण्याबाबत ठराव व भाषणें ... ... ... ६६

३६ स. स. सौ. आपटे यांचा प्राथमिक शाळांत सहशिक्षण व स्त्री-शिक्षिका नेमणेंबाबत ठराव व त्यावरील भाषणें ... ... ६६–६७

३७ स. स. वाटवे यांचा मुलींचिकरतां स्वतंत्र A. V. School काढणेंबद्दलचा ठराव व भाषणें ... ... ... ६७–६८

३८ स. स. नवणी यांचा हरिजनांना पाण्याची सोय करणेंबाबत ठराव व भाषणें ६८

३९ स. स. चि. वि. आपटे यांचा सिव्हिकगार्डप्रमाणें इतर संस्थांसहि सरकारी साहाय्य व पाठिंबा मिळणेंबाबत ठराव व भाषणें व उपसूचना ६९

४० स. स. सौ. आपटे यांचा खासगी नोकरींत, कारखान्यांत अगर, दुकानांत १० वर्षांच्या आंतील मुलांना न नेमणेंबाबतचा ठराव व तो परत घेणें ६९–७०

४१ स. स. वाटवे यांचा बालविद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दूर करणेंबाबत ठराव व भाषणें व उपसूचना ... ... ७०–७२

४२ स. स. सौ. आपटे यांचा देवदासीपद्धत बंद करणेंबाबत ठराव व भाषणें ... ... ... ७२–७३


## गुरुवार ता. २०–८–४२


विषय पान

४३ रास्तीव बजेटवर बाबवार चर्चा ... ... ७४–७८

४४ सोंपीव बजेटवर, चर्चा उपसूचना व भाषणें ... ७९–८५


## शुक्रवार ता. २१–८–४२


विषय पान

४५ रा. सा. मंत्री यांच्या पगारवाढीबद्दल चर्चा व भाषणें ... ८६–८८

४६ ऑडिट कमिटीची निवडणूक ... ... ८८–८९

४७ स. स. वाटवे यांचा एस्. पी. कॉलेजमध्यें १०० विद्यार्थ्यांना हाफ्-फ्रीशिप देणेंबाबत ठराव व भाषणें ... ... ८९

४८ स. स. वाटवे यांचा शेतीसुधारणेबाबत योजना आखणेंबाबतचा ठराव व भाषणें ... ... ... ८९–९१

४९ स. स. नवणी यांचा हरिजनांचे बाबतींतील रा. सा. मंत्र्यांचें धोरणाच्या मान्यतेबद्दलचा ठराव व भाषण ... ... ९२–९३
५० स. स. वाटवे यांचा सावळगी, कुंदगोळ व बन्हट्टी येथील पाण्याच्या टंचाईच्या निवारणाबाबत ठराव व भाषणें ... ... ९३
५१ स. स. वाटवे यांचा गांवठाण्यांतील पेवाबाबद ठराव व भाषणें ९३–९४
५२ स. स. वाटवे यांचा संस्थानच्या रस्त्याबाबद योजना आंखणेंबाबत ठराव व भाषणें ... ... ... ९४–९६
५३ स. स. वाटवे यांचा दारूशिंदीचीं दुकानें गांवाबाहेर नेण्याबाबत ठराव व भाषणें ... ... ... ९६
५४ मे. अध्यक्ष, स. स. सोहनी, व रा. सा. सर न्यायाधीश यांचीं समारोपाचीं व आभारप्रदर्शनाचीं भाषणें ... ... ९६–१००
५५ परिशिष्ट १ दफ्तरी हुकूम ... ... १०१–१०३

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ

## अधिवेशन ९ वें.

ता. १८, १९, २० व २१ माहे ऑगस्ट सन १९४२ इसवी.

## कार्यक्रम

**मंगळवार तारीख १८।८।१९४२ इसवी.**

| | | |
|---|---|---|
| सकाळीं | ९। | सन्मान्य सभासदांचा शपथविधि. |
| „ | ९॥ ते १० | श्रीमंत राजासाहेब यांचें भाषण. |
| दुपारीं | १ ते १॥ | मे. अध्यक्ष यांचें प्रास्ताविक भाषण व प्रश्न. |
| „ | १॥ ते १॥। | बजेट कमिटीची निवडणूक. |
| „ | १॥। ते २॥ | मे. फिनॅन्स मेंबर यांनीं मंडळापुढें राखीव खात्याचें बजेट मांडणें व जरूर तर भाषण करणें व रा. सा. सोंपीव खात्याचे मंत्री यांनीं मंडळापुढें सोंपीव खात्याचें बजेट मांडणें व जरूर तर भाषण करणें. |
| „ | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| „ | ३॥ ते ४। | सरकारी ( बिलें व ठराव. )<br>बिल:—१ रा. सा. न्यायमंत्री यांचें बिल.<br>जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळयाबाबतचा कायदा सन १९३८ चा ४ यांत दुरुस्ती करण्याबाबत बिल. |
| „ | ४। ते ५॥ | बिन सरकारी ठराव. |

## बुधवार तारीख १९।८।१९४२ इसवी.

| | | |
|---|---|---|
| दुपारीं | १२ ते १२॥ | प्रश्न. |
| ,, | १२॥ ते २॥ | बजेटावर सर्वसाधारण चर्चा व मे. फिनॅन्स मेंबर व रा. सा. मंत्री ( सोंपीव खातीं ) यांचें उत्तर. |
| ,, | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| ,, | ३॥ ते ४ | सरकारी काम ( बिलें व ठराव. ) |
| ,, | ४ ते ५॥ | बिनसरकारी ठराव. |

## गुरुवार तारीख २०।८।१९४२ इसवी.

| | | |
|---|---|---|
| सकाळीं | ९ ते ९॥ | प्रश्न. |
| ,, | ९॥ ते ११॥ | राखीव व सोंपीव बजेटमधील बाबींची चर्चा. |

## शुक्रवार तारीख २१।८।१९४२ इसवी.

| | | |
|---|---|---|
| दुपारीं | १२॥ ते १ | प्रश्न. |
| ,, | १ ते २॥ | सोंपीव बजेटमधलि बाबींची चर्चा व ऑडिट कमिटीची निवडणूक. |
| ,, | २॥ ते ३॥ | सुट्टी. |
| ,, | ३॥ ते ४॥ | बिनसरकारी ठराव. |
| ,, | ४॥ ते ५ | समारोप. |

ता. क.:—कार्यक्रमांत व कार्यक्रमाचे वेळेंत जरूर पडल्यास मे० रावबहादुर अध्यक्ष-साहेब यांच्या हुकुमानें फेरफार करण्यांत येईल.

तारीख १०।८।४२ इसवी }

**W. T. Apte,**
सेक्रेटरी, ज. सं. प्रां. का. मंडळ.

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या सभासदांची यादी सन १९४२ इसवी.

## सरकारनियुक्त अधिकारी

१ मे. रावबहादुर रामचंद्र केशव भागवत, दिवाण, जमखंडी (अध्यक्ष)

२ रावसाहेब भास्कर बहिरव महाबळ, बी. ए., एलूएलू. बी. न्यायमंत्री.

३ रावसाहेब भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, एम्. ए., एलूएलू. बी. सरन्यायाधीश व हुजुर ट्रेझरी ऑफिसर, जमखंडी.

४ रावसाहेब रामचंद्र गोविंद पुराणिक, B. E. (Civil), स्टेट एंजिनीयर.

५ रावसाहेब अप्पासाहेब मुरारराव घोरपडे, स्टेट मेकॅनिकल एंजिनीयर.

६ रावसाहेब विनायक गंगाधर गोखले, खाजगी मेकॅनिकल एंजिनीयर.

## सरकारनियुक्त बिन्न अधिकारी

७ रावबहादुर माधव नारायण हुल्याळ, बी. ए., रिटायर्ड डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर

८ रावसाहेब हरि चिंतामण पटवर्धन, बी.ए., पेन्शनर रेव्हेन्यू ऑफिसर, जमखंडी

९ स. स. वीरभद्राप्पा मल्लाप्पा देशपांडे, जमेदार कुदंगोळ

१० स. स. वेंकटेश श्रीनिवास आनिखिंडी, जमखंडी.

११ स. स. रुकनोद्दीनसाहेब शिराजसाहेब काजी, जमखंडी

१२ स. स. चिदंबर विनायक आपटे, बी.ए., एलूएलू. बी. वकील, जमखंडी.

### लोकनियुक्त समासद्

### जमखंडी ग्रामिक दक्षिण भाग संघ

१३ स. स. गिरमल्लप्पा आल्लाप्पा होसूर.

१४ स. स. पावाड्याप्पा मल्लप्पा बंगी.

१५ स. स. गजानन कृष्ण गाडगीळ.

### जमखंडी ग्रामिक उत्तर भागसंघ

१६ स. स. कृष्णाप्पा तिमाप्पा होसूर.

१७ स. स. राचाप्पा चनबसप्पा अनंतपूर.

### कुंदगोळ तालुका ग्रामिकसंघ

१८ स. स. फकीरप्पा रामप्पा रायर.

१९ स. स. तोटनगौडा गोविंदगौडा पाटील.

२० स. स. कल्लनगौडा इरननौडा पाटील.

### ठाणे वाठार ग्रामिक

२१ स. स. भार्गव दत्तात्रय सोहनी.

### ठाणे पाटखळ ग्रामिक

२२ स. स. अच्युत श्रीरंग पाटील.

### जमखंडी नागर संघ

२३ स. स. पांडुरंग बळवंत वाटवे.

२४ स. स. आडवय्या दुंडय्या मुधोळ.

### हुन्नूर व रामतीर्थ नागरसंघ

२५ स. स. सिवलिंगप्पा सिद्रामप्पा सावळगी

### बनहट्टी नागरसंघ

२६ स. स. सिद्रामप्पा गिरमल्लप्पा चरकी.

### कुंदगोळ नागरसंघ

२७ स. स. बिष्टो गणेश होर्ती.

### सांवशी व कमडोळी नागरसंघ

२८ स. स. पंचाप्पा बसलिंगप्पा कोरी.

### संयुक्त मतदारसंघ मराठा

२९ स. स. आप्पाराव परशुराम शिंदे.

### मुसलमान संघ

३० स.स. नबीसाहेब फकरोद्दीनसाहेब चौधरी

### जमखंडी संस्थान शैक्षणिक विशेष

३१ स. स. व्यंकटेश राजाराम वेवघर, मंत्री
(सोंपीव खातीं)

### जमखंडी संस्थान व्यापार विशेष

३२ स. स. तिलोकचंद केसरचंद लाहोटी.

### जमखंडी संस्थान तैनातदारसंघ विशेष

३३ स. स. त्रिंबक रामचंद्र साठये.

### जमखंडी संस्थान विणकर विशेष

३४ सं. स. पराप्पा रुद्राप्पा मंडी.

### जमखंडी संस्थान हरिजन विशेष

३५ स. स. विठ्ठल रामचंद्र महार.

### जमखंडी संस्थान स्त्री विशेष

३६ स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णुपंत आपटे.

# जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ

## मंगळवार, ता. १८।८।४२ इ.

### दिवस पहिला

**सकाळीं ९। वाजतां**

आगाऊ जाहीर झाल्याप्रमाणें ता. १८-८-४२ रोजीं जमखंडी येथील परशुरामभाऊ हायस्कूलच्या असेंब्ली हॉलमध्यें जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या नवव्या अधिवेशनास सुरुवात झाली. सकाळीं ९। वाजतां कायदेमंडळाचे सभासद सभागृहांत आल्यावर रावसाहेब भाऊराव आपटे, न्यायाधीश व स. स. कृष्णा गंगाराम शिवपूजे या नवीन सभासदांचा शपथविधि अध्यक्षांचेपुढें झाला. अधिवेशनापुरते अध्यक्ष म्हणून, संस्थानचे माजी दिवाण व मंडळाचे गेलीं आठ वर्षें अध्यक्ष असलेले रा. ब. आर. के. बाळ यांचीच योजना करण्यांत आली होती. त्यांचा शपथविधि अगोदर ९ वाजतां कायदेमंडळाचे कायमचे अध्यक्ष रा. ब. दिवाणसाहेब यांचेपुढें झाला होता. नंतर ९॥ वाजतां श्रीमंत राजेसाहेब हे अधिवेशनाचे जागीं अश्वरथांतून दरबारी पोषाकांत प्रायव्हेट सेक्रेटरीसह हजर झाले. त्यावेळीं असेंब्लीच्या हॉलपाशीं त्यांना गार्ड ऑफ आनर्सची सलामी झाली. व मेहेरबान रा. ब. अध्यक्ष व रा. ब. दिवाण यांनीं श्रीमंत राजेसाहेब यांचें स्वागत केल्यावर खास तयार केलेल्या उच्चासनावर श्रीमंत राजेसाहेब आरूढ झाले. सर्व सभासदांनीं उत्थापन देऊन श्रीमंतांना अभिवादन केल्यावर श्रीमंत राजेसाहेब यांनीं मंडळाला उद्देशून खालील प्रकारचें भाषण केलें.

## श्रीमंत राजेसाहेब यांचें भाषण

कायदेमंडळाचे सन्मान्य अध्यक्ष व सन्मान्य सभासदहो,

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या नवव्या व द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम सुरू झाल्यानंतरच्या दुसऱ्या अधिवेशनाकरितां आमच्या संस्थानच्या निरनिराळ्या भागांतून आपण या ठिकाणीं जमलां आहांत. या प्रसंगीं आपणां सर्वांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करणेस आम्हांस आनंद होत आहे.

अशा प्रसंगीं आमचें पहिलें कर्तव्य म्हणजे मालिक–मा–आझम, कैसर–ई–हिंद बादशहा सहावे जॉर्ज यांचे व्यक्तीबद्दल आणि गादीबद्दल आमची राजनिष्ठा व्यक्त करणें हें होय. आणि हें कर्तव्य बजावण्यास आम्हांस आनंद व अभिमान वाटतो.

तसेंच साम्राज्य सरकारशीं व इतर संस्थानिक बंधूंशीं आमचे संबंध प्रेमाचे व सलोख्याचे आहेत, हें सांगणेस आम्हांस संतोष वाटत आहे.

आपणांस माहीत आहेच कीं, नुकतेंच गेल्या जून महिन्याच्या तेरा तारखेस आमचे मेहुणे श्रीमंत भाऊसाहेब पंत अमात्य हुकमत् पन्हां चीफसाहेब ऑफ बावडा यांचेवर काळाची झडप पडली. या दुर्दैवी घटनेमुळें एकाएकीं कशी हानि झाली आहे याबद्दल आमचे परवांचे राज्यारोहण वाढदिवसाचे दरबारचे वेळीं आम्हीं दिग्दर्शन केलें आहेच. अगदीं जवळच्या आणि अत्यंत जिव्हाळ्याच्या आप्तसंबंधामुळें आम्हां सर्वांना या दैवी आघातानें फार दुःख झालें. त्यांतल्या त्यांत आमच्या सौभाग्यवती राणीसाहेब यांना तर त्यामुळें फारच दुःख झालें आहे. पण पुढील कर्तव्याच्या दृष्टीनें पुन्हां मनाची समजूत घालून विवेकानें, शोक आंवरून धरावाच लागतो हें ध्यानीं घेऊन त्यांनीं व कैलासवासी श्रीमंत भाऊसाहेब यांचे कुटुंबीयांनीं कर्तव्य म्हणून आपला दुःखावेग कमी करावा असें आमचें त्यांना आग्रहाचें व प्रेमाचें सांगणें आहे.

सांप्रत चालू असलेलें महायुद्ध दिवसेंदिवस अधिकच भीषण होत चाललें असल्याचें आपणा सर्वांचे माहितींत असेलच. साम्राज्य सरकारनें लहान लहान राष्ट्रांचे संरक्षणासाठीं म्हणून यांत उडी घेतली आहे पण एकंदरीनें सध्यां दोस्त राष्ट्रांचे बाजूवर मोठा बांका प्रसंग येऊन बेतला आहे असें दिसत आहे; म्हणून अशा वेळीं निराश होऊन हातपाय गाळणें हें केव्हांहि शहाणपणाचें ठरणार नाहीं. उलटपक्षीं अशा वेळीं अधिक धिमेपणानें तोंड देणें जरूर असतें. महायुद्धाची सध्याची परिस्थिति लक्षांत घेतां असेंच म्हणावें लागेल कीं, यावेळीं साम्राज्य सरकारांस सर्व प्रकारच्या मदतीची अत्यंत उत्कटतेनें जरूरी आहे. द्रव्यबळ, मनुष्यबळ आणि यांत्रिक सहाय्य किती मिळेल तेवढें हवेंच आहे. आणि आम्हांस सांगण्यास आनंद वाटतो कीं, हल्लींच्या अतिशय महागाईच्या कालांतही साहजिकच खर्चाचें मान वाढणारें असून देखील, जमखंडी संस्थानकडून देणेची युद्धाची मदत यथाशक्ति संस्थानचे लौकिकास अनुसरून चालूच आहे. आमचे प्रजाजनांनींहि वेळ ओळखून युद्धास सर्व बाजूंनीं सहाय्य करण्याचे कामीं आपली शिकस्त करावी असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे.

आपणांस ठाऊक असेलच कीं, नुकतेच आम्हीं युद्धामुळें ओढवलेली सध्यांची महर्गता लक्षांत घेऊन आमच्या नोकरांना महागाई भत्ता देणेचें ठरविलेबद्दल आमचें परवांचे राज्यारोहण–वाढदिवसाचे दरबारचे वेळीं जाहीर केलें व आतां त्याप्रमाणें अम्मलही चालू झाला आहे. अर्थातच महागाईची बाधा कमी पगाराचे नोकरांनाच विशेष जाणवणारी असल्यानें महागाई-भत्ता अशा कमी पगाराचे नोकरांनाच देणेंत आलेला आहे. तरी देखील सालिना, सुमारें बारा हजारांपर्यंत खर्च जादा येणार आहे. आधींच भारावलेल्या संस्थानच्या तिजोरीवर यामुळें अधिकच ताण पडणार आहे हें उघड आहे. यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, एकादी गोष्ट परिस्थितीमुळें अगदीं जरूरच अशी ठरल्यावर मग त्याबद्दल आम्ही कधींच जिकीर करीत नाहीं. एवढेंच नव्हे तर, या बाबतींत आमचे नोकरवर्गाकडून मागणी येण्याचे अगोदरच आम्हीं महागाई-भत्ता जाहीर केला आहे. यावरून आपल्या हें ध्यानीं येईलच कीं, जी गोष्ट करणें जरूर असतें अशा बाबतींत आम्ही आपण होऊनच, एक पाऊल आधींच पुढें टाकीत असतों.

राज्यकारभाराचे बाबतींतही आमचें अंतिम ध्येय, संस्थानाधिपतीचे आधिपत्याखालीं पूर्ण जबाबदार राज्यपद्धति असेंच असल्याचें आम्हीं यापूर्वींच वेळोवेळीं बोलून दाखविलें आहे. त्यास अनुसरून आणि आमच्या प्रजेच्या वाढत्या आकांक्षा ध्यानीं घेऊन आम्ही गेले वर्षी द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम सुरू केला आणि आमच्या प्रजेला प्रत्यक्ष राज्यकारभाराची संधि देण्याचे दृष्टीनें सोंपीव खात्याचे मंत्र्याचे जागीं लोकनियुक्त अशा सभासदाची नेमणूक केली. आमचे सोंपीव खात्याचे प्रथमचे मंत्री, रावसाहेब देवधर यांना हा प्रसंग नवीनच असल्यामुळें, त्यांचेकडे सोंपवलेल्या वेगवेगळया खात्यांबद्दल माहिती घेण्यांत त्यांना आपला बराच वेळ खर्च करावा लागला असेल. त्याचा फायदा यानंतर लवकरच त्यांचेकडील खात्यांना मिळूं लागेल, अशी अपेक्षा करणेस हरकत नाहीं. बाहेर राहून नुसत्या तर्कानें समजतील त्यापेक्षां पुष्कळच नवीन गोष्टी आणि अडचणी राज्यकारभाराचीं खातीं, प्रत्यक्षपणें चालवितांना कशा येतात, याचा बराच अनुभव रावसाहेब देवधर यांना आला असेलच. आमच्या कायदेमंडळाचें अधिवेशन प्रतिवर्षी भरविण्यांत एक उद्देश असा असतोच कीं, राज्यकारभाराच्या विविध बाबींबद्दल विचार करून त्याबद्दलची माहिती मिळविण्याची संधि आमच्या प्रजेला प्राप्त व्हावी आणि म्हणून या दृष्टीनें उपयुक्त चर्चा या अधिवेशनाचे वेळीं होणें जरूर असतें. अशा दृष्टीनें आमचे मंत्री रावसाहेब देवधर यांनाही आपल्या एक वर्षाच्या अनुभवानंतर आतां या अधिवेशनाचे समयीं आपल्या हाताखालील खात्यांचे बाबतींत बरीच नवीन माहिती सांगण्याची संधि मिळेल अशी आपणां सर्वांची अपेक्षा आणि उमेद, साहजिकपणें असणारच.

मंत्रिपदावर असणाऱ्या लोकनियुक्त अशा व्यक्तीचे दृष्टीनेंही प्रतिवर्षीचें अधिवेशन ही एक मोठी संधिच ठरते. आपला वर्षभराचा अनुभव आणि केलेली कामगिरी अभिमानानें बोलून दाखविण्याचा आणि प्रजेनें मंडळावर निवडून देण्यांत व्यक्त केलेला आपल्याबद्दलचा विश्वास अस्थानीं कसा नाहीं, हें विशद करून लोकप्रियता संपादण्याचा एक सुसमयच अशा हेतूनें आमचे मंत्री रावसाहेब देवधर हे या अधिवेशनाकडे पाहात असतील यांत नवल नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या मंत्र्याचे अनुभव आणि उत्तरें योग्य कसोटीनें या अधिवेशनाचे वेळीं ऐकावयास मिळतील अशी प्रजाजनांचीही अपेक्षा असणारच. एकंदरीनें यंदांचे अधिवेशनांत प्रश्नोत्तरांना आणि चर्चेला एक वेगळी पण पथ्यकर अशी दिशा लागेल असा भरंवसा वाटत होता. पण आतां या अधिवेशनास उपस्थित न राहणाऱ्या एका विशिष्ट पक्षाचे सभासदांवरून पाहतां, अधिवेशनाचा प्रमुख उद्देश जी साधकबाधक आणि सोपपत्तिक चर्चा प्रतिपाद्य विषयांवर सर्व दृष्टीनें व विविध मतांचे अनुरोधानें व्हावयाची, त्याचा बराच विरस होणार याबद्दल आम्हांस खेद वाटतो. व्यक्तिशः आमची अशी समजूत आहे कीं, कोणत्याही बाबतींत असहकारापेक्षां सनदशीर आणि सहकार्याचे मार्गानेंच अधिक फायदा मिळूं शकतो. आजच्या प्रसंगीं गैरहजर राहणाऱ्या सन्मान्य सभासदांनीं या अधिवेशनांत भाग न घेणेचा निर्णय घेऊन जी अनुपस्थिति दर्शविली त्याऐवजीं हजर राहूनच त्यांनीं आपल्या अडचणी मांडल्या असत्या तर आम्हांस अधिक आनंद वाटला असता. असा निर्णय घेण्याचीं म्हणून जीं कारणें त्यांचेकडून पुढें आलेलीं आहेत तीं आम्हांस समर्पक वाटत नाहींत.

आम्हांस पुन्हां सांगावें लागत आहे कीं, राज्यकारभाराच्या अधिकारदानाची ही गोष्ट अतिशय जबाबदारीची तशीच सूक्ष्म आहे. केवळ एकानें उचलून दुसऱ्याचे स्वाधीन करावी एवढी सुलभ आणि सुकर ती होऊं शकत नाहीं. अशा गोष्टी दमानेंच घ्याव्या लागतात. फक्त एका बाजूचाच विचार करून थांत निभावत नाहीं. विषय निःसंशय महत्त्वाचा आणि नाजूक आहे. त्यामुळें उभयपक्षीं सहकार्य साधून, कौशल्यानें आणि कर्तबगारीनें विश्वास संपादन करणें जरूर ठरतें. अशा दृष्टीनें पाहतां आज गैरहजर असलेल्या या मंडळाच्या विशिष्ट सभासदांचेकडून घेणेंत आलेला हा चमत्कारिक निर्णय आम्हांस बरा वाटला नाहीं. या निर्णयाचीं म्हणून जीं कारणें आणि संगति त्यांचेकडून देणेंत आलेली आहे त्याला वस्तुस्थिति निदर्शक आणि खुलासेवार उत्तर दरबारचे माहिती खात्यातर्फे एक प्रसिद्धीपत्रक काढून देणेंत आलेलें आहे. तें आपणां सर्वांचे पाहण्यांत आलें असेलच. म्हणून या बाबतींत आम्ही अधिक विवेचन करणेची आवश्यकता नाहीं. या बाबतींत आम्हांस एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं, एकाहून अधिक व्यक्तींनीं मिळून जेथें कार्य करावयाचें असतें, अशा ठिकाणीं मतभेद हा साहजिकपणें असणारच आणि तो असावाही. कारण केवळ अंधानुकरण ही कांहीं अभिमानाची गोष्ट ठरणार नाहीं. पण प्रामाणिक मतभेदाची जागा दूषित ग्रहाला घेऊं दिल्यास समन्वयाचा मार्ग सांपडणारच नाहीं. आणि कोणतेंही मंडळ किंवा समिती यांचें कार्य योग्य मार्गानें चालण्यास समन्वयाची अत्यंत जरूरी असते. तरी या विशिष्ट सभासदांना आम्ही एवढेंच सांगूं इच्छितों कीं, त्यांनीं कार्याचें स्वरूप ओळखून समतोल बुद्धीनें वागावें आणि असे घाईघाईनें निर्णय घेऊन कार्यहानीस कारण होऊं नये. लौकरच त्यांचे मतांस योग्य परिवर्तन मिळेल व मंडळाचें कार्य सुरळीत व सर्वांचे सहकार्यानें चालून इष्ट ध्येयाकडे आपलें एकेक पाऊल पुढें पडेल अशी आमची मनापासूनची इच्छा आहे.

आपणास ऐकून माहित झालें असेलच कीं सध्यां आपल्या राजकारणाच्या दृष्टीनें एक अनिष्ट अशी आपत्ति येऊं पाहात आहे. तथापि या बाबतींत समाधानाची व अभिमानाची गोष्ट अशी आहे कीं, आमच्या संस्थानचा आजवरचा इतिहास व आमचा स्वतःचाही या बाबतींत अनुभव पाहतां, आमचे प्रजाजन आणि त्यांचे पुढारी यांनीं अशा अनिष्ट गोष्टीचें अवास्तव स्तोम माजवून, राज्यकारभाराच्या दृष्टीनें विघातक आणि आम्हांस मनापासून अप्रिय असा प्रसंग आम्हांवर कधींच येऊं दिलेला नाहीं, हें सांगणेंस आम्हांस संतोष वाटतो. या बाबतींत संस्थानांची परिस्थिति फार नाजूक आणि जबाबदारीची असते. तरी या वेळीं आमचे प्रजाजन आणि त्यांचे पुढारी यांनीं आपल्या आजवरच्या लौकिकास अनुसरून, बुद्धि स्थिर ठेवून विचारानें वागावें आणि आपल्या अनुयायांना योग्य असा शांततेचा मार्ग दाखवून या आपत्तीमुळें ओढवणाऱ्या बहुजनसमाजावरील संकटाचें मुळांतच निराकरण करावें व निष्कारण आमचेवर आह्मांस अंतःकरणपूर्वक नको असलेले हुकूम काढण्याचा व कडक उपाययोजनेचा कटु प्रसंग आणूं नये असें आमचें त्यांना अत्यंत कळकळीचें व आग्रहाचें सांगणें आहे व त्याप्रमाणें आम्हांस प्रजेकडून सहकार्य मिळेल असा आम्हांस विश्वास वाटतो.

मंडळाच्या गेल्या अधिवेशनांत जे ठराव आणि जीं बिलें मंडळाकडून मंजूर करण्यांत आलीं त्यांतील बहुतेक सर्व आम्हीं मान्य केलीं आहेत व त्यांचे अम्मलबजावणीसाठीं जरूर ते हुकूमही दिलेले आहेत आणि मंडळानें मंजूर केलेले ठराव, विशेष कारणाखेरीज, बहुतेक मान्य करण्याचें आमचें धोरण प्रथमपासूनच असल्याचें आजपर्यंतच्या अधिवेशनांच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालावरून आपणां सर्वांचे निदर्शनांस आलें आहेच.

संस्थान मजकुराचे गेल्या सालचे पिकावरून पाहतां सामान्यतः रयतवर्गाची स्थिति समाधानकारक होती असें म्हणण्यास हरकत नाहीं तथापि जमखंडी तालुक्यांत व पाटखळ ठाण्यांत कांहीं ठिकाणीं जमीनमहसुलाची निम्मी तहकुबी देणेंत आलेली आहे. कुंदगोळ तालुक्यांतील पिकें प्रथमपासून चांगलीं होतीं पण अगदीं अखेरचे दिवसांत कांहीं ठिकाणीं पाऊस होऊन पिकांची थोडीफार नुकसानीही झाली–अशी नुकसानी झालेल्यांना योग्य प्रमाणांत जमीनमहसुलाची सूट इकडून देणेंत आलेलीच आहे. वाठार ठाण्यांतील पिकांची स्थिति समाधानकारक होती. एकंदरीनें गेलें साल पीकपाण्याचे दृष्टीनें सामान्यतः समाधानकारक गेलें, तथापि युद्धजन्य महागाईमुळें आणखी बऱ्याच सवलती आम्हीं जरूरीप्रमाणें दिल्या आहेतच.

आज दुपारीं आमचे फडणीस रावबहादूर भागवत हे पुढील वर्षाबद्दलचें राखीव खात्याचें बजेट आपणांपुढें मांडतील व आमचे मंत्री रावसाहेब देवधर हे आपणांपुढें सोंपीव खात्यांचें बजेट मांडतील. हल्लीं शक्य तों काटकसर करण्याची दृष्टि ठेवूनच अंदाजी बजेट करणेंत येत असतें त्यामुळें या वर्षींचे अंदाजी बजेटांत थोडीफार शिल्लक दाखवतां येईल अशी अपेक्षा होती. पण महायुद्धामुळें दिवसेंदिवस महर्गता फारच वाढूं लागली. त्यामुळें आम्हीं आतांच सांगितल्याप्रमाणें संस्थानांतील कमी पगाराचे नोकरांचे बाबतींत कांहीं अंशानें कां होईना, वाढ करणें अपरिहार्य झालें व खर्चाच्या इतर बाबींकडे या महर्गतेमुळें मालाच्या किंमती मर्यादेबाहेर वाढल्यामुळें जास्त रकम धरणें भाग पडलें आहे, अशा कारणामुळें कांहीं विशेष शिलकेचें बजेट होणेंचें तें न जमून, जरी प्रत्यक्ष तुटीचें नाहीं तरी थोडेंफार तोंडमिळवणीवजा असेंच बजेट आपणांपुढें मांडावें लागत आहे.

त्यांत खास खात्यांचा म्हणून जो भाग २ (अ) आहे त्यावरून पाहतां आपल्या ध्यानीं येईल कीं, अशी बेसुमार महागाई असून देखील खासगी व इतमामबद्दल घेणेच्या म्हणून पूर्वींच गेल्या बजेटचे वेळीं ठरविल्याप्रमाणेंच रकमा पुढील वर्षाबद्दलही घेणेचें आम्हीं मंजूर केलेंच आहे. त्यांत बिलकूल वाढ केलेली नाहीं.

हें काटकसरीचें धोरण सामान्यपणें बजेटच्या इतर खात्यांचे बाबतींतही ठेवूनसुद्धां कांहीं कांहीं ठिकाणीं खर्चाच्या रकमा वाढवून देणें जरूर झालें आहे. तथापि अशाही परिस्थितींत कोणताही नवीन कर वगैरे न बसवितां विशेष शिलकेचें जरी नाहीं तरी चालू सालचें बजेट तुटीचें खास नाहीं, ही मोठी समाधानाची गोष्ट होय.

अधिवेशनांत राखीव खात्याचे बजेटवर कायद्याप्रमाणें पाहतां आपण केवळ चर्चाच करणेची आहे. तरी देखील आपणांकडून योग्य सूचना जरूर करणेंत याव्या, असें आमचें सांगणें आहे. योग्य सूचनांचा अनादर केव्हांही होणार नाहीं.

सोंपीव खात्याचें बजेट, कायद्याचे निर्बंध संभाळून आपणच मंजूर करणेचें आहे. या कामीं राज्यकारभार आणि प्रजाहित या दोन्ही गोष्टी साधण्याची दृष्टि ठेवून आणि अकारण मतभेद विसरून त्या खात्याचें बजेट मंडळाकडून पास करून घेण्याचे कामीं आपण आपल्या मंत्र्यांना मदत करावी अशी आमची सूचना आहे.

आमच्या अधिकारी वर्गानेंहि प्रामाणिकपणानें, सलोख्यानें व सहकार्यानें वागून प्रजाजनांकडून धन्यवाद मिळवावे आणि रावसाहेब मंत्री यांचे कारभारास मदत करावी असें त्यांना आग्रहाचें सांगणें आहे.

आम्हीं नुकतेंच सांगितलें कीं, या अधिवेशनांत लोकनियुक्त गटांतील एका विशिष्ट पक्षाच्या सभासदांचे गैरहजेरीमुळें एक प्रकारें उणीव भासत आहे. तद्वतच, आम्ही असा निर्देश करूं इच्छितों कीं, या अधिवेशनांत सरकारी सभासदांचे बाजूलाहि एका विशिष्ट व्यक्तींची गैरहजेरी भासून येणार आहे. ती व्यक्ति म्हणजे या मंडळाचे पहिले सात वर्षांतील उपाध्यक्ष व संस्थानचे न्यायमंत्री रावसाहेब महाबळ हीं होय. रावसाहेब महाबळ यांनीं या मंडळाची प्रथमची व हल्लींची घटना तयार करण्यापासून सर्व कार्यांत प्रामुख्यानें भाग घेतलेला होता आणि अधिवेशनाचे वेळींहि ते आपलें काम उत्साहानें व नेकीनें करीत असत. मंडळाचे कामकाजांत व अधिवेशनाचे वेळीं दरबारची बाजू समर्पकपणें व यशस्वी रीतीनें मांडणेची त्यांची पद्धति प्रशंसनीय असे. हल्लीं ते पक्षाघातामुळें आजारी असल्यानें या अधिवेशनाचे कामांत भाग घेण्यास हजर नाहींत. तथापि लौकरच त्यांची प्रकृति पूर्ण बरी होऊन त्यांची पुढील अधिवेशनाचे वेळीं तरी मदत होईल असें आम्ही इच्छितों. त्यांचे जागीं या अधिवेशनासाठीं आम्ही आमचे अधिकारी रावसाहेब आपटे न्यायाधीश यांची नेमणूक केली आहे. ते या मंडळाचे आजवरचे सेक्रेटरी आहेत म्हणून त्यांना हें काम पूर्ण परिचयाचेंच आहे. ते आपली कामगिरी रावसाहेब महाबळ यांचे इतपत जरी एकदम नाहीं तरी बरीच समाधानकारकपणें करूं शकतील असा आम्हांस भरंवसा आहे.

सन्मान्य अध्यक्ष व सन्मान्य सभासदहो, वेळ बराच झाला असला तरी, आणखी एका गोष्टीचा निर्देश यावेळीं करणें आम्हांस जरूर वाटतें. ती म्हणजे या अधिवेशनाचे अध्यक्ष रावबहादुर रामचंद्र केशव बाळ यांनीं यावर्षींहि या अधिवेशनाचें अध्यक्षपद स्वीकारणेबद्दलच्या आमच्या विनंतीस मान दिला ही होय. अशा उतार वयांत त्यांना या कामामुळें ताप वाटणें साहजिकच आहे. तथापि या मंडळाच्या अगदीं घटनेपासून व पहिले अधिवेशनाच्या वेळेपासून अध्यक्ष नात्यानें राहून त्यांनीं जी कामगिरी केली व प्रजेकडून नांव आणि प्रेम संपादन केलें, त्यामुळेंच त्यांना पुन्हां पुन्हां या कामासाठीं हक्कानें बोलावण्याकडे

आमची प्रवृत्ति होते, हें खरें असलें तरी आपल्या सर्व अडचणी बाजूस ठेवून दगदग सोसून हें काम पत्करण्याबद्दलच्या आमच्या इच्छेस त्यांनीं मान दिला याबद्दल आम्हांस संतोष वाटत असून त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. आणि यांत आपणा सर्वांचें पूर्ण सहमत आहेच, अशी आमची खात्री आहे.

आतां आपलें हें अधिवेशन यशस्वी रीतीनें पार पडून उभयपक्षीं भूषणावह आणि कीर्तिप्रद असेंच होवो, अशी श्रीकुलदेवतांचे चरणीं अनन्यभावें प्रार्थना करून आणि आमचे हे चार शब्द आपण शांत चित्तानें ऐकून घेतल्याबद्दल आपणां सर्वांचे आभार मानून व पुन्हां एकवार, आपणां सर्वांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करून आम्ही आपली रजा घेतों.

याप्रमाणें श्रीमंत राजेसाहेबांचें भाषण झाल्यावर सकाळचा कार्यक्रम समाप्त झाला.

## दुपारची बैठक

दुपारीं एक वाजतां अधिवेशनाच्या कामास सुरुवात झाली. त्यावेळीं मंडळाचे पुढील प्रमाणें एकोणीस सभासद हजर होते.

## सरकारनियुक्त अधिकारी

( १ ) मे. रावबहाद्दुर रामचंद्र केशव भागवत, दिवाण जमखंडी ( अध्यक्ष ).

( २ ) रावसाहेब भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, एम्. ए., एल्एल्. बी., सरन्यायाधीश व हुजूर ट्रेझरी ऑफिसर, जमखंडी.

( ३ ) रावसाहेब वामन त्रिंबक आपटे, एम्. ए., एल्एल्. बी., न्यायाधीश.

( ४ ) रावसाहेब रामचंद्र गोविंद पुराणीक, बी. ई. ( सिव्हिल ), स्टेट इंजिनिअर.

( ५ ) रावसाहेब अप्पासाहेब मुरारराव घोरपडे, स्टेट मेकॅनिकल इंजिनियर.

( ६ ) रावसाहेब विनायक गंगाधर गोखले, खासगी मेकॅनिकल एंजिनियर.

## सरकार-नियुक्त बिन्न अधिकारी

( ७ ) रावबहाद्दुर माधव नारायण हुल्याळ, बी. ए. रिटायर्ड डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर.

( ८ ) रावसाहेब हरि चिंतामण पटवर्धन, बी. ए., पेन्शनर, माजी रेव्हिन्यू ऑफिसर, जमखंडी.

( ९ ) स. स. वेंकटेश श्रीनिवास अनिखिंडी, जमखंडी.

( १० ) स. स. रुकनोद्दिन साहेब शिराजसाहेब काजी, जमखंडी.

( ११ ) स. स. चिदंबर विनायक आपटे, बी. ए. एल्एल्. बी., वकील, जमखंडी.

## लोकनियुक्त सभासद

( १२ ) स. स. भार्गव दत्तात्रय सोहनी,
( १३ ) स. स. कृष्णा गंगाराम शिवपूजे,
( १४ ) स. स. पांडूरंग बळवंत वाटवे,
( १५ ) स. स. अप्पाराव परशुराम शिंदे,
( १६ ) स. स. नबीसाहेब फक्रोद्दिनसाहेब चौधरी,
( १७ ) स. स. व्यंकटेश राजाराम देवधर, मंत्री ( सोपीव खातीं )
( १८ ) स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी,
( १९ ) स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णुपंत आपटे.

प्रथमतः मे. अध्यक्ष रा. ब. बाळ यांनीं सभासदांचें स्वागत करतांना पुढील प्रमाण भाषण केलें.

## मे. अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण

" आज भाषणास सुरुवात करण्यापूर्वी येथील प्रजापरिषदेचे अध्यक्ष श्री. बंगी यांनीं पत्र पाठविलें आहे तें आपणांस सेक्रेटरी वाचून दाखवितील.

[ सेक्रेटरी पत्र वाचतात ]

रावबहादुर प्रेसिडेंट प्रातिनिधिक कायदेमंडळ यांसी—

रा. प्रजापक्षनेता पा. म. बंगी याची विनंति असे.

उद्यांपासून जमखंडी संस्थान प्रा. का. मंडळाचे अधिवेशनास प्रारंभ होणार आहे. प्रा. का. मंडळांतील प्रजापक्ष हा जमखंडी संस्थान प्रजापरिषदेतर्फे निवडून आलेल्या सभासदांचा पक्ष आहे. जमखंडी संस्थान प्रजापरिषदेच्या कार्यकारी कमिटीनें गेल्या महिन्यांत येत्या अधिवेशनांत प्रजापक्षाच्या सभासदांनीं भाग घेऊं नये व हजर राहूं नये असा आदेश दिला आहे. सबब आदेशास अनुसरून सदर पक्षाचे सभासद उद्यांपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनास हजर राहाणार नाहींत. मे. कळावें.

जमखंडी  
ता. १७।८।४२

आपला नम्र  
( सही ) पी. एम्. बंगी, प्रजापक्ष अध्यक्ष.

(रावसाहेब सेक्रेटरी प्रा. का. मंडळ जमखंडी यांचे मार्फत.)

"सन्मान्य सभासदहो, गतवर्षाप्रमाणें यंदांहि आपलें स्वागत करण्यास मला आनंद होत आहे. या आनंदामध्यें थोडेसें विरजण पडलें आहे, तें दोन प्रकारचें आहे. आपल्या येथील पटू पुढारी न्यायमंत्री रा. सा. महाबळ यांच्या आजारीपणामुळें त्यांची उणीव आज या ठिकाणीं सर्व सभासदांना भासल्याशिवाय राहाणार नाहीं असें मला वाटतें. ते लवकरच पूर्ववत बरे होऊन पुढील अधिवेशनास हजर राहातील अशी आशा करतों. दुसरी खेदाची गोष्ट आहे कीं, या अधिवेशनांत प्रजापक्षाच्या सभासदांनीं भाग घेतलेला नाहीं. यासंबंधीं आतांच या ठिकाणीं पत्र वाचून दाखविण्यांत आलें. आपल्या येथें जो हा प्रजापक्ष आहे तो एकच संघटित असा पक्ष आहे. अकरा लोक या पक्षाचे असेंब्लींत असावे असें वाटतें.

स स. वाटवे:–तेरा लोक आहेत.

मे. अध्यक्षः–तेरा लोक या पक्षाचे या असेंब्लींत आहेत व त्यांनीं असहकारितेचें धोरण स्वीकारलें आहे. असहकारितेचे पुष्कळ प्रकार असतात. Civil Disobedience हा एक त्यांतला एक प्रकार आहे. यालाच अडवणुकीचे मार्ग असें म्हणतां येईल. अडवणुकीच्या मार्गाकरितांच त्यांनीं हा प्रकार अवलंबिला असेल तर गोष्ट निराळी. तथापि हा मार्ग कोणत्या परिस्थितींत यशस्वी होईल याचा विचार केला पाहिजे. जेव्हां एकाद्या पक्षाची शक्ति व संघटना प्रभावी असेल तेव्हांच त्याचे परिणाम प्रस्थापित सरकारावर होतील असें मला वाटतें. परंतु इतकी प्रभावी संघटना या पक्षाची असेल असें मला वाटत नाहीं. केव्हां केव्हां वैतागूनही निराशेच्या भरांत असहकारितेचें धोरण स्वीकारलें जातें. तीच स्थिति या पुढाऱ्यांची झाली असावी व त्यांनीं अशा प्रकारचें धोरण स्वीकारलें असावें असें मला वाटतें. पण तें बरोबर नाहीं. कोणत्याहि बाबतींत असहकारापेक्षां सनदशीर आणि सहकार्याचे मार्गानेंच अधिक फायदा मिळूं शकतो. आपल्यापैकीं कांहीं मंडळींना असें वाटण्याचा संभव आहे कीं, या ठिकाणीं येऊन लोकहित साधतां येत नाहीं. नेहमीं आपला पराभव होतो. परंतु तसें मानण्यास कारण नाहीं. जरी कदाचित् आपला पराभव होणार अशी खात्री असली तरी अशा प्रकारची संधि न दवडणेंच आवश्यक आहे. कारण या ठिकाणीं आपलीं मतें स्पष्टपणें मांडतां येतात. आपलीं स्पष्टमतें मांडून सरकारला सल्ला न देतां परावृत होणें ही गोष्ट श्रेयस्कर आहे असें मला वाटत नाहीं. या ठिकाणीं जमून निराश न होतां आपलीं जीं मतें असतील तीं मांडून आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानावर घालावीं. संस्थानाधिपतींचे आधिपत्याखालीं संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति हें धोरण श्रीमंत सरकारांनीं जाहीर केलें आहेच, व त्याप्रमाणें आपल्याला स्वराज्य मिळालें आहे. अशा स्थितींत राजाला नोकर करण्याची इच्छा आपली असेल असें मला वाटत नाहीं. सरकारचे धोरणांत कांहीं दोष असतील. ते वरचेवर त्यांचेपुढें मांडून नाहींसे करण्याचा प्रयत्न करावा. आपल्याला वाटत असेल या गोष्टींचा उपयोग होत नाहीं; पण ही समजूत चुकीची आहे.

यानंतर आनंदाची गोष्ट अशी कीं, देशांत हल्लीं जी एकप्रकारची असंतोषाची लूट उसळली आहे त्याची झळ आपल्या येथें नाहीं. अर्थात् त्याचें सर्व श्रेय श्रीमंत राजेसाहेब, सरकारचें धोरण, त्यांचे सल्लागार, पुढारी व प्रजा या सर्वांनाच आहे.

आतांपर्यंत आपण जी मदत केली त्याप्रमाणें हें अधिवेशनाचें काम पार पाडण्याचे कामीं कराल अशी आशा आहे."

नंतर सेक्रेटरींनीं स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णुपंत आपटे यांना आपले प्रश्न वाचण्यास सांगितलें.

## प्रश्नोत्तरें

### १ स. स सौ. लक्ष्मीबाई विष्णुपंत आपटे यांचे ठराव

प्रश्न १—हायस्कुलांतील विद्यार्थिनींना सुटींचें वेळीं बसण्याकरितां स्वतंत्र व्यवस्थ. पूर्वीं होती ती हल्लीं काढण्यांत आली असल्यास पुन्हां तशी करण्यांत येईल काय? इतर जरूरीच्या सोई करण्यांत येतील काय?

रा. सा. देवधरः—हायस्कुलांतील विद्यार्थिनींना सुटीचे वेळीं बसण्याकरितां व्यवस्था आहे. जरूरीप्रमाणें विचार करतां येईल.

स. स. वाटवेः—व्यवस्था आहे तर जरूरीप्रमाणें विचार करतां येईल याचा अर्थ काय?

रा. सा. देवधरः—आणखी जरूरी भासल्यास व्यवस्था करण्यासंबंधीं विचार करतां येईल.

स. स. वाटवेः—सध्यां असलेली व्यवस्था अपुरी आहे काय?

रा. सा. देवधरः—सध्यांपुरती तरी अपुरी नाहीं.

स. स. वाटवेः—पूर्वीं अशी होती ती मध्यंतरीं काढली होती काय? नाहीं तर असा प्रश्न उपस्थित होण्याचें कारण काय?

रा. सा. देवधरः—माहित नाहीं.

प्रश्न २— कुंदगोळ येथें ट्रेंड नर्सची जरूरी सरकारास भासते काय? जरूरी असल्यास तशी व्यवस्था सरकार करील काय?

रा. सा. देवधरः—कुंदगोळ येथें ट्रेंड नर्सची जरूरी भासते. तशी नेमणूक करण्याच्या बाबतींत तजवीज चालू आहे. नर्स मिळण्याच्या बाबतींत वर्तमानपत्रांत जाहिरातहि देण्यांत आली होती.

स. स. वाटवेः—जाहिरात केव्हा दिली होती?

रा. सा. देवधरः—गेल्या सप्टेंबर–आक्टोबर महिन्यांत वर्तमानपत्रांतून जाहिरात दिली होती.

स. स. वाटवेः—जाहिरतीप्रमाणें अर्ज आले होते काय ?

रा. सा. देवधरः—होय.

स. स. वाटवेः—मग अद्याप नेमणूक कां झाली नाहीं !

रा. सा. देवधरः—जे अर्ज आले त्यांत आम्हांला योग्य अशा नर्सेस नव्हत्या.

स. स. वाटवेः—त्या ट्रेंड होत्या काय ?

रा. सा. देवधरः—होय.

स. स. वाटवेः—त्या योग्य नव्हत्या याचा अर्थ काय ?

रा. सा. देवधरः—सध्यांच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें त्यांना गव्हर्मेंटकडे डिमांड फार आहे व त्यांना तिकडे पगारहि भरपूर मिळतो. आम्हांला तसा पगार देणें परवडणार नाहीं. आम्हीं जो पगार देणार होतों त्या पगारावर त्या राहण्यास नाराज होत्या.

स. स. वाटवेः—जाहिरातींत पगार डिक्लेअर केला होता काय ?

रा. सा. देवधरः—नाहीं.

स. स. वाटवेः—आपण किती पगार देणार होतां ?

रा. सा. देवधरः—लायकी पाहून योग्य असा पगार देणार होतों.

स. स. वाटवेः—अर्ज किती आले होते ? त्यांचीं नाव सांगण्यांत येतील काय ?

रा. सा. देवधरः—नांवें आतां सांगतां येणार नाहींत.

स. स. सोहनीः—एकदां जाहिरात दिली त्यांत पगार जाहीर केला नव्हता; तेव्हां पुन्हा पगार जाहीर करून जाहिरात देण्यांत येईल काय ?

रा. सा. देवधरः—या बाबतींत तजवीज चालू आहे. लायक माणसें मिळत नाहींत.

स. स. सोहनीः—जाहीरात दिल्यानंतर असे अर्ज आले व त्यांत लायक निघाले नाहींत तरी हरकत नाहीं पण एकदां जाहिरात द्यावी.

रा. सा. देवधरः—आपण म्हणतां त्याप्रमाणें दरबारचा उपक्रम चालूच आहे.

स. स. वाटवेः—मग अद्याप नेमणूक कां झाली नाहीं ?

रा. सा. देवधरः—आतांपर्यंत ज्या आल्या त्या आपल्या दृष्टीनें कुचकामी होत्या.

स. स. वाटवेः—त्या कुचकामी होत्या हें आपण कशावरून ठरविलें ?

रा. सा. देवधरः—तज्ञांचें मत तसें पडलें. डॉक्टरचें मत तसें पडलें कीं, ह्या बाई काम करण्यास योग्य नाहींत.

प्रश्न ३:—(अ) युद्धजन्य परिस्थितीमुळें शालोपयोगी साहित्य दुर्मिळ झाल्याचें सरकारचे निदर्शनास आलें आहे काय ?

(ब) आलें असल्यास शाळांतून विद्यार्थ्यांकडून सदर वस्तूंचा उपयोग केवळ जरूरी पुरतांच करविणेबद्दल हुकूम सोडविणेंत येतील काय ?

(क) त्याचप्रमाणें मासिक परीक्षा तूर्त बंद करणेंत येतील काय ?

रा. सा. देवधरः–( अ ) युद्धजन्य परिस्थितीमुळें शालोपयोगी साहित्य महाग झालें आहे हें सरकारच्या निदर्शनास आलें आहे.

( ब ) विद्यार्थ्यांकडून सदर वस्तूंचा उपयोग जरूरीपुरताच करविला जात आहे. विशिष्ट बाबींबद्दल तक्रारी आल्यास जरूर ते हुकूम सोडण्यात येतील.

( क ) मासिक परीक्षा इंग्रजी पांचवीपर्यंत तोंडीच घेण्याची तजवीज होईल. इंग्रजी सहावी व सातवी या इयत्तांची परीक्षा मात्र लेखीच घेण्यांत येईल. कारण तीं मुलें मॅट्रिकला बसणारीं असल्यामुळें तसें करणें अपरिहार्य आहे.

स. स. वाटवेः–शाळांतून पाट्या सुरू कराव्या अशा तऱ्हेचा अर्ज आला होता काय ?

रा. सा. देवधरः–होय.

स. स. वाटवेः–त्याबद्दल पुढें काय तजवीज करण्यांत आली ?

रा. सा. देवधरः—त्याबद्दल विचार चालू आहे. या बाबतींत पालक वर्गाशीं विचार केला पाहिजे.

स. स. वाटवेः—जो अर्ज आला होता तो पालकांच्याच सहीनें आलेला होता. माझीहि त्या अर्जावर सही आहे व ती पालक या नात्यानेंच आहे. कागद महाग झाले आहेत ही गोष्ट दरबारच्या निदर्शनास येऊन सुद्धां अद्याप विचार चालू आहे असें सांगणें ही खेदाची गोष्ट आहे. आज एका कागदाला दीड पैसा पडतो.

रा. सा. देवधरः—आपण जो अर्ज लिहिला त्या कागदाला दीड पैसा पडला याची मला कल्पना आहे. आज मुलांनीं पाटीवर लिहिलें तर दरबारचें त्यांत कांहीं नुकसान नाहीं. तथापि ही गोष्ट सर्वांच्या विचारानें झालेली बरी व त्या कामीं आपण मदत केली पाहिजे.

स. स. वाटवेः—अर्ज करून दोन महिने झाले. ५०० लोकांच्या सह्यांनिशीं अर्ज केला होता. या बाबतींत आपण विचार केला आहे काय ? अर्जावर सह्या करणारे सर्व पालकच होते ना ? असें असतां विचार चालू आहे असें सांगणें बरोबर नाहीं.

मे. अध्यक्षः—आतां ह्याबाबत अधिक चर्चा नको.

## २. स. च. अप्पाराव शिंदे यांचे प्रश्न

प्रश्न १–( अ ) आज पिळ्यान्पिढ्या या संस्थानांत मोफत शिक्षणाची सोय असतांना साक्षरतेचें प्रमाण अत्यंत अल्प आहे. याकडे रा. सा. मंत्री सोपीव खातें यांचें लक्ष गेलें आहे काय ?

( ब ) असल्यास साक्षरतेचा प्रसार होणेसाठीं त्यांनीं कांहीं योजना आंखली आहे काय ? असल्यास ती योजना मंडळापुढें मांडणेंत येईल काय ?

( क ) नसल्यास त्या दिशेनें तत्काळ प्रयत्न होतील काय ?

रा. सा. देवधरः—साक्षरतेचें प्रमाण पूर्वीपेक्षां वाढलेलें आहे.

स. स. वाटवेः—किती पटीनें वाढलें आहे.

रा. सा. देवधरः—तसा प्रश्न विचारलेला नाहीं.

स. स. वाटवेः—प्रथम प्रश्नाचें उत्तर द्या. हा उपप्रश्न आहे.

रा. सा. देवधरः—आपण अशा शाळा सुरू केल्यास त्यांना ग्रँट देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. खास योजना अशी आंखलेली नाहीं. तथापि यासंबंधीं सर्वत्र विचार चालू आहे.

स. स. वाटवेः—साक्षरतेचें प्रमाण वाढलें आहे काय ?

रा. सा. देवधरः—होय.

स. स. वाटवेः—पूर्वींच्या आणि आतांच्या खानेसुमारींतील प्रमाणांत फरक काय पडला आहे ?

रा. सा. देवधरः—पूर्वींच्या खानेसुमारींत हें प्रमाण ७ परसेंट होतें आणि आतां ९·४ परसेंट आहे. बाकीच्या संस्थानचे रिपोर्टस् पाहिले तर ३ परसेंट, ४ परसेंट असें प्रमाण आहे. इतर संस्थानच्या मानानें आपल्याकडील प्रमाण जास्त आहे याबद्दल मला अभिमान वाटतो. तथापि मी हें प्रमाण ( standard ) धरत नाहीं.

**प्रश्न २**–जमखंडी शहरीं शिकलगार व अन्य भिक्षेकरी यांचा फारच सुळसुळाट झाला आहे. शिवाय लगत असलेल्या मुधोळ संस्थानांत भिक्षा मागणेस कायद्यानें बंदी झाल्यानें तर तेथील भिक्षेकरीही इकडे येतात तरी त्यांचा उपसर्ग कमी होईल अशी कांहींतरी तजवीज दरबार करूं शकेल काय ?

रा. ब. दिवाणः—मुधोळ संस्थानाप्रमाणें संस्थानमजकुरीं भिकारीसंबंधीं कायदा करणेंत आलेला नाहीं. तत्राप भिकारी वगैरेचा उपसर्ग लोकांस होऊं नये याविषयीं स्थानिक पोलिस शक्य ती तजवीज करीत असतात. स. स. कडून याबाबतच्या कायद्याचें बिल आल्यास दरबारकडून योग्य तो विचार होईल.

स. स. शिंदेः—हे लोक नुसते भिक्षा मागून थांबत नाहींत तर जें हाताला मिळेल तें घेऊन जातात. चोरी करण्याकडे या लोकांची प्रवृत्ति फार असते.

रा. ब. दिवाणः—आपला व्यक्तिशः अनुभव असला तर गोष्ट निराळी. परंतु अशीं उदाहरणें घडल्याचें रेकॉर्ड नाहीं. तथापि अशा प्रकारची माहिती द्याल तर त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करूं.

स. स. सोहोनीः—असा कायदा करणें बरोबर होणार नाहीं. आई जेवायला घालूं देत नाहीं व बाप रडायला देत नाहीं असा अनवस्था प्रसंग या कायद्यानें ओढवेल. लोक भिक्षा कां मागतात याचा आपण विचार केला आहे काय ? लोकांना काम मिळत नाहीं अशी आज स्थिति आहे. तेव्हां प्रथम बेकारी नाहींशी होईल यासाठीं तजवीज करावी व नंतरच असा कायदा करावा.

**प्रश्न ३** ( अ ) जमखंडी संस्थानांत १९३८ सालीं मुंबई प्रांतांत असलेले आणेवारीचे नियम लागू करणेंत आले आहेत. तरी त्या नियमाप्रमाणें दरसाल

आणेवारीचे वेळीं पंचकमिट्यांची निवड होऊन तंतोतंत त्या नियमाप्रमाणें आणेवारी करण्यांत येत नाहीं हें खरें नाहीं काय ?

(ब) गेल्या सालीं म्हणजे १९३१ फसलीस पिकांचे आणेवारी नियमामध्यें फेरफार करण्यांत आले आहेत काय ?

(क) नसल्यास प्राथमिक आणेवारी मामलेदारांनीं जाहीर करण्याऐवजीं श्रीमंत राजेसाहेबांचे हुकुमानें व तीही अगदीं उशीरा कां जाहीर करण्यांत आली ?

(ड) गेल्या सालीं जमखंडी तालुक्यांतील सिद्दापूर, मदरखंडी वगैरे खेड्यांतील आणेवारीबद्दल श्रीमंतांकडे तक्रारी अर्ज आले होते काय ?

(इ) आले असल्यास त्यांचा विचार होऊन त्याबद्दल निकाल अर्जदारांना देणेंत आला आहे काय ?

रा. ब. दिवाणः—(अ) हें विधान वस्तुस्थितीस धरून नाहीं.

(ब) विशेष असे फेरफार करण्यांत आलेले नाहींत.

(क) वस्तुस्थिति तशी नाहीं. प्राथमिक आणेवारी मामलेदारांनींच जाहीर केली होती; पण अखेरची आणेवारी संस्थानचे दिवाण यांजकडून मंजूर न होतां ती श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं कांहीं गांवांत स्वतः चाचणी पाहून अखेरची आणेवारी मंजूर केली अशी वस्तुस्थिति आहे.

(ड) होय. आले होते.

(इ) होय. निकाल देणेंत आला.

स. स. वाटवेः—अर्ज कोणत्या महिन्यांत आला व उत्तर केव्हां दिलें ?

रा. ब. दिवाणः—हा प्रश्न यांत येत नाहीं.

स. स. वाटवेः—हा उपप्रश्न आहे. उपप्रश्न विचारण्याचा मला हक्क आहे.

रा. ब. दिवाणः—माझ्या जवळ आतां तशी माहिती नाहीं.

मे. अध्यक्षः—आतां प्रश्नाची वेळ संपली. आतां बजेट कमिटी निवडावी.

रा. सा. देवधरः—गेल्या वर्षी बजेट कमिटीवर (१) स. स. तोटनगौडा पाटील, (२) स. स. सोहोनी, (३) स. स. गाडगीळ, (४) स. स. होर्ती व (५) स. स. सी. व्ही. आपटे अशी पांच मंडळी होती. मला वाटतें आपण यंदांहि त्याच मंडळींना विनंति करूं या व तेंच पॅनेल कायम ठेवूं या. पूर्वींचीच मंडळी कायम ठेवावयाला हरकत नाहीं.

स. स. सोहोनीः—या पांच मंडळींपैकीं आज तीन स. स. येथें हजर नाहींत. तेव्हां त्यांची आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय त्यांचीं नांवें कायम करणें योग्य होणार नाहीं. आजच त्यांचें पत्र या ठिकाणीं वाचून दाखविण्यांत आलें त्यावरून ते बजेट कमिटीच्या

बैठकीलाहि हजर राहतील असें वाटत नाहीं. तेव्हां त्यांचीं नांवें घालून उपयोग काय होणार? त्यांनीं काम केलें पाहिजे ना ?

रा. स. देवधरः—स. स. तोटनगौडा पाटील यांचें पत्र आलें आहे. ते सायंकाळपर्यंत येथें येतील. तेव्हां त्यांचें नांव घालण्यास कांहीं हरकत नाहीं. तेव्हां स. स. तोटनगौडा पाटील, स. स. सोहनी व स. स. सी. व्ही. आपटे ही तीन मंडळी पूर्वीचीच कायम ठेवावी, व आणखी स. स. सौ. आपटे व मंडळाचे व्हाइस प्रेसिडेंट स. स. वाटवे अशीं दोन नांवें घालावी.

स. स. वाटवेः—व्हाइस प्रेसिडेंटना बजेट कमिटीवर राहातां येत नाहीं.

रा. स. देवधरः—तसें असेल तर मी स. स. शिवपूजे यांचें नांव सुचवितों.

स. स. वाटवेः—कांहीं हरकत नाहीं.

रा. स. देवधरः—( १ ) स. स. सी. व्ही. आपटे ( २ ) स. स. शिवपूजे ( ३ ) स. स. तोटनगौडा पाटील ( ४ ) स. स. सोहनी व ( ५ ) स. स. सौ. आपटे अशा पांच स. सभासदांची बजेट कमिटी झाली. याला कोणाचा विरोध आहे असें मला वाटत नाहीं.

मे. अध्यक्षः—आतां रा. सा. मंत्री यांनीं जीं बजेट कमिटीवरील स. सभासदांचीं नांवें वाचून दाखविलीं तीं सर्वांना मान्य आहेत असें समजून वरीलप्रमाणें बजेट कमिटी निवडल्याचें जाहीर करतों. आतां गेल्या वर्षीचा ऑडिट कमिटीचा रिपोर्ट आला आहे तो कलम ५० प्रमाणें मंडळापुढें वाचावयाचा आहे. त्याप्रमाणें मंडळाचे सेक्रेटरी सदरहू रिपोर्ट आपणांस वाचून दाखवतील. सेक्रेटरी ऑडिट कमिटीचा रिपोर्ट वाचतात.

## ऑडिट कमिटीचा रिपोर्ट

मेहेरबान प्रेसिडेंटसाहेब,

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळ जमखंडी यांचे हुजुरांस

रिपोर्टः—जमखंडी सं. प्रातिनिधिक कायदेमंडळाकडील ऑडिट कमिटी कडून

मेहेरबान रावसाहेब मंत्री सोपीव खातीं जमखंडी यांचे मंजुरीप्रमाणें जमखंडी मुक्कामीं ता. ५।८।४२ या रोजीं दुपारीं १२॥ वाजल्यापासून कमिटीचे कामास सुरवात जाहली. सदर कमिटीचे मेंबरपैकीं खालीलप्रमाणें मेंबर्स हजर होते.

१ स. स. आप्पाराम परशुरामराव शिंदे, जमखंडी.
२ रावसाहेब विनायक गंगाधर गोखले, जमखंडी.
३ स: स. कलनगौडा ईरनगौडा पाटील, कुंदगोळ.
४ स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी, जमखंडी.
येणेंप्रमाणें चार सभासद हजर होते.

सदर कमिटीचें काम ता. ५।६।७ माहे आगस्ट सन इ. १९४२ तीन दिवस चाललें.

सोपींव खात्याकडील बहुतेक डिपार्टमेंटच्या रोजकीर्दी व शिलका तपासल्या. त्या सर्व बरोबर असल्याचें आढळून आलें; परंतु कांहीं खात्यांनीं रोज बुकें ( कीर्द ) ठेविलीं नाहींत, त्याचा तपशील खालीं दिला आहे.

( १ ) पी. डब्ल्यु. डी. कडील कांहीं रस्त्यांचीं बिलें, पाण्याकडील कांहीं विहिरींचीं बिलें व शाळाखात्याकडील कांहीं शाळा रिपेरींचीं बिलें व कांहीं नवीन कामाचीं बिलें तपासलीं. बहुतेक तीं सर्व बरोबर आहेत. तसेंच पी. डब्ल्यु. खात्याकडील डेडस्टॉकचीं बुकें, मेझरमेंटचीं बुकें व चेक बुकें व चलनें तपासलीं. तसेंच प्रोग्रेस रिपोर्टसहि पाहिले. बहुतेक कामें समाधानकारक रीतीनें झाल्याचें आढळून आलें. तथापि सदर कमिटीला कांहीं सूचना करावयाच्या वाटल्यावरून त्या खालीं नमूद केल्या आहेत. त्याचा विचार होऊन तें ग्राह्य असल्यास घेण्याबद्दल विनंति आहे.

## सूचना

१ चालू वर्ष पुरें जाहल्यानंतर पुढील सालांत ता. १० पर्यंत रोजकीर्द चालू ठेविल्या आहेत. त्यामुळें आज तारखेस कोणतीं कामें पुरीं झालीं व बाकी शिल्लक राहिलीं हें समजण्यास मार्ग राहिला नसल्यामुळें व फायनल बिलेंहि बहुतेक होणेचीं राहिलीं असल्यामुळें तीं तपासण्यास मार्ग राहिला नाहीं. करितां पुढील सालीं ता. १५ जुलैच्या आंत सर्व बिलें खर्च पडतील अशी तजवीज जाहल्यास बरें होणार आहे.

२ वर्ष अखेरीस ऑडिट एकदांच ठेविल्यास हिशेब तपासणेचे बाबतींत बरीच अडचण पडते. सबब वर्षांतून दोन वेळां ऑडिट करून घेणेची पद्धत ठेविल्यास कामाचे दृष्टीनें सोपें होणार आहे.

३ पी. डब्ल्यु. डी. कडील खडी, मुरूममाती वगैरे कट्टयाचीं मापें साइटवर एका कच्च्या खर्ड्यावर घेऊन नंतर ऑफिसमध्यें मेझरमेंट बुकांत नोंद केलीं जातात असें आढळून आलें आहे. तर तसें न करितां प्रत्यक्ष जागेवरच मेझरमेंट घेऊन हीं मापें मेझरमेंट बुकांत लिहिलीं जावीं.

४ बजेटांतील सोपीव खात्याकडे जी रक्कम देणेंत येते ती सर्व रक्कम रावसाहेब मंत्री सोपीव खातीं यांचेकडे दरसाल दिल्यास त्यांतून साल अखेरपर्यंत होणारीं कामें खर्च लिहून जी रक्कम बजेटपैकीं व सेव्हिंगपैकीं मिळून शिल्लक राहील तिचा उपयोग पुढील सालांत एखाद्या चांगल्या मोठ्या कामाकडे उपयोग करतां येईल सबब तशी रक्कम देणेबद्दल विचार होणेबद्दल विनंति आहे.

५ कनोळी गांवची धर्मशाळा तेथील लोकांनीं शाळेचे उपयोगाकरतां दिली आहे असें गृहीत धरून त्या धर्मशाळेचे रिपेरीकरितां रुपये १०५८५८६ खर्च केले आहेत. सदरहु उपक्रम योग्य असला तरी शाळाखात्याचे उपयोगाकरितां सदरहु इमारत घेण्याचे कामीं हुजूर मंजूरी आवश्यक आहे असें वाटतें.

६ पब्लिक वर्क्स खात्याकडील बिलें पाहतां त्यांचें मेझर रिपेरी व करंट रिपेरी अशीं मिळून एस्टिमेटस केलेलीं दिसत नाहींत.त्यामुळें बजेटांत धरलेल्या रकमेपेक्षां कांहीं कांहीं बाब-

तींत ५० टक्के खर्च एस्टिमेटपेक्षां जास्त झालेला दिसतो तरी तसें न करतां जरूरीप्रमाणें पूर्ण तजविजीनें एस्टिमेंट करून त्या रकमा बजेटांत धरणेंत याव्यात.

७ गेल्या सालीं पब्लिक वर्क्स खात्याचे कॉंटिंजन्सीचा सर्व खर्च सोंपीव खात्यांवर पडला आहे असें दिसतें. करतां यापुढें खर्चाची विभागणी व्हावी.

८ तालुका–तालुक्यांतील कामासंबंधानें बजेटमध्यें ज्या रकमा मंजूर जाहल्या असतील त्या त्या रकमा त्याच तालुक्यांतील कामाकडे खर्च करण्याची वहिवाट असावी. हल्लींचे कायद्यामध्यें तशी योजना नाहीं. प्रसंगविशेषीं रकमा बदलून घेणेचा प्रसंग आल्यास हुजूर मंजूरी घ्यावी.

९ बजेट कमिटी बोलावणेपूर्वी ऑडिट कमिटी बोलावून ऑडिट कमिटीकडून आलेल्या सूचना बजेट कमिटीपुढें मांडण्यांत याव्यात.

१० दवाखाना व देवी खातें या ऑफीसकडे रोज कीर्द ठेविलेली नाहीं ती यापुढें ठेविणेची वहिवाट ठेवावी. आज तारखेस त्यांचेजवळ वर्षअखेरीची शिल्लक कांहीं नाहीं असें तोंडी सांगण्यांत आलें.

११ डे बुकांत चेकची रक्कम जमेच्या बाजूस धरून जसजशी रक्कम खर्च होईल ती खर्चाचे बाजूस लिहिली जाते, तर तसें न करतां ग्रँटची सर्व रक्कम जमेच्या बाजूस धरून जसजशीं बिलें येतील तीं खर्चाचे बाजूस लिहिलीं जावीं म्हणजे ग्रँटमधून शिल्लक किती राहिली हें रोजच्यारोज समजण्यास सोपें जाणार आहे.

१२ प. व. डि. कडील बिलें रावसाहेब मंत्री सोंपीव खातीं यांचे ऑफिसांत पेमेंट होऊन तीं रावसाहेब स्टेट इंजिनीअर जमखिंडी यांचे ऑफिसकडे रेकार्डासाठीं पाठविलीं जातात असें कळतें. तसेंच इतर खात्यांकडील बिलेंहि मंजूर होऊन त्यांचा बटवडा हुजूर ट्रेझरीमधून केला जातो व तीं व्हाउचर्सहि राखीव खात्याचे बिलांबरोबर ठेविलीं जातात. तसें करण्यानें ऑडिटच्या वेळीं पाहिजे तीं बिलें वेळेवर मिळत नाहींत. करितां सोंपीव खात्याकडील सर्व बिलें रा. सा. मंत्री सोंपीव खातीं यांचे ऑफिसमध्यें ऑडिट कमिटीकडून तपासणी होईपावेतों ठेवण्यांत यावींत. नंतर जरूर तर जिकडील तिकडे अगर रेकॉर्डकडे पाठविण्यांत यावींत.

येणेंप्रमाणें एकमतानें रिपोर्ट लिहून सेवेशीं पाठविला आहे. मे. जाहीर व्हावें ता. ७।८।४२ इ.

मे. अध्यक्षः—यावर चर्चा करतां येते कीं काय ?

स. स. वाटवेः—रिपोर्टामध्यें बऱ्याच विधायक सूचना दिल्या आहेत तेव्हां त्यावर चर्चा करावयाला वाव मिळालाच पाहिजे.

मे. अध्यक्षः—कलम नं. ५० मध्यें चर्चेसंबंधीं कांहींच खुलासा नाहीं. फक्त मोघमच "रिपोर्ट कायदेमंडळास सादर करील" असें आहे. कायद्यामध्यें तशी तरतूद नसल्यामुळें आपल्याला चर्चा करतां येणार नाहीं असें मला वाटतें.

स. स. वाटवेः—जर यावर चर्चा करतां येत नसेल तर मंडळापुढें रिपोर्ट सादर करण्यांत फायदा काय ?

रा. स. पटवर्धनः—तसा ठराव आणावा.

स. स. वाटवेः—मग या ऑडिट कमिटीच्या रिपोर्टाचा उपयोग काय ?

रा. सा. पटवर्धनः—तो रेकॉर्डला राहील.

रा. ब. दिवाणः—फार तर असें करतां येईल कीं, ह्या ज्या सूचना आहेत त्यांबद्दल काय करावें यासंबंधींची दरबारमार्फत श्रीमंत राजासाहेबांकडे विचारणा करतां येईल किंवा अध्यक्षांची परवानगी असेल तर तसा ठराव आणावा.

मे. अध्यक्षः—रा. ब. दिवाणसाहेब म्हणतात त्याप्रमाणें याबद्दल श्रीमंतांकडेच विचारणा केलेली बरी असें मला वाटतें. आतां रा. ब. दिवाण हे राखीव खात्याचें बजेट मंडळापुढें मांडतील.

**रा. ब. दिवाण यांचें बजेटवरील भाषण**

अध्यक्षसाहेब व इतर सन्मान्य सभासदः—

संस्थान मजकूरचें सन १९४२–४३ सालचें अंदाजी बजेट आपणापुढें मांडणेची मी परवानगी घेतों. बजेटाच्या छापील प्रती सन्मान्य सभासदांकडे यापूर्वींच रवाना झाल्या असून त्यांचें त्यांनीं आतांपर्यंत मनन करून ठेविलें असेलच. अशा तयारीनें आल्यानंतर मी आतां जे खुलासे करणार आहें ते सहज रीतीनें सर्वांचे लक्षांत येऊन त्यापासून बजेटचें वाटाघाटीचें काम एकंदरीनें जास्त सुलभ होईल अशी मी अपेक्षा करतों. बजेटाचे तपशिलांत शिरण्यापूर्वी ज्यास इंग्रजींत Budget at a glance म्हणतात असे एकंदरींचे बजेटाचे आंकडे संक्षिप्त स्वरूपांत आपलेपुढें मांडतों.

## बजेट नोट १९४२।४३

**संक्षिप्त स्वरूपांत बजेट**

| तपशील | प्रथमचें अंदाजी बजेट १९४१।४२ | दुरुस्त अंदाजी बजेट (ऑगस्ट १९४१ ते जून १९४२ नक्की आणि जुलै १९४२ अंदाजी) १९४१।४२ | प्रथमचें अंदाजी बजेट १९४२।४३ |
|---|---|---|---|
| १ प्रारंभींची शिल्लक ... | –३३८२३ | ३९४९३ | ४५६५० |
| २ वर्षांतील जमा ... | १३०६००१ | १३२१७३६ | १२६११०३ |
| ३ एकूण .. | १२७२१८० | १३६१२२९ | १३०६७५३ |
| ४ वर्षांतील खर्च ... | १२९९८१० | १३१५५७९ | १३००९२४ |
| ५ सालअखेर शिल्लक... | –२७६१२ | ४५६५० | ५८२४ |

संक्षिप्त स्वरूपांत बजेट आपणापुढें मांडल्यानंतर आपल्या लक्षांत एक गोष्ट प्रामुख्यानें आलीच असेल कीं, १९४२–४३ चें प्रथमचें अंदाजी बजेट विशेषरीतीनें समाधान मानणे-जोगें जरी नसलें तरी निदान तें गेले तीन सालांप्रमाणें तुटीचें तरी नाहीं. सदरचे अंदाजांत निव्वळ जमेपेक्षां खर्च जास्तच आहे, परंतु प्रारंभींचे शिलकेंतून जमेपेक्षां जास्त होणारा खर्च भरून निघून सालअखेर अगदीं थोडी कां होईना शिल्लक राहात आहे. ही सर्वस्वी जरी नाहीं तरी थोड्या अंशानें कां होईना समाधानाची गोष्ट आहे. असो, यानंतर मी १९४१–४२ सालच्या दुरुस्त अंदाजाकडे वळतों.

## १९४१।४२

प्रथम अंदाजाप्रमाणें १९४१–४२ सालची सालारंभींची शिल्लक –३३८२३ येईल अशी अटकळ होती परंतु १९४०–४१ सालांत खर्चीं पडणाऱ्या कांहीं रकमा सालांतल्या सालांत खर्चीं न पडतां अमानत करण्यांत आल्यानें व सन १९४०–४१ चे शेवटचे महिन्यापर्यंत वसूल अपेक्षापेक्षां जास्त प्रमाणांत आल्यानें १९४१–४२ नक्की शिल्लक –३९४९३ रुपये म्हणजे प्रथम अंदाजापेक्षां ७३३१६ रुपयांनीं जास्त राहिली. सन १९४१–४२ सालांत प्रथम अंदाजापेक्षां जमेकडे वाढ व खर्चाकडे कमी अशी स्थिति होऊन वर्षातील जमा १३२१७३६ व खर्च १३१५५७९ झाला. परंतु या दोन्ही आंकड्यांत निवळ जमाखर्ची म्हणजे दुबेरजीच्या रकमा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असल्यानें त्या वजा केल्यास सालांतील वास्तविक जमाखर्चाचे आंकडे दिसून येतील असे जमाखर्ची आंकडे म्हणजे ( १ ) इनाम जमिनीवरील आकाराचा जमाखर्च १२४७२२ रुपये ( २ ) पंचवार्षिक जमीनबाब सूट १२००० आणि लोकलफंड सूट ९००० एकूण २५३७२२ ही दुबेरजी एकूण रक्कम जमा आणि खर्च दोन्हींतून वजा केल्यास जमाखर्चाचे नक्की आंकडे जमा १०६८०१४ आणि खर्च १०६१८५७ असे राहतात. या आंकड्यांतही कर्ज, तसलमात आणि अमानत या खात्यांतील जमाखर्चाचे आंकडे सामील आहेत. वास्तविक हीं तिन्हीं खातीं सुद्धां थोड्या फार प्रमाणांत जमाखर्चीच आहेत. या तिन्ही बाबी खऱ्या उत्पन्नाच्या किंवा खर्चाच्या बाबी नाहींत. या दृष्टीनें या तिन्ही खात्यांकडील जमाखर्चाचे आंकडे बाजूस ठेवल्यास संस्थानचे खऱ्या उत्पन्नाचे व खर्चाचे आंकडे मिळूं शकतील. या तिन्हीं खात्यांची मिळून जमा रुपये ३५०७०० व खर्च रुपये ३०८००० असे आहेत. जमाखर्चाचे वर नमूद केलेल्या आंकड्यांतून हे आंकडे वजा केल्यास खरी जमा ७१७३१४ व खर्च ७५३८५७ असे येतात. प्रथम अंदाजाप्रमाणें जमाखर्चाच्या रकमा अनुक्रमें ७६५२७९ व ७५९०८८ अशा येणेस पाहिजे होत्या. पण त्या दुरुस्त बजेटाप्रमाणें जमेंत कमी व खर्चांत जास्त आल्या त्याचे कारणांचा आतां विचार करूं, प्रथम जमेची बाजू घेऊं.

जमेचे बाजूस अपेक्षांपेक्षां ( ७६५२७९–७१७३१४ ) = ४७९६५ रुपये कमी जमा आले. जमा कमी आलेल्या त्या मुख्यत्वेंकरून खालीं नमूद केलेल्या सदराखालीं आलेल्या आहेत.

| बजेट हेड. | कमी रकम |
|---|---|
| २ सायरबाब खातें | ६६६० |
| ५ जमीनबाब खातें | ३७८४० |
| ७ फॉरेस्ट व शेतकी खातें | ६४६ |
| १२ कोर्ट ऑफ वॉर्डस खातें | ६६२ |
| १३ जेल खातें | २५० |
| २० पब्लिकवर्क्स खातें | ५७५ |
| २४ व्याज खातें | १०१८४ |
| इतर खातीं गटानें | १३९७ |
| | ५८२१३ |

सायरबाब खात्यांत पेट्रोल फंडाची रकम धरणेंत येत असते. १९४०–४१ सालीं पेट्रोल फंडापैकीं संस्थानचे हिश्याची रकम रुपये ७५०० ब्रिटिश सरकारांकडून आलेली होती. १९४१–४२ सालांत तशी रकम आलेली नाहीं. ही रकम दरसाल येत नसून दक्षिणी संस्थानांना आळीपाळीनें येत असते. तशी १९४१–४२ सालांत न आल्यानें त्या खात्यास रकम कमी जमा आलेली दिसते.

१९४०–४१ सालांत जमखंडी तालुक्यास व पाटखळ ठाण्यांतील बरेच गांवांस पिकें बरोबर आलीं नसल्यानें जमीनबाबेच्या अर्धवसुलाची तहकुबी देणेंत आली होती. १९४१–सालांत नेहमींप्रमाणें ( Normal ) पिकें येतील अशा कल्पनेनें त्या सालांत तहकूब ठेवणेंत आलेली बाकी सर्व वसूल येईल अशी अपेक्षा होती. पण १९४१–४२ सालांतही कांहीं कांहीं गांवांना भरपूर पावसाचे अभावीं पिकें बरोबर न आल्यानें जमीनबाब वसुलाची पुन्हां तहकुबी द्यावी लागली. त्या कारणानें मागील तहकुबीपैकीं वसूल येईल अशी अपेक्षा होती तोही वसूल तहकूब ठेवण्यांत आला. अशा कारणांमुळें जमीनखात्यांत कमी जमा आलेली आहे.

खातें नं. (७) फॉरेस्ट व शेतकी यास गुदस्त सालीं किरकोळीचें उत्पन्न जास्त झालें होतें. तितकें उत्पन्न चालूसालीं म्हणजे १९४१–४२ सालीं न आल्यानें जमा कमी आलेली आहे.

खातें नं. ( १२ ) यांत श्रमांशाची रकम गुदस्तसालपेक्षां जमा कमी आलेली आहे.

खातें नं. ( १३ ) जेल खात्यांत जमा कमी आलेली आहे. युद्धपरिस्थितीमुळें सुताच्या व रंगाच्या किंमती फार वाढल्या असल्यानें जेलांत कापड विशेष काढलें गेलें नाहीं त्यामुळें विक्रीचें उत्पन्न कमी झालें.

खातें. नं. ( २० ) पब्लिकवर्क्स खात्यांत गुदस्तसालीं कांहीं जुन्या अन्पेड असलेल्या शिलकी पक्क्या सदरीं जमा करणेंत आल्या होत्या त्या प्रकारच्या रकमा चालू सालांत जमा न आल्यानें एकंदर जमा कमी दिसत आहे.

खातें नं. ( २४ ) यांत १० हजारांवर जमा कमी आलेली आहे. सन १९४०–४१ सालांत स्टेटबँकेची कांहीं फार जुनीं खातीं पुरीं करणेंत आलीं. त्यावेळीं मागिल व्याजाची बाकी बरेच प्रमाणांत वसूल आली. १९४१–४२ सालांत तितक्या प्रमाणांत व्याजाची बाकी वसूल झालेली नाहीं. शिवाय कांहीं शेअर्सवरील व्याज १९४०–४१ सालचें वसूल होणेचें राहिलें आहे. त्यामुळें बरीचशी रकम व्याजखात्यास कमी जमा दिसत आहे आतां अपेक्षेपेक्षां जास्त वसूल आलेला आहे, तो मुख्यत्वेंकरून खालीं दिलेल्या खात्यांचा आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ४ | अफू खातें | ८११ |
| १० | रेजिस्ट्रेशन खातें | २५१० |
| ११ | कायदा व न्याय खातें | ५९५ |
| २१ | वॉटरवर्क्स खातें | ३३७० |
| | इतर खातीं गटानें | २९६२ |
| | | १०२४८ |

अफूची विक्री जास्ती झाल्यानें अफू खात्यास जमा जास्त आली. त्याचप्रमाणें दस्तऐवज नोंदणीचें प्रमाण पूर्वीपेक्षां वाढल्यानें फीबद्दलची जास्त जमा आली आहे. कायदाकानू खात्यास दंडाची रकम जास्त आली आहे वॉटरवर्क्स खात्याकडून चालू सालीं पाण्याचे दरांत वाढ झाली असल्यानें जमा जास्त आली आहे. इतर वाढ शेंकडा दहांपेक्षां कमी असल्यानें त्यांचीं कारणें देणेची विशेष जरूरी नाहीं. एकंदरीनें कांहीं खात्यांस कमी तर कांहीं खात्यांस जास्त याप्रमाणें एकंदर वजावाट केल्यास जमा ४७९६५ रुपयांनीं कमी आलेली आहे. यानंतर खर्चाकडे वळूं.

खर्चाचा भाग २ ( अ ) यांत कांहींच फेरबदल नाहीं.

भाग २ ( ब ) यांत वाढ आहे ती खालीं दिलेल्या खात्यांत आहे.

| | | |
|---|---|---|
| १२ | पी. डब्ल्यू. डी. | ४९०९ |
| १४ | वॉटरवर्क्स खातें | ८९१५ |
| १५ | गिरणी, उद्योग व्यापार | ३००० |
| १७ | व्याज खातें | ५६०० |
| | इतर | २०० |
| | | २२६२४ |

पी. डब्ल्यू. डी. खात्यांत वाढ आहे ती बेंचींचे फरशीचे कामावर स्पेशल खर्च झाल्यानें वाढ झाली आहे. वॉटरवर्क्स आणि गिरणी, उद्योगव्यापार यांत जास्त झालेला खर्च युद्ध-जन्य परिस्थितीमुळें कारखान्यास लागणारे सामानाच्या किंमती विशेषरीतीनें वाढल्यामुळें जास्त खर्च झाला आहे. व्याजखातीं वाढ आहे ती फिक्स्ड डिपॉझिटच्या पूर्वीच्या व्याजाच्या रकमा देणें राहिल्या त्या चालूं सालांत दिल्या गेल्यामुळें वाढ झालेली आहे. खर्च कमी झाला आहे तो विशेषेंकरून:—

| | |
|---|---|
| १९ किरकोळ खातें | ६६१० |
| २१ स्पेशल खातें | ४००० |

किरकोळ खात्यांत कमी खर्च झाला आहे तो किरकोळ व बॉरलोन पूर्वीच्या सालापेक्षां कमी प्रमाणांत रिफंड झाल्यानें खर्च कमी झाला असून स्पेशल खात्यास गुदस्तसालीं ' आरमर्ड कॅरिअर ' करितां १०००० रुपये स्पेशल मंजुरी देणेंत आली होती तशी चालूंसालांत स्पेशल रकम देणेचें कारण पडलें नाहीं त्या कारणानें खर्च कमी झाला आहे. बाकी १२ खात्यांत मिळून एकंदर १५६११ रु. खर्च कमी आला आहे. पण तो सर्व शेंकडा १० पेक्षां कमी प्रमाणांत असल्यानें त्या संबंधानें कारणें देणेंची जरूरी नाहीं. एकंदरीनें कांहीं खात्यांत कमी व कांहीं खात्यांत जास्त याप्रमाणें वजावाट केल्यास भाग २ (ब) यांत खर्च नक्की ३५९७ कमी झाला आहे. भाग २ ( क ) यांतील खर्चाची कमीजास्तीचीं कारणें माझे मित्र रावसाहेब न्यायमंत्री देतील. याप्रमाणें सन १९४१–४२ सालाचा अहवाल आहे. त्यानंतर पुढील साल म्हणजे १९४२–४३ सालचें प्रथम अंदाजी बजेटचा विचार करूं.

## १९४२।४३

सन १९४२।४३ सालाचा आरंभ ४५६५० रुपयेचे शिलकेनें होत आहे. या सालांत एकंदर जमा १२६११०३ रुपये व खर्च १३००९३४ असा धरणेंत आला आहे. या सालचे जमाखर्चांतही जमाखर्ची अशा रकमा आहेत त्या म्हणजे ( १ ) १२४७२२ इनामगांवचे जमिनीचे साऱ्याची रकम. ( २ ) जमीनबाबेवरील ¾ सूट १२०००० रुपये आणि लोकल-फंडांतील सूट ९००० एकूण २५३७२२ रुपये दुबेजी होणेच्या आहेत. त्या एकंदर जमा-खर्चाचे वट्ट आंकड्यांतून वजा करितां बाकी जमा १००७३८१ रुपये व खर्च १०४७२०२ रुपये इतके राहातात. कर्ज, तसलमात, अमानत या तिन्ही खात्यांकडे मिळून २६०००० रुपये जमेकडे व तितकीच रकम खर्चाकडे धरणेंत आली आहे. याही तिन्ही बाबी जमा-खर्चीच रकमा असल्यानें त्याही निव्वळ उत्पन्नाच्या किंवा खर्चाच्या बाबी होऊं शकत नाहींत. याही रकमा दुबेरजीसारख्या समजून वट्ट जमाखर्चाच्या अंदाजाच्या रकमेंतून वजा केल्यावर जमा ७४७३८१ रुपये व खर्च ७८७२०२ रुपये अशा खऱ्या जमाखर्चाच्या रकमा राहातात. गुदस्तसालच्या म्हणजे १९४१–४२ च्या प्रथम अंदाजी बजेटांत या रकमा अनुक्रमें ७६५२७९ व ७५८९८८ अशा धरणेंत आल्या होत्या. १९४२–४३ ची जमा गुदस्तसालच्या जमेपेक्षां सुमारें १८ हजार रुपयेनें कमी आली आहे. १९४२–४३ चे जमेचे अंदाज सर्वसाधारणपणें १९४१–४२ चे अंदाजाप्रमाणें धरणेंत आले आहेत. कांहीं

कांहीं बाबतींत कमीजास्त करणेंत आलें आहे. कमी प्रमाणांत जमा धरणेंत आल्या आहेत त्या विशेषेंकरून खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

| खातें नंबर | | रकम रुपये |
|---|---|---|
| २ | सायरबाब खातें | ४५५५ |
| ५ | जमीनबाब खातें | ३२०५० |
| २४ | व्याज खातें | ४८०० |
| | इतर खातीं गटानें | १०८३ |
| | | ४२४८८ |

जमा जास्त धरणेंत आली ती विशेषेंकरून खालीं दिलेल्या खात्यांत धरणेंत आली आहे.

| खातें नंबर | | रकम रुपये |
|---|---|---|
| १० | रेजिस्ट्रेशन खातें | १६०० |
| २१ | वॉटरवर्क्स खातें | ८००० |
| २२ | गिरणी उद्योग व्यापार | १२७५० |
| | इतर खातीं गटानें | २२४० |
| | | २४५९० |

कमी जास्त बजावट करतां सुमारें १८००० रुपयांची जमा कमी धरणेंत आली आहे. जमा कमी धरली आहे ती विशेषेंकरून तीन खात्यांत कमी धरणेंत आली आहे.

सायरबाब खात्यांत ४५५५ रुपयांनीं जमा कमी धरणेंत आली त्याचें कारण पेट्रोल फंडाची रकम गुदस्तसाल आली नाहीं व यंदा युद्धजन्य परिस्थितीमुळें आली तरी नेहमीं-प्रमाणें ७५०० न येतां कमीच येईल म्हणून रकम कमी धरणेंत आली आहे.

जमीनबाब खात्यास ३२००० रकम कमी धरली आहे. तिचें कारण पूर्वीच्या तहकुबीच्या बाक्या जरी यंदा येणें आहेत तत्राप गुदस्तसाला इतक्या त्या येणेच्या नाहींत. त्यामानानें मागील तहकुबी बाकीपैकीं वसूल ३२०००नीं कमी दाखविला आहे. व्याज खात्यास ४८०० रुपये कमी जमा धरली आहे त्याचें कारण स्टेट बँकेचीं कर्जें सवलती वगैरे देऊन बरीच फेड झाली असल्यानें व्याजाचें उत्पन्न त्यामानानें कमी पडणार. त्या दृष्टीनें व्याजखातीं कमी जमा धरणेंत आली आहे. बाकी नऊ खात्यांत मिळून १०८३ रुपये कमी जमा धरली आहे. पण ती शेंकडा १० पेक्षां कमी प्रमाणांत असल्यानें त्याचीं विशेष कारणें देणेची जरूरी नाहीं. एकंदरीनें ४२४८८ जमा कमी धरणेंत आली आहे. जास्त जमा धरली आहे ती विशेषेंकरून रेजिस्ट्रेशन, वॉटरवर्क्स आणि गिरणी

उद्योग व्यापार खात्यांकडे जमा धरली आहे. संस्थानमजकुरीं एकंदर आर्थिक परिस्थितींत युद्धजन्य परिस्थितीमुळें बराच फरक झाल्यामुळें स्थावर मिळकतींचे व्यवहार जास्त प्रमाणांत होऊं लागले आहेत त्यामुळें नोंदणीचें उत्पन्न १६०० रुपये जास्त धरणेंत आलें आहे.

वॉटरवर्क्स खात्यास ८००० व गिरणी, उद्योग खात्यास १२७५० इतकी जास्त जमा धरणेंत आली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळें कारखान्यांस लागणाऱ्या मालाच्या जिनसांच्या किंमती फार वाढल्या असल्याकारणानें कारखान्यांतील खर्चांत वाढ झालेली आहे. ती भरून काढणेकरितां पाण्याचे व पिलाईचे वगैरे दर वाढविणें भाग होऊन दर वाढविणेंत आले आहेत. त्यामानानें जमा जास्त धरणेंत आली आहे. इतर चार खात्यांत मिळून २३४० जमा जास्त धरणेंत आली आहे पण ती त्या त्या खात्याच्या एकंदर जमेच्या शेंकडा १० पेक्षां कमी प्रमाणांत असल्यानें त्याचीं कारणें दिलेलीं नाहींत. एकंदरीनें जमेचे बाजूस ४२४८८ कमी आणि २४५९० जास्त याची वजावट करितां निव्वळ १७८९८ जमा कमी धरणेंत आली आहे. याप्रमाणें जमेचा विचार झाल्यानंतर खर्चाच्या बाजूचा विचार करूं.

नवीन सुधारणा कायद्यांतील योजना अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें बजेटचे खर्चाकडील बाजूचे तीन भाग १९४१–४२ सालापासून झाले आहेत. वर नमुद केल्याप्रमाणें दुबेरजीच्या सर्व बाबी सोडून सन १९४२–४३ सालांत निव्वळ खर्च ७८७२०२ रुपये येत असून त्याची विभागणी खालीं दिल्याप्रमाणें होत आहे.

| | |
|---|---|
| एकूण खर्च | ७८७२०२ रुपये |
| पैकीं वजा—भाग ( अ ) खास खात्याकडील खर्च | ३०२२४१ |
| बाकी | ४८४९६१ |
| बाकी राहिलेल्या रकमेची विभागणी | |
| ( ब ) राखीव खातीं खर्च | ३२५२२१ |
| ( क ) सोंपीव खातीं खर्च | १५९७४० |
| एकूण | ४८४९६१ |
| एकूण बट्ट | ७८७२०२ |

खर्चाकडील भाग ( अ ) खास खात्याच्या खर्चाबद्दल कोणताच खुलासा सुधारणा कायद्यान्वयें करणेचा नाहीं.

खर्च भाग ( ब ) आणि ( क ) याखालीं पडणाऱ्या सर्व खात्याच्या पगारांत या सालांत वाढ दाखविण्यांत आलेली आहे. सदरची वाढ मुख्यत्वेंकरून युद्धजन्य परिस्थितीमुळें

जीवनास अवश्य अशा बहुतेक जिनसांच्या किंमती भरमसाट वाढल्यानें एकंदर नोकर वर्गाचे व त्यांतल्यात्यांत कमी पगाराचे नोकर वर्गाचे हाल फार होऊं लागले. या परिस्थितीचा विचार करून दरबारकडून दरमहा २५ रुपये पगारापर्यंतचे सर्व नोकरवर्गास कांहीं सवलत या दृष्टीनें वॉर अलावन्स मंजूर करणेंत आला आहे. या वॉर अलावन्सप्रीत्यर्थ सुमारें दरसाल १२००० पर्यंत जास्त खर्च येणार आहे. त्यापैकीं ठोकळ मानानें राखीव खात्याकडे ९००० व सोंपीव खात्याकडे ३००० असा खर्च येणार आहे. ही एक जास्त खर्चाची सर्व साधारण बाब नमूद केल्यानंतर भाग ( ब ) राखीव खात्यासंबंधानें जरूर तो खुलासा याठिकाणीं करणेंत येत आहे. भाग ( क ) सोंपीव खातीं खर्चाचें बजेट माझे सन्मान्य मित्र रावसाहेब देवधर, सोंपीव खात्यांचे मंत्री आपणांपुढें मांडतील.

भाग २ ( ब ) पैकीं पांच खात्यांत सन १९४१–४२ सालच्या अंदाजापेक्षां एकंदर मिळून ९५५७ कमी आणि चौदा १४ खात्यांत ३४४१४ रुपये जास्त असा खर्च धरला असून याची वजावट करितां निव्वळ २४८५७ रुपये जास्त खर्च धरणेंत आला आहे. जमीन-बाब खात्यांत ४१५० रु. खर्च कमी धरणेंत आला तो विशेषेंकरून रेव्हेन्यू रिफंड सदरीं कमी धरणेंत आला आहे. पूर्वीचे प्रमाणांत रिफंड सदरीं अलीकडे खर्च पडत नसल्यानें या सदरीं खर्च कमी धरला आहे. किरकोळ खात्यास किरकोळ रिफंड व वॉरलोन परत या सदरीं १००० रुपये कमी धरणेंत आले आहेत. वॉरलोन रकमा बहुतेक परत करणेंत आल्या असल्यानें त्याबाबत खर्च कमी धरणेंत आला आहे. स्पेशल खात्यांत ४३०० रु. खर्च कमी धरणेंत आला आहे. फॅमिन रिझर्व सदरीं नेहमींप्रमाणें १०००० रु. न धरतां ५००० रुपयेच धर-ल्यानें ही रकम कमी दिसते. पण अखेर बजेट मंजूर होतेवेळीं फॅमिन रिझर्व सदरीं नेहमीं-प्रमाणें १०००० रुपयेच धरण्यांत येणार आहेत. जादा खर्च धरला आहे तो पोलीस खर्च ६५२५ रुपये, व पब्लिक वर्क्सखातें ६०००, गिरणी, उद्योगखातें ७००० रुपये, व व्याज-खातें ५०००, यांजकडे धरलेला आहे. पोलीसखात्यावरील वाढ मुख्यत्वेंकरून वॉर अलावन्स-मुळें आहे. पी. डब्लू. खात्यांतील वाढ कांहीं वॉर अलावन्स व कांहीं स्पेशल रकम बेंचीचे फर्शीकरितां धरण्यांत आली आहे. गिरणी उद्योगखात्यांकडील ७००० वाढ विशेषेंकरून कारखान्यास लागणाऱ्या जिनसांच्या किंमती फार वाढल्या आहेत, त्याची भरती करण्या-करितां आहे. व्याजखातीं ५००० रुपये जास्त धरणेंत आले आहेत. ते स्टेट बँक खातीं फिक्स्ड डिपॉझिटच्या रकमा जास्त प्रमाणांत आल्या असल्यानें त्याचें व्याज द्यावें लागणार असल्यानें त्याकरितां जास्त खर्च धरणेंत आला आहे. अर्थात् अशा डिपॉझिट रकमा कर्ज-रूपानें व्याजीं लावलया जातात व त्याचें व्याज येऊन द्यावें लागणारे व्याजाची भरती होतच असते. अशा रीतीनें विशेष रीतीनें जास्त खर्च धरले रकमेचीं कारणें आहेत. त्याशिवाय इतर १० खात्यांत मिळून ९८८९ रुपयांची खर्चांत वाढ आहे. ती त्या त्या खात्यांतील एकंदर खर्चाचे शेंकडा १० पेक्षां कमी असल्यानें त्याचीं कारणें दिलेलीं नाहींत. याप्रमाणें खर्चाचे ( ब ) विभागासंबंधानें सर्व साधारण तपशील आहे. बजेट खर्च भाग ( क ) बाबत खुलासा वर नमूद केल्याप्रमाणें सोंपीव खात्याचे मंत्री आपणांपुढें मांडतील.

याप्रमाणें एकंदर बजेटाचा स्थूलमानानें अहवाल आहे. संस्थानमजकुरीं १/४ सूट देणेची प्रथा सुरू झाल्यास सन१९४१-४२अखेर चार वर्षें पुरी झालीं.त्या चार वर्षांत सर्वसाधारणपणें ५००००० पर्यंत सूट रयतांचे पदरांत पडली. ती अर्थात् संस्थानचे कायम उत्पन्नांत तूट पडूनच पडली. उत्पन्नांतील या तुटीपैकीं १/४ ते १/३ भाग संस्थानांत जमीनबाबीबद्दल जुन्या बाक्या ओढत आल्या होत्या त्यांपैकीं कांहीं भाग सुटीची सवलत देऊन बाकी वसूल झाला, त्यानें भरून काढण्यांत आला. कांहीं तूट शाळा व दवाखाने यांत फी बसवून भरून काढणेंत आली. गेल्या २-३ वर्षांत रयतांची आर्थिक स्थिति सुधारल्यानें स्थावर किंमतीचे व्यवहार सर्वसाधारण वाढून स्टॅांप व नोंदणी खात्याचें उत्पन्न मध्यंतरीं कमी पडलें होतें तें पूर्वीप्रमाणें येऊं लागलें. त्याचीही मदत तूट भरून निघणेस झाली. बाकी राहिलेली म्हणजे कमींत कमी निम्मी तूट संस्थानचे सर्व खात्यांचे खर्चांत अत्यंत काटेकोर अशी काटकसर व बचत करूनच भरून काढणेंत आलेली असून संस्थानची सांपत्तिक परिस्थिति १९३७-३८ सालअखेर ज्या पातळीवर होती त्या पातळीपेक्षां विशेष-अशी खालीं न जाऊं देणेची खबरदारी घेणेंत आलेली आहे.

R. K. Bhagwat,
दिवाण संस्थान जमखंडी

मी आतांपर्यंत केलेल्या विवेचनांतील बराचसा मोठा भाग आंकड्यांसंबंधीं असल्यानें तो एका वाचनानें कदाचित् आपल्या लक्षांत राहाणार नाहीं. म्हणून सर्व विवेचन 'बजेट-नोट' स्वरूपांत छापून घेणेंत आलें असून, त्याच्या प्रती आपणांस वांटण्यांत येत आहेत. बजेट हा विषय कंटाळवाणा, व त्यांत माझें भाषणहि जरा जास्त लांब झालें आहे. अशा स्थितींत आपण तें शांतपणें ऐकून घेतलें त्याबद्दल आपणां सर्वांचे आभार मानून मी माझें भाषण पुरें करतों."

त्यानंतर रा. सा. मंत्री यांनीं सोंपीव खात्याचें बजेट मंडळापुढें मांडलें.

"मे. अध्यक्ष व सन्मान्य सभासद, आपणांपुढें सोंपीव खात्याचें बजेट मांडणेपूर्वी गेल्या सालीं काय काय योजना आंखल्या व त्यांपैकीं काय काय कामें झालीं याचा थोडक्यांत आढावा घेतों.

प्रथम शिक्षणखात्यासंबंधीं विचार करूं. या खात्यासंबंधीं मुख्य बाब म्हणजे ग्रँट-इन-अेडप्रमाणें तीन शाळा चालू केल्या आहेत. त्यांपैकीं अेक बेटदूर, दुसरी कुंदगोळ व तिसरी जमखंडी. यांशिवाय कुंदगोळ येथें शाळांमधून ड्रिल व पी. टी. चा उपक्रम चालू केला आहे. अर्थात् हा नवीन उपक्रम आहे. असाच उपक्रम इतर शाळांमधून सुरू झाल्यास त्याला सरकारकडून योग्य ती मदत मिळेल. हरिजनादि मागासलेल्या जातींतील उमेद्वारांना नौकऱ्या देण्याचें धोरण ठेविलें असून त्याप्रमाणें तीन उमेद्वारांना नोकऱ्या देण्यांत आलेल्या आहेत. आज या ठिकाणीं साक्षरतेसंबंधीं प्रश्न विचारण्यांत आला असून त्याला योग्य असें उत्तरहि देण्यांत आलें आहे. हल्लींचा जो शिक्षणक्रम आपल्याकडे आहे तो मुंबई विश्वविद्यालयाचा असल्या-

मुळें त्या शिक्षणक्रमाच्या बाहेर आपल्याला बिलकूल जातां येत नाहीं. तसें पाहिलें तर आपला हा देश शेतीप्रधान आहे व त्याकरितां आपल्या शाळांतून शेतीचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. निदान खेडेगांवांतील शाळांतून तरी शेतीचें शिक्षण देणें अगत्याचें आहे. तथापि आपल्या मनांत असूनहि, शाळा मुंबई विश्वविद्यालयास जोडल्या असल्यामुळें त्यांत बदल करतां येत नाहीं. औद्योगिक शिक्षणाचेहि बाबतींत अशीच अडचण आहे. जोंपर्यंत आपल्या शाळा मुंबई विश्वविद्यालयाच्या कार्यक्रमाप्रमाणें चाललेल्या आहेत तोंपर्यंत कांहींही बदल करतां येत नाहीं.

वैद्यक खात्यासंबंधीं बोलावयाचें झाल्यास, गेल्या वर्षी कॉलऱ्याची सांथ जास्त प्रमाणांत आपल्याकडे होती. तथापि ती तावडतोबीचे उपाय अमलांत आणून हटविली होती. गेल्या वर्षी बजेटमध्यें आकस्मिक बाबींसाठीं कांहीं रक्कम धरली नव्हती. तरीपण ९८० रु. इतकी रक्कम सरकारनें या कॉलऱ्याच्या कामासाठीं स्पेशल म्हणून दिली त्याबद्दल श्रीमंतांचे आम्ही आभारी आहोंत. यावर्षी कॉलऱ्यापासून उपसर्ग होऊं नये व झाल्यास त्यावर तावडतोब इलाज करतां यावे म्हणून प्रत्येक प्रमुख गांवीं औषधाच्या पेट्या ठेविल्या आहेत. या पेट्यांमधून इतरहि जरूर तीं औषधें ठेवण्याची व्यवस्था केली आहे. या पेट्या शाळांतील शिक्षकांकडे देण्यांत आलेल्या आहेत व त्यांना जरूर ती माहिती देण्यांत आली आहे. या योजनेमुळें खेड्यांतील लोकांची औषधाची सोय होणार आहे. अशा तऱ्हेनें वैद्यकीय खात्यामध्यें जेवढ्या सोयी करतां येतील तेवढ्या केल्या आहेत. तसेंच डॉक्टर लोक आसपासच्या खेड्यांत व्हिजिटला जातील तेव्हां या खेड्यांत जे रोगी असतील त्यांची विचारपूस करण्याबद्दल सांगितलें आहे. तथापि जनतेच्या हिताच्या दृष्टीनें याहिपेक्षां जास्त सोयी झाल्या पाहिजेत ही गोष्ट निर्विवाद आहे, परंतु बजेटच्या सवडीप्रमाणें जरूर त्या सोई करतां येतील येवढेंच आश्वासन देतों.

यानंतर शेतकी खात्याकडे वळूं. चांगल्या जनावरांची पैदास कशी होईल. याचें निरीक्षण करून त्याचा जनतेला उपयोग करतां येईल या दृष्टीनें Bombay Govt. च्या शेतकी खात्याच्या सल्ल्यानें विचार चालू आहे. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनतर्फें लोखंडी नांगर शेतकऱ्यांना मिळण्याची तजवीज करण्यांत आली आहे.

जंगल खात्यासंबंधीं सांगावयाला आनंद वाटतो कीं, जंगलकटाई बंद करण्यांत आली आहे. ओलीं लांकडें तोडण्याचीं अजीबात बंद करण्यांत आलीं आहेत. कोळसा करण्याची प्रथा बंद पाडली आहे. यापुढें कोळसा तयार करण्याला परवानगी मिळणार नाहीं. याचा परिणाम अलीकडे लांकडें महाग झालीं आहेत. सहा रुपये खंडी असा आज लांकडाचा भाव आहे. त्याचप्रमाणें नवीन झाडांची लागवड करण्यांत आली आहे. जंगलकटाई बंद झाल्यानें व नवीन झाडांची लागवड केल्यामुळें पावसाचें प्रमाण वाढेल. जंगल वाढल्यानें ढग आकर्षिले जातील व त्यामुळें पाऊस चांगला पडेल. पाऊस चांगला झाल्यानें शेतीहि चांगली होईल. स. स. सोहनी म्हणतील, आमच्या गांवीं काय केलें आहे? मी नुकताच वाठारला जाऊन आलों आहें. त्यांच्या गांवीं २० इंच पाऊस पडतो व तेवढा तेथें शेतीला पुरेसा होतो. तेव्हां तेथें अधिक कांहीं करावयास पाहिजे असें मला वाटत नाहीं. सावळगीला गवताचीं

कुरणें राखण्याचा विचार चालू आहे; व या दृष्टीनें मुंबई सरकारच्या फॉरेस्ट खात्याकडून लिटरेचरहि मागविलें आहे. लांकडें तोडण्यास बंदी केल्यामुळें लांकडाचा भाव वाढलेला आहे. आज जरी थोडासा लाकडाचा भाव वाढला असला तरी त्यामुळें विशेषसें नुकसान होणार नाहीं. कारण लांकडें शहरांतील लोकच फार करून वापरतात. खेड्यांतील लोकांना लांकडाचा उपयोग होत नाहीं. ते शेणी किंवा चापडी वापरतात. तेव्हां आपण थोडी झीज सोसला पाहिजे. अर्थात् या बाबतींत आपणां सर्वांचें सहकार्य पाहिजे. याप्रमाणें १० वर्षें तरी गेलीं पाहिजेत तरच झाडांची वाढ होईल. ही एक दशवार्षिक योजनाच आहे.

या नंतर सार्वजनिक आरोग्य. सार्वजनिक आरोग्यखात्यांत सॅनिटेशन कमिट्यांचा समावेश होतो. कांहीं ठिकाणीं सॅनिटेशन कमिट्या पूर्वींच्या चालू असून कांहीं ठिकाणीं नवीन स्थापन कराव्या लागल्या आहेत. या कमिट्यांच्या सहाय्यानें व लोकांच्या मदतीनें कांहीं ठिकाणीं विहिरी बांधण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें कांहीं तयार करण्यांत आले आहेत. कुंदगोळ सॅनिटेशन कमिटीच्या गांवीं महारांची विहीर नाहीं. तेथील एक सद्गृहस्थ श्री. टेंबे यांना विनंति केल्यावरून त्यांनीं आपली विहीर हरिजनाकरितां देण्याचें कबूल केलें आहे. त्यांचें या बाबतींत मला पत्र आलें आहे तें मी आपणास वाचून दाखवितों. ( पत्र वाचतात ) तेथील हरिजनांच्या पाण्याच्या व्यवस्थेसंबंधीं माझ्या स्वतःवर मोठी जबाबदारी होती; ती अशा रीतीनें पार पडली आहे. त्यांनीं आपणांस मोफत विहीर दिली आहे याबद्दल श्री. टेंबे यांचें आपण अभिनंदन केलें पाहिजे.

वजनें मापें:—हा प्रश्न थोडासा घोटाळ्याचा व नाजूक असा आहे. तथापि तो मुंबई-सरकारच्या मदतीनें सोडाविण्याचें ठरलें आहे; व त्याप्रमाणें मुंबई सरकारशीं Correspondence चालू आहे. ( अपूर्ण )

## उपाहारानंतर

कोऑपरेटिव्ह सोसायट्या, ग्रामसुधारणा वगैरे खात्यांतहि समाधानकारक प्रगति झालेली आहे. ग्रामसुधारणाच्या दृष्टीनें कांहीं ठिकाणीं विहीरी व ॲप्रोच रोड्स तयार केले आहेत.

यानंतर प्रमुख खातें म्हणजे पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट. युद्धजन्य परिस्थितीमुळें सर्वच वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या आहेत. कागद व इतरी स्टेशनरीहि बरीच महाग झाली आहे; त्यामुळें पुष्कळच काटकसर करणें भाग पडलें आहे. या वर्षी ९० मैलांचा रस्ता दुरुस्त करण्याचें ठरविलें आहे आणि त्यासाठीं १२ हजार रुपये खर्च येईल. ॲप्रोच रोड्स संबंधीं आम्हीं पंचवार्षिक योजना आंखली आहे. त्यासाठीं ७० हजार रुपये खर्च येणार आहे. ॲप्रोच रोड्स हे आसपासच्या स्थानिक लोकांनीं सरकारचे सहाय्यानें तयार केले पाहिजेत. या बाबतींत स्थानिक लोकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. म्हणजे सरकारकडूनहि त्यांना योग्य अशी मदत मिळेल. बेळगांव जिल्ह्यांत चंदनगड तालुक्यांत ॲप्रोच रोड्ससंबंधीं प्रश्न उपस्थित झाला होता. सरकारचें म्हणणें होतें कीं, लोकांनीं रस्ते तयार करावे व लोकांचें त्याला

म्हणणें होतें सरकारनें तयार करावे. शेवटीं लोकांनीं पुढाकार घेऊन सरकारच्या मदतीनें रस्ते तयार केले आहेत. दिल्लीच्या रोड कॉन्फरन्सचे अध्यक्ष मि. ग्रो साहेब यांचेंहि असेंच म्हणणें आहे कीं, ॲप्रोच रोडस् स्थानिक लोकांनीं पुढाकार घेऊन सरकारच्या मदतीनें तयार केले पाहिजेत. यानंतर पाण्याच्या कामा कडेहि कांहीं रक्कम धरलेली असून कुंदगोळ, अल्लापूर येथील तलाव दुरुस्त केले आहेत. जमखंडी तालुक्यांत हुल्याळगांवीं पाण्याची व्यवस्था केली आहे. नावेचींहि बरींच कामें झालीं आहेत. इमारतींचींहि दुरुस्तीवजा लहान लहान कामें झालीं आहेत शिवाय कांहीं ठिकाणीं मुऱ्या बांधलेल्या आहेत. चावड्या बांधण्याचींहि कामें चालू आहेत. चावड्यांचा जनतेला चांगलाच उपयोग होतो. चावड्या ह्या वसुली करण्यासाठीं असतात, तथापि लोकांना एकत्र येऊन विचारविनिमय करण्यासाठीं ही स्वतंत्र अशी जागा मिळते. यानंतर धर्मशाळा व देवळें यांचींहि कामें चाललीं आहेत. अशारीतीनें हा सोपिव खात्याचा कारभार चाललेला आहे.

चालू वर्षाचें सोपीव खात्याचें अेकूण बजेट १५९७४० रु. इतक्या रकमेचें आहे, त्यापैकीं १०५८१० रु. इतक्या रकमेसंबंधीं आपल्याला बोलतां येणार नाहीं. कारण पगार, सादील भत्ता यांसाठीं ही रक्कम आहे व त्यावर आपल्याला कायद्यानेंच बोलतां येत नाहीं.तेव्हां राहिलेल्या ५३९३० रु. इतक्या रकमेला आपली मंजुरी पाहिजे आहे. खरोखर हें बजेट प्रजेच्या हिताच्या दृष्टीनेंच तयार केलें आहे. तथापि हें बजेट खर्चाचेंच असल्यामुळें ह्यासाठीं कितीहि रक्कम मिळाली तरी त्यासाठीं आणखी मागणी ही कायम रहाणारच. गेल्या वर्षीच्या अेकंदर कामाचा आढावा आपणांपुढें ठेविला आहे, त्यावरून आपल्या सर्व लक्षांत येईलच, यापेक्षां अधिक कांहीं आपणांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. येवढें सांगून माझें भाषण संपवितों.

मे. अध्यक्षः—आतां बिलें घ्यावीं.

## रावसाहेब न्यायमंत्री जमखंडी यांचें बिल

**कारणें व हेतू**:—जमखंडी तालुक्यांत विशेषतः सावळगी भागांत तुंगळ व काजिबिळगी आणि टक्कळगी अशा तीन सोसायट्या निघाल्या असून त्या चालू आहेत. सावळगी व कनोळी येथें सोसायट्या स्थापन लवकर होणेचा विशेष संभव आहे. वरीलपैकीं एकापेक्षां जास्त गांवांत बऱ्याच लोकांची शेती पसरली आहे. तेव्हां अशापैकीं कोणासही दोन सोसायटींचा मेंबर होणें अशक्य नाहीं व तसा मेंबर झाल्यावर दोन्हीं सोसायटींतून कर्ज घेणेचा त्यास सहजच मोह उत्पन्न होईल. एकापेक्षां जास्त सोसायटीचे सभासद होणें व एकापेक्षां जास्त सोसायटींतून कर्ज घेणें, या गोष्टीमुळें पुढेंमागें वसुलीचे बाबतींत अनवस्था प्रसंग उत्पन्न होऊन घोटाळा होणेचा संभव आहे. तरी याप्रमाणें करणें त्यास सुलभप्राय होऊं नये म्हणून कायद्यानें तसा निर्बंध घालणें जरूर आहे. तेव्हां जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळ्याबाबतचा कायदा १९३८ चा ४ यांत खालीलप्रमाणें दोन ठिकाणीं दुरुस्त्या सुचविणेंत येत आहेत.• ब्रिटिश हद्दींत असे निर्बंध घालण्यांत यावे असा मुंबई सरकारचा ठराव झाला आहे. त्याचा तेवढ्यापुरतां उतारा यालगत ठेवला आहे.

Membership of two societies with unlimited liability prohibited. No person being a member of a society formed on a basis of unlimited liability shall be a member of any other society formed on a similar basis without the special or general sanction of the Registrar; and where a person has become a member of two such societies, either or both of the societies shall be bound to remove him from membership upon a requisition from the Registrar to that effect.

## बिल

१ या कायद्यास सन १९४२ चा जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळयांबाबतचा कायदा १९३८ चा ४ यांत दुरुस्ती करण्याचा कायदा असें म्हणावें.

## व्याप्ति

२ हा कायदा सगळ्या जमखंडी संस्थानास लागूं आहे.

३. मूळ कायद्याचें कलम २२ यास खालीं दाखल केलेली शर्त ( Proviso ) लागूं करण्यांत यावी.

" मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणाही एका व्यक्तीस एकापेक्षां अधिक अनियमित जबाबदारीच्या मंडळयाचा सभासद् रजिस्ट्रारच्या विशेष मंजुरीवांचून होतां येणार नाहीं. असा एखादा इसम अनेक मंडळयांचा सभासद् तशा मंजुरीवांचून झाला असेल तर त्यास एका व्यतिरिक्त बाकीच्या मंडळींतून किंवा सर्व मंडळयांतून काढून टाकणेचा त्या त्या मंडळयांस हुकूम करणेचा अधिकार रजिस्ट्रारास राहील. सदरप्रमाणें केलेल्या हुकुमाची अंमलबजावणी करणें मंडळास भाग आहे."

४. मूळ कायद्याचें कलम ३४ यांत नवीन पोट. कलम ( ४ ) खालीलप्रमाणें घालणेंत यावा.

( ४ ) कोणत्याही पतपेढीनें जमखंडी संस्थान सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक अगर सदर संस्थेची शाखा या व्यतिरिक्त दुसऱ्या इसमाकडून कर्ज काढावयाचें असल्यास सदर बँकेची अगर सदर बँकेच्या शाखेची तसें करण्यापूर्वी आगाऊ मंजुरी घेतली पाहिजे.

रा. सा. पटवर्धनः—आपणांपुढें जें बिल मी मांडणार आहें तें सर्वांना पसंत होण्या सारखें आहे. कोणतेंहि बिल मंडळापुढें मांडतांना त्याला सर्वसामान्य परवानगी घेऊन मांडावें लागतें. परंतु हें बिल स्वतंत्र असें नाहीं. १९३८ सालीं जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळयांबाबतचा जो कायदा झाला त्या कायद्यांत एक कलम अॅड करावें या हेतूनें हें बिल आणलें आहे. दुरुस्तीवजा हें बिल आहे. या कायद्यास १९४२ चा जमखंडी संस्थानचा सहकारी मंडळयांबाबतचा कायदा १९३८ चा ४ यांत दुरुस्ती करण्याचा कायदा असें म्हणावयाचें आहे. मी आपणांस हें बिल वाचून दाखवितों.

( बिल वाचतात )

या बिलाचा मुख्य हेतु असा आहे कीं, अलिकडे बहुतेक प्रमुख गांवांतून कोऑपरेटिव्ह सोसायट्या स्थापन झाल्या आहेत व आणखींही त्या स्थापन होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें एकापेक्षां अनेक गांवांत बऱ्याच लोकांच्या जमिनी आहेत तेव्हां अशांपैकीं अेकाद्या गृहस्थास दोन ठिकाणच्या सोसायट्यांचा सभासद होतां येईल; व तसा तो सभासद झाल्यानें दोन्ही ठिकाणच्या सोसायटींतून कर्ज घेण्याचा त्याला प्रस्तुत कायद्यानें अधिकार आहे. तेव्हां दोन्ही ठिकाणीं त्याला कर्ज घेण्याचा मोह उत्पन्न होऊं नये व पुढेंमागें वसुलीचे बाबतींत घोटाळे माजूं नयेत म्हणून हें दुरुस्त बिल आणलें आहे. या दुरुस्त बिलान्वयें त्याला अेकाच ठिकाणच्या सोसायटीचा सभासद होतां येईल व त्याला त्याच ठिकाणीं कर्ज काढतां येईल; व अशा रीतीनें काढलेलें कर्ज त्याला सहज फेडतां येईल. अनेक ठिकाणीं सभासद होऊन कर्ज मिळण्याची व्यवस्था असल्यानें त्याला जास्त ठिकाणीं कर्ज काढण्याचा मोह उत्पन्न होईल; व शेवटीं कर्ज फेडणें त्याच्या आवांक्याबाहेरचें होईल. शिवाय दुसरीकडून खाजगी अगर बँकेकडून त्याला कर्ज घ्यावयाचें असेल तर सेंट्रल बॉडीला तसें कळविलें पाहिजे. केवळ त्याची पत राखण्याकरितांच हें तत्त्व आहे. आपणां सर्वांस हें माहीत आहे कीं, पुष्कळ लोक सध्यां पैशाचे अडचणींत असतात. शेतकी ॲक्ट झाल्यामुळें सावकार लोक द्यायला भितात. अशा वेळीं को–ऑपरेटिव्ह सोसायट्यांकडील कर्ज काढल्याशिवाय गत्यंतर नसतें. पुढील होणाऱ्या पिकाच्या आधारावर शेतकरी कर्ज काढतात. कोणता माणूस सच्चा आहे व कोण लुच्चा आहे हें तेथील गांवांतील मंडळींनाच समजूं शकेल. बाहेरच्या मंडळींना समजणें शक्य नसतें. शिवाय एखाद्या माणसाची त्याला कर्ज देण्याइतकी वैयक्तिक पत नसते, तथापि त्याचा कॅरेक्टर, ऑनेस्टी वगैरे गुण पाहून त्याला कर्ज दिलें जातें. सेंट्रल बॉडीज को–ऑपरेटिव्ह सोसायट्यांना पैसा पुरवितात तेव्हां ह्या सोसायट्या सेंट्रल बॉडीज्च्या ताब्यांत राहणें जरूर असते. हा ॲक्ट पास झाला त्यावेळीं एक कमिटी नेमली होती. तिनें पुष्कळ सूचना केल्या होत्या, त्यांस अनुसरून ही दुरुस्ती सुचविली आहे. ब्रिटिश इंडियांतहि असे निर्बंध घालण्यांत आले आहेत. अनेक ठिकाणच्या सोसायट्यांचा सभासद होऊन आवांक्याच्या बाहेर कर्जें घेतल्यामुळें व दिल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं पश्चात्ताप करण्याची पाळी आली आहे. कोणत्याहि तऱ्हेनें लोकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्याकरितां हा कायदा नसून त्याची पत कायम राहावी येवढ्यासाठींच हें बिल आणलें आहे. हें बिल नियमाप्रमाणें स्टेटगॅझेटांत प्रसिद्धहि करण्यांत आलें आहे. वास्तविक नियमाप्रमाणें हें बिल मांडल्यानंतर २४ तासांनीं त्यांचें पहिलें वाचन व्हावें असें आहे. तथापि कोणाचे objection नसेल तर मे. अध्यक्षसाहेबांना पहिल्या वाचनास परवानगी द्यावी अशी मी विनंति करणार आहें.

मे. अध्यक्षः— याला कोणाची हरकत आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) नाहीं. या बिलाच्या पहिल्या वाचनास मंजुरी आहे; तेव्हां पहिलें वाचन करावें.

स. स. सोहनीः—मला या बाबतींत थोडासा खुलासा विचारावयाचा आहे. हें बिल आणण्यांत सरकारचा हेतु स्तुत्य आहे याबद्दल शंका नाहीं. अेकाच मनुष्यानें अनेक ठिकाणीं

को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचा सभासद होऊन अनेक ठिकाणीं कर्ज घेण्याच्या मोहांत पडूं नये अशा उदात्त हेतूनें हें बिल मंडळापुढें आणलें आहे. परंतु या बिलानें अडचण अशी उत्पन्न होणार आहे कीं, अेकाद्या माणसाला आज शंभर रुपयांची जरूरी आहे म्हणून तो सोसायटीचा सभासद होईल व सोसायटीकडून कर्ज मिळवील. परंतु पुढें हे शंभर रुपये कर्ज फेडण्यापूर्वी कांहीं आकस्मिक कारणामुळें त्याला आणखी ५०० रु. ची जरूरी भासली तर त्याला त्याची प्रॉपर्टी असूनहि त्याला सोसायटीकडून कर्ज मिळणार नाहीं अशी या नवीन बिलानें आपत्ति ओढवणार आहे. सध्यां प्रचलित असलेल्या कायद्यांमुळें त्याला दुसरीकडे सोसायटीचा सभासद होऊन तेथील प्रॉपर्टीच्या आधारावर कर्ज मिळूं शकतें. तेव्हां ही अडचण दूर करण्यासाठीं जरूर तीं दुरुस्ती करावी.

रा. सा. पटवर्धनः—ज्या गांवांत जास्त मिळकत असेल त्या गांवांत त्यानें सभासद व्हावें.

स. स. सोहनीः—मनुष्यावर येणाऱ्या आकस्मिक आपत्ती त्याला आगावू कळून येत नाहींत.

रा. सा. पटवर्धनः—तशी एकादी स्पेशल केस असल्यास, रजिस्ट्रारसाहेब सहानुभूतिपूर्वक विचार करतील.

स. स. सोहनीः—परंतु तें रजिस्ट्रारसाहेबांच्या मर्जीवर अवलंबून राहील. माझा सांगण्याचा उद्देश अेवढाच कीं, माझी वाठारला मिळकत आहे त्यावर मला वाठारला कर्ज मिळूं शकतें. तसेंच माझी मिळकत कुंदगोळला आहे तेथें मला कां कर्ज मिळूं नये? मला तेथें कां सभासद होतां येऊं नये?

रा. सा. पटवर्धनः—सभासद न होतां तारणावर कर्ज घ्यावें.

स. स. सोहोनीः—मी सावकारांच्या दृष्टीनें बोलत नाहीं; शेतकऱ्यांचे दृष्टीनें बोलत आहें. अेकच मनुष्य अनेक ठिकाणीं आपली पत दाखवून कर्ज काढतो व नंतर तो बुडवितो; तेव्हां ती आपत्ति टाळावी म्हणून हें दुरुस्ती बिल आणलें आहे. परंतु अेक आपत्ति टाळतां टाळतां दुसरी आपत्ति उत्पन्न होते. ती टाळतां आली पाहिजे. तेव्हां माझं म्हणणें असें आहे कीं, अेका गांवांत जी प्रॉपर्टी असेल तेवढीच पाहून त्याला कर्ज द्यावें; त्यावेळीं त्याची दुसऱ्या गांवांत प्रॉपर्टी आहे किंवा नाहीं याचा विचार करूं नये.

रा. सा पटवर्धनः—सध्यां अमलांत जो कायदा आहे तो अन्‌लिमिटेड् लायबिलिटीच्या दृष्टीनें पाहातां आपला विरोध मूळ तत्त्वावरच आहे, तेव्हां आपण अेक वर्ष या दुरुस्तीमुळें काय काय होतें तें पाहूं. आणि या बाबतींत अधिक अडचणी येऊं लागल्या तर तशी पुढें दुरुस्ती आणतां येईल.

स. स. शिंदेः—स. स. सोहनी म्हणतात त्याप्रमाणें यांत खरोखरच अडचण येईल असें मला वाटत नाहीं.

मे. अध्यक्षः—जेव्हां सोसायट्या कर्ज देतात तेव्हां तें कशाकरितां पाहिजे हें लिहून घेतात काय?

रा. ब. दिवाण:—होय.

स. स. सोहनी:—माणसाची पत पाहून सोसायट्या कर्ज देतात.

स. स. शिंदे:—तुमची दहा हजारांची प्रॉपर्टी असेल तर त्याप्रमाणें तुम्हांला कर्ज मिळेल. त्यांत अडचण येणार नाहीं.

स. स. सोहनी:—अडचण येणार नसली तर माझी कांहीं हरकत नाहीं. खेडेगांवांतील स्थितीचा आपण विचार केला पाहिजे.

मे. अध्यक्ष:—अगोदर पहिलें वाचन होऊं द्या आणि मग जी काय दुरुस्ती असेल ती सुचवा.

स. स. सोहोनी:—हरकत नाहीं.

रा. सा. पटवर्धन:—( बिल वाचतात ).

**पहिलें वाचन मंजूर करावें अशी विनंति आहे.**

मे. अध्यक्ष:—पहिलें वाचन मंजूर करण्याला कोणाचा विरोध आहे काय? ( थोडा वेळ थांबून ) नाहीं. कोणाचा विरोध नसल्यामुळें पहिलें वाचन मंजूर झाल्याचें जाहीर करतों. आतां ठराव घ्यावे.

**स. सभासद, रा. सा. न्यायमंत्री यांचा बिलस्वरूपी ठराव नं. १**

"ब्रिटिश हिंदुस्थानांत लागू असलेला क्रिमिनल प्रोसिजर कोड सुधारणेचा इंडिया ॲक्ट नंबर १५ सन १९४१ इसवीचा जरूर त्या फेरफारांसह लागू करावा अशी श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना हें मंडळ शिफारस करीत आहे."

मे. अध्यक्ष:—याला कोणाचा विरोध असण्याचें कारण नाहीं; सबब हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

**स. स. वाटवे यांचा श्रीमंत भाऊसाहेब बावडेकर यांच्या निधनानिमित्त दुखवट्याचा ठराव**

"( अ ) बावडा संस्थानचे तरुण आधिपति श्रीमंत भाऊसाहेब हे अकालीं वारल्यानें या सभेस अत्यंत दुःख होत असून सदरहू सभा बावडेकर यांचे राजघराण्यांतील मंडळीचे दुःखांत सहभागी आहे.

( ब ) सदरहू दुखवट्याचा ठराव बावडा जहागिरीकडे मे. रा. ब. अध्यक्ष यांचेकडून पाठवण्यांत यावा असें या सभेचें मत आहे.

मे. अध्यक्ष:—आपण सर्वांनीं उभे राहून हा ठराव मंजूर करावा. ठराव मंजूर.

**स. स. सौ. लक्ष्मीबाई आपटे यांचा ठराव नं. १**

"हल्लीं असलेली मुलामुलींची प्राथमिक शाळा व इंग्रजी एक ते तीन इयत्तांपर्यंतची शाळा एक वेळ दुपारीं एक ते पांच वाजेपर्यंत भरविण्यांत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे."

स. स. चि. वि. आपटे यांचा ठराव नं. १ हा अशाच स्वरूपाचा असल्यानें त्यांनीं तो मे. अध्यक्षांचे परवानगीनें परत घेतला.

स. स. सी. व्ही. आपटेः—आपणांपुढें स. स. सौ. लक्ष्मीबाई आपटे यांनीं हा जो ठराव मांडलेला आहे तो सकृद्दर्शनीं थोडासा विचित्र असा वाटणारा आहे; तथापि तो ठराव मूलगामी स्वरूपाचा आहे. प्राथमिक शाळांची सध्यां जी वेळ आहे ती विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें बरोबर नाहीं. सध्यां प्राथमिक शाळांची वेळ सकाळीं ७॥ ते ९॥ व दुपारीं २ ते ५ अशी आहे. दोन्ही वेळां शाळेंत जावें लागल्यानें घरीं दिलेला अभ्यास मुलांकडून होत नाहीं. हीं मुलें लहान असल्यामुळें सकाळीं ९॥ वाजतां शाळेंतून आल्यावर दुपारीं जेवण होईपर्यंत त्यांचा कांहीं अभ्यास होत नाहीं. व दुपारीं जेवण झाल्यावर तावडतोब थोड्या वेळांत पुन्हा शाळेंत जाणेची वेळ होते. संध्याकाळीं पांच वाजल्यानंतर तीं मुलें शाळेंतून आल्यावर त्यांनीं अभ्यास करावा अशी कोणतीहि शिक्षण देणारी संस्था किंवा शिक्षणाधिकारी म्हणणार नाहीं. बरें रात्रीं आठच्या नंतर लहान मुलांकडून अभ्यास होईल अशी अपेक्षाच करणें चुकीचें होईल. सध्यां प्रचलित असलेल्या वेळेमध्यें विद्यार्थ्यांना अभ्यासाला कोणत्याहि प्रकारची सवड दिलेली नाहीं. मुलांच्या दृष्टीनें एकाग्र अशी सकाळचीच वेळ आहे; व तीच त्यांना अभ्यास करण्यास सोयीची व योग्य अशी वेळ होय. शिवाय १ ते ५ ही वेळ मुलांना शाळेंत जाण्याच्या दृष्टीनेंहि सोयीची आहे. अशी प्रथा पडल्यानंतर चार तास अवधी शिक्षण देण्यास मिळतो व तेवढा पुरेसा आहे. शिक्षण देण्याकरितां येवढी वेळ अपुरी होईल ही गोष्ट संभवनीय नाहीं. शिवाय घरांतील मंडळींना आपल्या मुलांवर लक्ष देण्यास संधि सांपडेल. तेव्हां याचा विचार करून सर्व सन्मान्य सभासदांनीं या ठरावाला मंजूरी द्यावी अशी विनंति आहे.

रा. सा. देवधरः—या ठरावाला विरोध करण्याकरितां मी उभा राहिलों आहें. पांच-सहा वर्षांपूर्वी असा ठराव आला होता; त्यावेळीं पुष्कळ चर्चा झाली. आणि शेवटीं आहे ह्या वेळांत बदल करूं नये असें ठरलें. त्यानंतर गेल्या ५।६ वर्षांत इतकी एकदम परिस्थिति पालटलेली आहे असें नाहीं. आज कोठेंहि १ ते ५ अशा वेळेंत भरणाऱ्या शाळा नाहींत. सर्वसामान्य ११॥ ते ५॥ अशाच सर्वत्र शाळा आहेत. अशा स्थितींत आपण हा नमुना काढला आहे तो बरोबर नाहीं. त्याला मागचा पुढचा कांहीं संबंध आहे असें नाहीं. आपण ठरावांत नमूद केलेल्या वेळेप्रमाणें कोठें शाळा चाललेल्या आहेत तर उदाहरण दाखवा. पुणें, मुंबई, हुबळी—कोठलेंहि उदाहरण दाखवा. आहे या वेळेंत फरक केला पाहिजे असें मला वाटत नाहीं. शिवाय बाल विद्यार्थ्यांना चार चार तास सतत वर्गांत ठेवणें हें बरोबर नाहीं. तेव्हां आपण हा ठराव मागें घेतला तर बरें होईल.

स. स. वाटवेः—मागें ज्यावेळीं असा ठराव आला होता त्यावेळीं पुष्कळ उहापोह व चर्चा झाली होती. त्यावेळीं डॉ. गोखले हे बेळगांवला सिव्हिल सर्जन होते. त्यांनीं सकाळ-संध्याकाळ अशा दोन वेळा शाळा भरविण्यांत याव्या

अशासंबंधीं पुष्कळ चळवळ केली होती. त्याप्रमाणें कांहीं ठिकाणीं सकाळ-संध्याकाळ शाळा भरविण्यांत येत असत. सकाळ-संध्याकाळ अशा दोन्ही वेळा शाळा भरवाव्या असा प्रजा-परिषदेचाहि ठराव झाला होता.

स. स. सोहनी:—या ठरावांत मुलें-मुली हा जो घोटाळा आहे त्यासंबंधीं खुलासा करावा.

स. स. सौ. आपटे:—इतर ठिकाणीं सहशिक्षण नाहीं; त्या ठिकाणीं मुलांना व मुलींना अशा निरनिराळया स्वतंत्र शाळा असतात. परंतु आपणाकडे सहशिक्षण आहे. मुलांमुलींना एकत्रच शिक्षण देण्यांत येतें.

रा. सा. पटवर्धन:—या बाबतींत मी आपल्याला धारवाडचा अनुभव सांगतों. धारवाडला सकाळ-संध्याकाळ अशा दोन्ही वेळां शाळा होत्या. डॉ. किर्लोस्कर यांनीं सकाळ-संध्याकाळ अशा दोन्ही वेळीं शाळा असाव्या अशासंबंधीं अेक लेखमाला लिहिली होती. शिवाय सकाळच्या वेळीं मुलें घरीं असलेलीं बरीं नाहींत. त्यावेळीं तीं बाहेर असलेलींच बरीं असा आपलाहि अनुभव असेल. निदान बायकांना तरी तसें वाटेल. मोठ्या शहरांत जेथें लांब शाळा असतात व दोन दोन मैल मुलांना जावें लागतें, त्या ठिकाणीं सोईच्या दृष्टीनें ११ ते ५ लांब शाळा असतात. आमच्याकडे तशी परिस्थिति नाहीं. आमच्या मुलांना कांहीं दोन दोन मैल लांब जावें लागत नाहीं. तेव्हां या ठिकाणीं या ठरावाची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं.

स. स. सोहनी:—आपण स्त्री-मनाला काय वाटतें, याचा विचार केला पाहिजे. आपण वकील लोक किंवा इतर मंडळींच्या दृष्टीनें विचार करतां कामा नये. आपल्याला गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. एखाद्या घरांत आईला चार मुलें असलीं तर त्यांपैकीं मोठी मुलगी आपल्या आईला मदत करते. दोन्ही वेळा शाळा असली म्हणजे अशा मुलींची फार गैरसोय होते त्यांना अभ्यास करायला सवड मिळत नाहीं तेव्हां हा ठराव पास करावा.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव ३ विरुद्ध १७ मतांनीं नापास झाला.

नंतर स. स. शिंदे यांनीं आपल्या नांवावरील ठराव नं. १ हा परत घेतला व ठराव नं. २ पुढें मांडला.

### स. स. आप्पाराव परशुराम शिंदे यांचा ठराव नं. २

" पांढरपेशे वर्गाखेरीज खालील जातींत अगदीं लहान वयांत लग्नें लावण्याची पद्धत अद्याप रूढ आहे हें अयोग्य आहे. सबब खालसा मुलखांत जारी असलेल्या शारदा कायद्यांत येथील परिस्थितीप्रमाणें जरूर ते फेरफार करून तो कायदा या संस्थानांत लागू करणेंत यावा अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेबांना शिफारस आहे."

स. स. शिंदे:—आपल्याकडे कांहीं विशिष्ट जातींतून लहानपणीं मुलांमुलींचीं लग्नें होतात. या अनिष्ट व घातुक पद्धतीला आळा बसावा यासाठीं हा ठराव आणला आहे. तरी आपण सर्वांनीं तो मंजूर करावा अशी विनंति आहे.

मे. अध्यक्षः—नेहमींच्या पद्धतीप्रमाणें याला कोणीतरी सपोर्ट करावा.

स. स. सोहनी:—मी या ठरावाला दुजोरा देतों.

रा. सा. पटवर्धन:—आतां ठराव आला आहे तो पास होऊं नये अशा मताचा मी आहे. हा ठराव बिल स्वरूपांत आल्यास त्याची छाननी होईल, त्यावर चर्चा होईल व त्या बाबतींत लोकमतांहि अजमावतां येईल. हा ॲडामिनिस्ट्रेशनचा प्रश्न नाहीं तर हा सामाजिक प्रश्न आहे. या बाबतींत लोकमत अजमावणें अगत्याचें आहे. पूर्वीं एकदां हा प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हां या बाबतींत लोकांमध्यें विरोध होता. तेव्हां आतां लोकमत अजमावण्याच्या दृष्टीनें हा ठराव बिल स्वरूपांत आणावा व आहे हा ठराव आज मागें घ्यावा. आहे या स्वरूपांत हा ठराव मांडतां येत नाहीं. ज्या स्वरूपांत तो मांडावयास पाहिजे तसा तो मांडलेला नाहीं. तो कायदा या स्वरूपांत येत नाहीं; तेव्हां तो मागें घ्यावा असें मला वाटतें.

स. सा. सी. व्ही. आपटे:—हा शिफारस वजा ठराव आहे असें समजून तो मंडळापुढें घ्यावयाला हरकत नाहीं. कलम नं. ९१ प्रमाणें असा शिफारसवजा ठराव मांडतां येतो. या ठरावाचें तत्त्व मान्य करून आपणाला त्यांत जरूर ते फेरफार करतां येतील.

स. स. चौधरी:—लग्नाच्या बाबतींत हल्लीं असलेलीच पद्धत बरी आहे. तेव्हां या ठरावाची जरूरी नाहीं.

रा. सा. पटवर्धन:—आपण हा ठराव मागें घ्यावा व पुढील अधिवेशनाचे वेळीं तो बिल स्वरूपांत आणावा म्हणजे आम्ही त्याचा अवश्य विचार करूं.

स. स. शिंदे:—हा ठराव मी परत घेतों.

### स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. १

"प्रातिनिधिक कायदेमंडळाचीं अधिवेशनें वर्षांतून दोन वेळां भरविण्यांत यावीं अशी या मंडळाची श्रीमंत राजेसाहेबांना विनंति आहे."

स. स. वाटवे:—याबद्दल मला अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या कायद्याप्रमाणें प्रतिनिधि कायदे मंडळांचे अधिवेशन वर्षांतून निदान अेकवेळ तरी भरवावें असा निर्बंध आहे. निदान याचा अर्थ दोन वेळां भरवूं नये असा प्रतिबंध नाहीं. वर्षांतून दोन वेळां अधिवेशनें भरविलीं तर आपल्या अडीअडचणी मांडतां येतील, त्यावर चर्चा करतां येईल व अशानें पुष्कळ कार्यभाग होईल. तेव्हां आपण सर्वानुमतें हा ठराव पास करावा अशी आपणांस विनंति आहे.

रा. सा. पटवर्धन:—मला ह्या ठरावाला विरोध करावयाचा असें नाहीं. परंतु अपल्यापुढें वस्तुस्थिति मांडावयाची आहे. आपण गेल्या कांहीं वर्षांचा अनुभव पाहिला तर कार्यक्रम-

पत्रिकेंतील कोणतेहि प्रश्न, ठराव किंवा बिलें शिल्लक राहिलीं असें झालें नाहीं. तेव्हां या ठरावाची आवश्यकता कितपत आहे तें आपणच ठरवावें.

स. स. वाटवेः—गेल्या नऊ वर्षांचा अनुभव असा आहे कीं, तीन किंवा चार दिवसांच्या अेका अधिवेशनांत सर्व काम होत नाहीं. दरवर्षी आमचें किती तरी ठराव, प्रश्न वेळेच्या अभावीं मागें शिल्लक राहातात व त्या योगें आमची बरीच कुचंबणा होते. आणि म्हणूनच हा ठराव आणावा लागला आहे. तरी आपण सर्वांनीं तो मंजूर करावा.

रा. ब. दिवाणः—आमचा याला बिलकूल विरोध नाहीं.

स. स. वाटवेः—सांगली, भोर, औंध वगैरे संस्थानांतून असेंब्लीचीं अधिवेशनें दोन वेळां भरविण्यांत येतात. आणि इकडेच मात्र वर्षांतून अेकदां भरविण्याचा प्रघात आहे.

रा. ब. दिवाणः—माझ्या माहितीप्रमाणें सांगलीला अेकच अधिवेशन होतें.

स. स. वाटवेः—सांगलीबद्दल मला नक्की माहीत नाहीं; परंतु औंधला वर्षांतून दोन अधिवेशनें होतात.

मे. अध्यक्षः—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदरहू ठराव बहुमतानें मंजूर करण्यांत आला.

### स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचा ठराव नं. १

" हल्लीं स्थानिक स्वराज्य म्हणजे म्युनिसिपालिट्यांमधून हरिजनांना म्हणून रिझर्व्ह जागा नाहींत. तरी यापुढें हरिजनांना त्यांच्या समाजामार्फत प्रत्येक म्युनिसिपालिटींत त्यांच्या लोकसंख्येनुसार जागा देण्यांत याव्यात अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे."

रा. सा. देवधरः—स. स. नवणी यांनीं जो ठराव मंडळापुढें आणला आहे तो तात्त्विकदृष्ट्या बरोबर आहे असेंच कोणीहि म्हणेल. तथापि हरिजनांची हल्लींची परिस्थिति व या बाबतचें दरबारचें धोरण या दृष्टीनें विचार केल्यास हा ठराव अप्रस्तुत आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागेल. परवा अेका ठिकाणीं माझ्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं त्या ठिकाणीं कोणीही हरिजनांपैकीं मेंबर व्हायला कबूल नाहीं. जमखंडीसारख्या शहरच्या ठिकाणीं कांहीं माणसें तयार असतात. परंतु इतर ठिकाणच्या हरिजनांची मनोवृत्ति बदललेली नाहीं. सरकारतर्फे नेमणुका करावयाच्या तर कोणीहि कबूल नाहीं. महार, मांग अद्याप अेकत्र येऊं शकत नाहींत. प्रत्येक गांवांत महार मांग असें निरनिराळे तट आहेत. अशा स्थितींत मार्ग काढावा कसा? आपल्याला प्रतिनिधित्व पाहिजे ही गोष्ट मान्य आहे. दरबाराचीही या बाबतींत सहानुभूति आहे. परंतु आपण हा ठराव आणल्यानंतर व त्याला मान्यता दिल्यानंतर इतरांची वाट काय? ते स्वस्थ कसे राहतील? प्रत्येकजण आपल्याला प्रातिनिधिकत्व पाहिजे असें म्हणतील, त्याची वाट काय? आज आपली ही मागणी मान्य झाली तर त्याचे पुढें काय परिणाम होतील याचा आपण विचार केला आहे काय? आपण प्रत्येकजण खेड्यांत जाऊन पहा, जमखंडी गांव सोडल्यानंतर बाहेर सगळा अंधकार

आहे. शिवाय श्रीमंतांनीं सकाळीं आपल्या भाषणांत सांगितलेंच आहे कीं, इतरांच्या मानानें सर्व बाबतींत आमचें एक पाऊल पुढेंच आहे. तेव्हां अशा स्थितींत हा ठराव आणणें योग्य होणार नाहीं. आपण तो परत घेतला तर बरें होईल. म्युनिसिपालिट्यांतून लायक माणसेंच जातील असा प्रयत्न झाला पाहिजे. नालायक माणसें गेल्यानें कार्याचा नाश होईल. तेव्हां आपण हा ठराव मागें घ्यावा असें माझें आग्रहानें सांगणें आहे.

स. स. नवणी:—रा. सा. मंत्र्यांच्या आश्वासनावरून मी हा ठराव परत घेतों.

## स. स. चिदंबर विनायक आपटे यांचा ठराव नं. २

" संस्थानांतील विणकरांचा व्यापार वाढावा म्हणून कांहीं उपाययोजना होणें इष्ट आहे तरी त्या बाबतींत पूर्ण चौकशी करून योजना तयार करणेकरितां एक समिति नेमणेंत यावी अशी या मंडळाची दरबारास शिफारस आहे. "

स. स. सी. व्ही. आपटे:—विणकरांच्या हलाखीच्या परिस्थितीबद्दल गेल्या अधिवेशनामध्यें बरीच ओरड झालेली आपणां सर्वांना माहित आहेच. तथापि हा प्रश्न आपल्यापुरता मर्यादित आहे असें नाहीं, तर हा सार्वत्रिक स्वरूपाचा प्रश्न आहे. आणि म्हणूनच हिंदुस्थान सरकारानें विणकरांची काय परिस्थिति आहे याचें निरीक्षण करून अहवाल तयार करण्यासाठीं एक कमिटी—थॉमस कमिटी—नेमली आहे. अशा वेळीं आपणहि आपल्या संस्थानांत विणकऱ्यांची परिस्थिति काय आहे, याचा विचार केल्यास तो अस्थानीं ठरणार नाहीं. आपल्या संस्थानांत विणकर वर्ग किती आहे, त्यांची सांपत्तिक स्थिति कशी काय आहे, त्यांचा चरितार्थ कसा चालतो, त्यांची उत्पादन-शक्ति किती आहे, उत्पादनाच्या मानानें त्यांना मार्केट आहे किंवा नाहीं, ह्याबद्दलची सर्व स्टॅटिस्टिकल माहिती मिळवावी या उद्देशानें हा ठराव आणला आहे. आपणाजवळ अशी माहिती तयार असल्यास त्या माहितीच्या अनुरोधानें आपणास कांहीं योजनाहि आंखतां येतील. तथापि हा प्रश्न पुढचा आहे. आज फक्त एक तीन किंवा चार माणसांची कमिटी नेमावयाची आहे व ह्या कमिटीनें सर्व माहिती गोळा करण्याची आहे तेव्हां आपण सर्वांनीं हा ठराव मंजूर करावा अशी माझी विनंति आहे.

रा. सा. देवधर:—या ठरावाला विरोध करावा असें माझें मत नाहीं. गेल्या सालीं स. स. मंडी यांनीं ह्या ठिकाणीं यासंबंधीं एक तहकुबीची सूचनाहि मांडली होती. त्यानंतर प्रजापरिषदेनें त्यावर तात्कालिक उपाययोजना म्हणून एक दुकान काढावें असें ठरलें. व त्या दुकानासाठीं लोकांनीं पांच हजार रु. भांडवल जमवावें व दरबारनें ५ हजार रु. द्यावेत अशा रितीनें योजना ठरली होती. परंतु हा प्रश्न आपल्या संस्थानापुरताच मर्यादित नाहीं. हा सबंध हिंदुस्थानांतील विणकऱ्यांचा प्रश्न आहे व त्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमली आहे. त्या कमिटीचा अहवाल अद्याप बाहेर पडावयाचा आहे.. तेव्हां त्या कमिटीचा रिपोर्ट बाहेर पडण्यापूर्वींच आपण एकादी योजना आंखणें योग्य ठरणार नाहीं. हा दहा कोटी लोकांचा प्रश्न आहे. दहा कोटी लोक जिवंत कसे राहतील याचा विचार आज थॉमस कमिटीपुढें आहे. अशावेळीं आपण घाई करणें योग्य

होणार नाहीं. कांहीं लोकांचें या बाबतींत असें म्हणणें आहे कीं, विणकर जें कापड काढतात तें पेटंट म्हणून ठरविलें गेलें पाहिजे. तशाप्रकारचें कापड गिरण्यांनीं काढतां कामा नये. कांहीं लोकांचें म्हणणें आहे कीं, विणकर जें कापड तयार करतील त्याला ड्यूटी असतां कामा नये, अशा रितीनें निरनिराळे विचारप्रवाह चालू आहेत, तथापि या बाबतींत कोणाचें कांहींही म्हणणें असलें तरी ब्रिटिश हिंदुस्थानांत या बाबतींत जी योजना निघेल तीच आपल्याकडे अमलांत आणली पाहिजे. स्वतंत्र अशी योजना आपल्याला आंखतां येणार नाहीं. सध्यां सुताचे भाव भरमसाट वाढल्यानें व सुताचा सर्व धंदा मुंबईच्या व्यापाऱ्यांच्या हातांत गेला असल्यामुळें विणकर समाजाची स्थिति हलाखीची झाली आहे. तथापि विणकर लोक कांहीं पेटंट माल तयार करतात तसा गिरणीवाले तयार करूं शकत नाहींत, म्हणून तरी हे विणकर लोक जीवंत राहूं शकतात. तेव्हां या बाबतींत जो निर्णय घेतला जाणार तो केवळ बनहट्टी, सावळगी गांवापुरताच नसून सर्व हिंदुस्थानांतील विणकर लोकांकरितां घेतला जाणार आहे. तेव्हां आपण हा ठराव आणण्याची इतक्यांतच घाई करूं नये असें मला वाटतें.

स. स. सी. व्ही. आपटे:—या ठरावांत आतांच योजना आखण्याची मागणी केलेली नाहीं, तर फक्त एक कमिटी नेमून संस्थानांतील विणकर लोकांच्या परिस्थितीसंबंधीं माहिती गोळा करण्याच्या दृष्टीनें सूचना केली आहे. ही माहिती गोळा करण्याचे बाबतींत थॉमस कमिटीचा रिपोर्ट आड येऊं शकत नाहीं. आपणाकडे अशी स्टॅटिस्टिकल माहिती तयार असणें अगत्याचें आहे. तेव्हां आपण सर्वांनीं हा ठराव मंजूर करावा अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं ठराव मतास घालतां तो सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

मे. अध्यक्ष:—आतां वेळ संपल्यानें काम तहकूब ठेवावें.

## दुसरा दिवस

### बुधवार, ता. १९–८–४२

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या बैठकीस दुपारीं १२ वाजतां सुरवात झाली. पहिल्या दिवसाइतकेच सन्मान्य सभासद हजर होते. कार्यक्रमपत्रिकेप्रमाणें प्रथम प्रश्नोत्तरांस सुरवात झाली.

**३ स. स. पडुरंग बळवंत वाटवे यांचे प्रश्न**

प्रश्न १. (अ) जमखंडी संस्थानांत साक्षर लोक किती? त्यांत पुरुष किती व स्त्रिया किती?

(ब) लोकसंख्येच्या मानानें हें प्रमाण दरबारास समाधानकारक वाटतें कीं काय?

(क) नसल्यास ही स्थिति सुधारणेस दरबारनें अेखादी योजना आंखली आहे काय? असल्यास कोणती?

रा. ब. दिवाणः—(अ) जमखंडी संस्थानांत साक्षर लोक १०२४५ असून त्यांत ९०९० पुरुष व ११५५ स्त्रिया आहेत. चालू खानेसुमारीप्रमाणें शेंकडा ९·५ प्रमाण आहे. पुरुषांचें प्रमाण १६·८ असून स्त्रियांचे २ आहे. मागील खानेसुमारीप्रमाणें हें प्रमाण शेंकडा ७·४ होतें. त्यांत पुरुषांचें शेंकडा प्रमाण १३·४ असून स्त्रियांचें प्रमाण १·१ आहे.

(ब) स्थानिक परिस्थितीचे दृष्टीनें व गेल्या खानेसुमारीचे वेळच्या प्रमाणाशीं तुलना करितां समाधानकारक वाटते.

(क) स्पेशल अशी योजना ( ब ) चे उत्तराचे दृष्टीनें उद्भवत नाहीं. तथापि प्रयोगादाखल कांहीं गांवांत सार्वत्रिक शिक्षणाचे योजनेचा अम्मल केला आहे त्याचा अनुभव पाहून पुढें काय तजवीज करणेंची तें ठरविणेंत येईल.

प्रश्न २ ( अ ) जमखंडी संस्थानांत औद्योगिक प्रगति करणेच्या दृष्टीनें दरबारनें कांहीं योजना आंखली आहे काय ?

( ब ) असल्यास ती योजना कोणती व कधीं अमलांत येणार ?

( क ) आंखली नसल्यास आंखण्याचा विचार आहे काय ? असल्यास कधीं ?

रा. ब. दिवाणः—(अ) स्पेशल योजना अशी कांहीं आंखलेली नाहीं.

(ब) (अ) चे उत्तराचे दृष्टीनें उद्भवत नाहीं. तथापि प्रस्तुत ( १ ) जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी बऱ्याच वर्षांपासून चालू आहे. शिवाय ( २ ) कुंदगोळ तालुक्यांत श्री गणपति मिल्स कं. ही खासगी संस्था स्थापन झाली असून तिला दरबारकडून प्रोत्साहन म्हणून पुष्कळच सवलती देण्यांत आल्या आहेत.

( क ) हल्लींची युद्धजन्य परिस्थिति निवळेपर्यंत कोणतेही रीतीचा नवीन उपक्रम करणें दरबारास शक्य नाहीं.

प्रश्न ३ ( अ ) जमखंडी संस्थानांत अलीकडे पाऊस कमी पडतो याकडे दरबारचें लक्ष गेलें आहे काय ?

( ब ) असल्यास शेतीचे बाबतींत उपयोग व्हावा यासाठीं कालवे अगर तलाव करून शेतीस उपयोग होईल अशी एखादी योजना दरबारनें आंखली आहे काय ?

( क ) नसल्यास त्या बाबतींत कांहीं विचार दरबार यापुढें तरी करणार आहे काय ?

रा. सा. देवधरः—(अ) पाऊस पडल्याचें प्रमाण विशेष कमी झालेलें नाहीं. कमी-जास्त प्रमाणांत पाऊस पडतो. परंतु तो वेळेवर पडत नाहीं. तथापि दरबारचें या गोष्टींकडे लक्ष गेलें आहे.

( ब ) दरबारनें अशी कोणतीही योजना आंखलेली नाहीं. तशी योजना आंखणें खर्चाच्या दृष्टीनें परवडणार नाहीं.

( क ) हा प्रश्न उद्भवत नाहीं. तथापि जंगलकटाई बंद करण्याचें व जंगलांतून नवीन झाडांची लागवड करण्याचें धोरण दरबारनें सुरू ठेवलें आहे. जंगल वाढल्यानें पाऊस पडण्याच्या कामीं त्याची मदत होईल.

स. स. सोहनीः—कालवे काढून पाण्याची व्यवस्था करण्याबद्दल तज्ञाचें मत घेतलें आहे काय ?

रा. सा. देवधरः—तज्ञाचें मत घेऊनच त्याप्रमाणें उत्तर दिलें आहे. संस्थानाची अेकंदर परिस्थिति व उत्पन्नाचें मान लक्षांत घेतां वरील योजना उपयुक्त अशा वाटत नाहींत.

## ४ स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचे प्रश्न

प्रश्न १. ( अ ) पुरातन कालापासून हरिजनाला मिळत असलेले बलुत्याचे हक्क अलिकडे बरींच वर्षे योग्य रीतीनें देण्यांत येत नाहीं. ही गोष्ट सरकारच्या नजरेस आली आहे काय ?

( ब ) आली असल्यास, हे हक्क योग्य रीतीनें द्यावयास लावण्यास सरकारनीं कोणती व्यवस्था केली आहे, ती केव्हांपासून अमलांत आणणेचा सरकारचा विचार आहे ?

( क ) या बाबतींत सरकारकडे किती अर्ज आले आहेत व त्यांचा योग्यप्रकारें निकाल केला नसल्यास तो केव्हां करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

रा. ब. दिवाणः—(अ) सरकारकडे तक्रारी नाहींत. कांहीं कांहीं गांवांतून अेकदोन इसमांकडून बलुता देत नाहींत अशा तोंडी तक्रारी येतात त्या तेथल्या तेथें मिटविण्यांत येतात.

(ब) सरकारास तक्रारी आल्यास त्याबाबत कायद्यानें सांगितलेल्या तजविजी करण्यांत येतील.

( क ) अर्ज अेकच तुंगळ गांवचे महारांचा आला आहे. त्याचें वतन रजिस्टरची माहिती तयार झाली आहे, पंच वगैरे नेमून पंचायत होणेवर काम शिल्लक आहे.

प्रश्न २. हरिजन समाजांतील शिकून लायक झालेल्या माणसांना सरकारी नोकरी दिल्यास हरिजनांच्या शिक्षणास उत्तेजन मिळणार आहे म्हणून सरकारनीं आजपर्यंत किती हरिजनांना नोकरीवर घेतलें आहे ?

( ब ) नोकरीसाठीं हरिजनांचे अर्ज आलेले आहेत ?

( क ) त्यांपैकीं कितीजणांना सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत ?

रा. ब. दिवाणः—(अ) तीन इसमांस नोकऱ्या दिल्या आहेत.

( ब ) तीन अर्ज आले आहेत.

(क) त्यांपैकीं अेकास नुकतेंच नोकरींत घेणेंत आलें आहे.

प्रश्न ३. (अ) संस्थानमजकुरीं कांहीं गांवांतील हरिजनांना महारकी इनाम जमिनी नाहींत तरी त्यांना त्या देणेंत येतील काय ?

( ब ) असलेल्या गांवांतील महारकी जमिनी गहाण किंवा अन्य तऱ्हेनें कबजांतून गेल्या असल्यास त्या वतनअॅक्ट ९ प्रमाणें सोडून देणेंत येतील काय ?

रा. ब. दिवाणः—(अ) नवीन इनामें देण्याचें दरबारचें धोरण नाही व देण्यास योग्य अशा जमिनीही नाहींत.

( ब ) सर्व तपशीलासह योग्य अशा तक्रारी आल्यास त्याबाबत चौकशी होऊन कायद्याप्रमाणें योग्य असा निकाल केला जाईल.

**५ स. स. चिदंबर विनायक आपटे यांचे प्रश्न.**

प्रश्न १ (अ) कडगोळ गांवचे रयतांकडून पाणवठ्याबद्दल १९३० व १९४२ सालीं अर्ज आले आहेत काय ?

( ब ) गांवच्या नकाशाप्रमाणें पाणवठ्याचा रस्ता रुंद नसून, बाजूच्या लोकांनीं आक्रमण केला आहे अशी तक्रार आहे काय ?

( क ) त्याबद्दल गैरसोय दूर करण्याकरितां काय उपाय योजिले आहेत ?

रा. ब. दिवाणः—(अ) १९३० सालीं अर्ज आल्याचा आढळ होत नाहीं. १९४२ सालीं अर्ज आला आहे.

( ब ) रस्ता मोजणी करून डिमार्केट करणेंत आला आहे. अतिक्रमणें वास्तविक नाहींत. पाणी वाहात असलेमुळें रस्ता खोल होऊन दोन्ही बाजूला दरडी झाल्या आहेत. उंचीमध्यें अंतर ३२ फूट आहे. म्हणजे शेतकऱ्यांचें अतिक्रमण आहे असें म्हणतां येणार नाहीं.

( क ) रस्ता साफ करून घेणेची योजना गांवच्या लोकांच्या मदतीनें करणेंत येईल.

स. स. वाटवे:—गांवच्या लोकांनीं मदत केली नाहीं तर ?

रा. ब. दिवाण:—गांवठाणांतील रस्ता करण्याची वहिवाट नाहीं. लोकांच्या पोटांत दुखणार ते ओवा मागणारच; त्या लोकांना जरूरी असली तर ते मदत करतीलच.

स. स. वाटवे:—लोकांच्या तक्रारी आल्या तरी दरबार स्वस्थ बसणार काय ?

रा. ब. दिवाण:—होय, स्वस्थ बसणार ?

प्रश्न २ (अ) कवटगी बिद्री, गोटे वगैरे गांवचे महार लोकांना रयतांकडून मिळणाऱ्या कामाबद्दल तक्रारी आल्या आहेत काय ?

( ब ) आल्या असल्यास त्याबद्दल काय तजवीज करण्यांत आली ?

रा. ब. दिवाण:—नाहींत. याबाबत स. स. नवणी यांचे प्रश्नास जास्त खुलाशाचें उत्तर देणेंत आलें आहे.

प्रश्न ३, संस्थान मजकुरीं हिंदु–मुसलमानांचे दंगे होऊं लागले आहेत याकडे सरकारचें लक्ष आहे का ? त्याबाबत कडक उपाय योजले आहेत काय ?

रा. ब. दिवाण:—आहे. फक्त बनहट्टी या एकाच गांवीं हिंदु-मुसलमानांत तंटा होऊन दंगा झाला आहे- त्याबाबत चौकशी होऊन दोन्ही बाजूचे आरोपित इसमावर योग्य कोर्टांत खटले चालू आहेत. गांवांत सार्वजनिक शांततेचा भंग न होईल अशा तऱ्हेनें उपाय सुरू आहेत.

## ६ स. स. नबीसाहेब फकरोद्दीनसाहेब चौधरी

प्रश्न १ (अ) जमखंडी संस्थानांत जमखंडी व बनहट्टी खेरीज उर्दू शाळा स्थापन करणेचे बाबतींत आजपर्यंत दरबारकडून कांहीं तजवीज जाहली आहे काय व जाहली नसल्यास त्याबद्दल कांहीं उपाय चालू आहे काय ? चालू असल्यास कोणते ?

( ब ) जमखंडी येथील उर्दू शाळेला ट्रेंड मुलकी पास शिक्षक अद्यापि नेमणेबद्दल कांहीं तजवीज जाहली आहे काय ?

( क ) जमखंडी स्टेटमध्यें दिवाणी खात्यांत व मुलकी खात्यांत जे ऑफिसर नेमणेंत येतात त्यांपैकीं या दोन्ही जागांवरील ऑफिसराच्या जागीं मुसलमानांना नेमणेबद्दल तजवीज जाहली आहे काय व तसा इसम मिळत नाहीं कीं काय ?

रा. सा. देवधर:—(अ) तशी तजवीज स्वतंत्रपणें करण्याचें कारण उद्भवत नाहीं.

(ब ) जमखंडी येथील उर्दू शाळेंत अद्यापि ट्रेंड शिक्षक नेमलेला नाहीं.

स. स. वाटवे:—ट्रेंड शिक्षक कां नेमला नाहीं ?

रा. सा. देवधर:—मागील वर्षापासूनच हा उपक्रम सुरू झाला आहे. शिवाय शाळेंत अवघीं १५० मुलें आहेत व ही संख्याहि कायमची नाहीं.

रा. ब. दिवाण:—(क) मुख्य प्रश्न उर्दू शाळांबाबत असल्यानें हा पोट प्रश्न त्या मुख्य प्रश्नाचा भाग होऊं शकत नाहीं. कारण यांतील मजकूर अगदीं निराळा व मुख्य प्रश्नाशीं सुसंगत असा नाहीं. तथापि जागा देण्यांत येतात त्या अेकंदर लायकी पाहून देण्यांत येतात. निव्वळ जात पाहून जागा देणेंत येत नाहींत. तशीं लायक माणसें मिळाल्यास जागा देण्यांत येतील.

### ७ स. स. तोटनगौडा गोविंदगौडा पाटील यांचे प्रश्न

प्रश्न १ (अ) कुंदगोळ तालुक्यांतील खेड्यांत गुरांची सांथ सुरू होणेंचा संभव आहे. त्याबाबत गुरांचे इनॉक्युलेशनची व्यवस्था होणेबद्दल कोणकोणत्या गांवकरांकडून रिपोर्ट आले आहेत याची माहिती कळविणेंत येईल काय ?

(ब) आले असल्यास त्याबद्दल दरबारकडून काय उपाय योजना झाली आहे ?

रा. सा. देवधर:—गुरांची सांथ चालू असल्यामुळें तेथील मामलेदार कचेरींत अद्याप लस ठेवण्यांत आली आहे. शिवाय त्या ठिकाणीं व्हेटर्नरी इन्स्पेक्टरना तेथें पाठविण्यांत आलें होतें.

प्रश्न २ (अ) कुंदगोळ तालुक्यापैकीं मौजे यलिवाळ गांवीं सॅनिटेशन कमिटी असून त्या कमिटीची शिल्लक किती आहे ?

(ब) सदरहू कमिटीचा गेले पांच वर्षांत वसूल किती व बाकी किती याचें सालवार टिपण मंडळापुढें ठेवणेंत येईल काय ?

(क) शिल्लक असल्यास त्यांपैकीं गेले पांच वर्षांत ग्रामसुधारणेकडे व आरोग्य-रक्षणाकडे किती खर्च झाला आहे यांचें सालवार टिपण मंडळापुढें ठेवणेंत येईल काय ?

रा. सा. देवधर:—

(१३५१फसली अखेर)

रु. आ. पै.

(अ) १९६३–१२–१

| | फसली | जमा | खर्च | खर्चाच्या बाबी झालेला तोटा |
|---|---|---|---|---|
| (ब) | १३४७ | | २०८३ | याशिवाय त्रिमलकोप रस्ता रिपेरी प्लेग इनॉक्युलेशन, आरोग्य, गांव रस्ता रिपेरी व झाडलोट |
| | १३४८ | २१–१५–० | २३७०–०–० | |
| | १३४९ | | १८०–५–० | |
| | १३५० | २५८–७–८ | १६२-१५-० | |
| | १३५१ | ५१०–८–३ | ३७५–०–० | |

क) गांवचा सॅनिटेशन वसूल सन १३५० फसलीपासून सुरू झाल्यानें सन १३५० व १३५१या दोन सालची येणें बाकी१८०–१२–२ आहे. मागील तीन सालचा वसूल कांहीं झालेला नाहीं व बाकी काढलेली नाहीं.

**प्रश्न ३** मौजे बेटदूर येथील कानडी शाळेस सक्तीचें शिक्षण लागू झाल्यापासून नांव दाखल केलेल्या व नांव दाखल न करितां शाळेस जाणाऱ्या मुलांची संख्या किती? सर्व विद्यार्थ्यांस बसण्याकरितां पुरेशी जागा आहे काय? नसल्यास काय व्यवस्था व कधीं करण्यांत येईल?

रा. सा. देवधरः—येथील कानडी शाळेंत ८१ मुलें पटावर आहेत. व पटावर दाखला नसलेलीं अशीं १० मुलें आहेत. हल्लीं असलेल्या संख्येच्या मानानें सध्याची जागा पुरेशी आहे.

स. स. वाटवेः—त्या शाळेंत वर्ग किती आहेत?

रा. सा. देवधरः—चार वर्ग आहेत.

यानंतर लोकनियुक्त मंत्र्यांच्या पगारवाढीसंबंधीं स. स. सोहनी, स. स. नवणी व स. स. सौ. आपटे यांचा ठराव मे. अध्यक्ष यांचेकडे आयत्यावेळीं देण्यांत आला; तथापि तो ठराव कलम ३८-प्रमाणें विचारांत घेता येणार नाहीं; परंतु सोंपीव खात्याच्या बजेटाच्या रकमा मंजूर करून घेतांना ही बाब पुढें आणून मंजूर करून घेतां आल्यास हरकत नाहीं असा अध्यक्षांनीं निकाल दिला. त्यानंतर स. स. वाटवे यांचें बजेटवरील भाषण सुरू झालें.

## स. स. वाटवे यांचें बजेटवरील भाषण

गेल्या ८–९ वर्षांत बजेटावर बोलण्याचा ज्या ज्या वेळीं प्रसंग आला त्या त्या वेळीं लोकहिताच्या दृष्टीनें अनेक सूचना केल्या. तथापि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, त्यांपैकीं बऱ्याच सूचना स्वीकारल्या गेलेल्या नाहींत. ज्या सूचना स्वीकारल्या गेल्या त्या अंमलांत आणण्याचा उपक्रम झाला नाहीं. बजेट हा विषय रुक्ष आहे; तथापि तो रुक्ष असला तरी, आम्हीं याबाबतींत काय काय सूचना केल्या व त्यांपैकीं किती स्वीकारल्या गेल्या व किती फेटाळल्या गेल्या हें उदाहरणासह दाखवावयाला कांहींच हरकत नाहीं.तेव्हां या बजेटाकडे पहातांना दोन रीतीनें पाहावें लागतें. एक संस्थानची परिस्थिति व त्याचप्रमाणें लोकांची परिस्थिती. आणि ह्या दृष्टीनें विचार करून जर ह्या बजेटाकडे पाहिलें तर काल म्हटल्याप्रमाणें हें बजेट तोंडमिळवणीचें नसून तुटीचेंच आहे असें स्पष्ट म्हणावें लागेल. १२५००० रुपये इतकी रक्कम लोकांकडून डिपॉझिटसूच्या रूपानें येईल अशी कल्पना करून हें बजेट बनविलें आहे. अशा प्रकारें डिपॉझिटस् रकमा पुढच्या वर्षीं आल्या नाहींत तर बजेटाची तोंडमिळवणी कशी होणार? दुसऱ्यांकडून येणाऱ्या डिपॉझिट्स रकमा गृहित धरून अंदाजपत्रक बनविणें चुकीचें आहे. तेव्हां हें बजेट तोंडमिळवणीचें केलें आहे तें चुकीचें आहे अशी माझी तक्रार आहे. डिपॉझिट्स रकमा ह्या उत्पन्नाच्या बाबी होऊं शकत नाहींत.

रा. ब. दिवाणः—हे जमेकडील आणि खर्चाकडील डिपॉझिट्सच्या रकमेचे आंकडे निव्वळ दुबेरजी आहेत. त्यांचा जमेशीं किंवा खर्चाशीं कांहीं संबंध नाहीं. डिपॉझिट्स रकमा हिशेबांत धरलेल्या नाहींत. मी बजेटनोटमध्यें केलेला खुलासा आपण वाचला आहे काय?

स. स. वाटवे: —होय. मी तो काळजीपूर्वक वाचलेला आहे. आज या संस्थानचा खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी स्थिति आहे. दरवर्षी ओरड करतो कीं, डिपॉझिट रकमा जमेच्या बाजूला धरून संस्थानचें उत्पन्न वाढवून दाखवूं नका. डिपॉझिट्स रकमा लोकांचें कर्ज आहे. अशा रीतीनें आपण संस्थानाला कर्जबाजारी बनवीत आहांत. लोकांनीं ठेवी ठेवल्या आहेत त्यांतील हा पैसा आहे: हा लोकांचा पैसा आहे. १,२५,००० रु. ठेवीच्या रूपानें येतात याचा अर्थ जमखंडी संस्थानची पत चांगली असल्याशिवाय लोक आपल्या रकमा ठेवूं शकत नाहींत.

रा. ब. दिवाण: —तेवढीच कर्जेहि दिलेलीं आहेत.

स. स. वाटवे:—बजेट तयार करतेवेळीं अर्थोत्पादनाच्या बाबी कोणत्या हें पाहावयाचें असतें. लोकांकडून कर्ज काढणें हा अर्थोत्पादनाचा मार्ग नाहीं. लोकांकडून लाख, सव्वा लाख रुपये डिपॉझिटसूच्या रूपानें येतील अशा भरंवशावर बजेट करणें हें प्राणघातक आहे.

रा. ब. दिवाण:—मी नोटमध्यें यासंबंधीं सविस्तर खुलासा केला आहे; त्यावरून आपलें समाधान झालें नाहीं हें माझें दुर्दैव आहे. यासंबंधींचा खुलासा पान ५ वर पहावा. कर्ज, तसलमात व अनामत या तिन्ही खात्यांकडे मिळून २,६०,००० रुपये जमेकडे व तितकीच रक्कम खर्चाकडे धरणेंत आली आहे. या तिन्ही बाबी जमाखर्ची रकमा असल्यानें त्याही निवळ उत्पन्नाच्या किंवा खर्चाच्या बाबी होऊं शकत नाहींत. याही रकमा दुबेरजीसारख्या समजून वट्ट जमाखर्चाच्या अंदाजाच्या रकमेंतून वजा केल्यावर जमा ७,४७,३८१, रुपये व खर्च ७,८७,२०२ रुपये अशा खऱ्या जमाखर्चाच्या रकमा राहातात.

स. स. वाटवे:—या खुलाशानें माझी शंका दूर होत नाहीं. ही सव्वा लाख रुपये रक्कम संस्थानच्या उत्पन्नापैकीं स्वतंत्र बाब नाहीं. लोकांकडून ठेवी येतील त्यांपैकीं ही रक्कम आहे. लँड रेव्हिन्यू, इन्कमटॅक्स ह्या बाबी उत्पन्नाच्या आहेत.

रा. ब. दिवाण:—मी आपणाला स्पष्टपणें सांगतों कीं ह्यांत डिपॉझिटस् रकमा धरून हें बजेट तयार केलेलें नाहीं.

स. स. वाटवे:—कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांत बजेट तयार करण्याचा प्रश्न आला म्हणजे त्यांत गंगाजळी म्हणजे रिझर्व्ह फंडाची योजना केलेली असते. या बजेटामध्यें पाहिलें असतां गंगाजळी म्हणजे रिझर्व्ह फंडाची योजना नाहीं. हिंदुस्थान सरकारचें किंवा कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राचें बजेट पाहिलें तर त्यांत गंगाजळी धरलेली असतेच. निझाम संस्थानमध्यें १२ कोटी रुपये शिलक असून सुद्धां दरवर्षी रिझर्व्ह फंडासाठीं म्हणून कांहीं रक्कम धरलेली असते. मी म्हणतों १००;५०० जेवढी शक्य होईल तेवढी रक्कम गंगाजळी म्हणून ठेवा.

रा. ब. दिवाण:—फॅमिन रिलिफ फंडाकरितां म्हणून जी रक्कम बजेटांत धरली आहे त्याचा अर्थ काय ?

स. स. वाटवेः—फॅमिन रिलिफ फंड हा दुसऱ्या कामाकरितां असतो. तो रिझर्व्ह फंड किंवा गंगाजळी होऊं शकत नाहीं. फॅमिन रिलिफ फंड हा दुष्काळी कामाकरितांच राखून ठेवलेला असतो. तथापि गेलीं कित्येक वर्षें ओरड करूनहि अद्याप बजेटमध्यें रिझर्व्ह फंडासाठीं कांहीही रक्कम धरलेली नाहीं. आज ऑगस्ट उजाडला म्हणजे पैसा दुसरीकडे मागण्याची पाळी येते. अर्थात्‌ही स्थिति बरोबर नाहीं.

रा. ब. दिवाणः—मी या बाबतींत थोडासा खुलासा करतों. फॅमिन रिलिफ फंडासाठीं जी रक्कम या बजेटांत धरण्यांत आली आहे ती गंगाजळी किंवा रिझर्व्ह फंडासाठीं म्हणूनच ठेविली आहे व तसें नांवही दिलें होतें.

स. स. वाटवेः—मग ती रिझर्व्हफंड म्हणूनच कां ठेविली नाहीं?

रा. ब. दिवाणः—परंतु विशिष्ट ऑर्डरमुळें ती रक्कम फॅमिन रिलिफ फंड म्हणून ठेविली आहे.

स. स. वाटवेः—वर्षाकाठीं हजारबाराशें रुपये गंगाजळी रिझर्व्ह फंड—म्हणून ठेविले असते तर आज कितीतरी रक्कम शिल्लक राहिली असती. माझ्यासारख्या सामान्य माणसालाही वर्षाकाठीं ५० रु. तरी बाजूला काढून ठेवावें लागतात. आज संस्थानवर कितीतरी जबाबदाऱ्या, आपत्ती, अडचणी आहेत. अशा स्थितींत लोकांनीं काय करावें? तेव्हां यापुढें तरी अशा प्रकारचा रिझर्व्ह फंड ठेवावा अशी माझी सूचना आहे. आतां रयतांच्या दृष्टीनें या बजेटाकडे पाहिलें तर यांतील जमेपैकीं ४॥ लाख रुपये जमीन महसुलाच्या रूपानें शेतकरीवर्गाकडून येतात. परंतु त्या शेतकरीवर्गाला तगाईकरतां तीसबत्तीसशें रुपयेच बजेटांत धरलेले आहेत! रयतेचें कर्ज आज एक कोटीवर गेलें आहे तें फेडण्याची योजना यांत कांहीं नाहीं. शेतकरीवर्गाकरितां या बजेटामध्यें कोणतीहि योजना केली नसल्यामुळें हें बजेट नोकरशाहीचा पगार, भत्ता व सादिल यांसाठींच आहे. हिंदुस्थान सरकारचें बजेट हें गोऱ्या नोकरशाहीचें म्हणून टीका करण्यांत येते परंतु तोच प्रसंग जमखंडी संस्थानवर यावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यावर रा. ब. दिवाणसाहेब म्हणतील आपल्याला खातीं नकोत काय? खातीं पाहिजेत. पण तीं खातीं रयतेला खावूं लागलीं तर त्यांची आवश्यकता नाहीं. राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें लोकांच्या हिताच्या दृष्टीनें जेवढीं आवश्यक तेवढींच खातीं पाहिजेत. संस्थानच्या शेतकरीवर्गाची स्थिति समाधानकारक नाहीं हें आपल्या ॲन्युअल अडमिनिस्ट्रेशन रिपोर्टावरून सिद्ध होतें. मी आपल्याला यासंबंधींचा कांहीं उतारा वाचून दाखवितों. १९३८–३९ सालचा हा ॲन्युअल ॲड्मिनिस्ट्रेशन रिपोर्ट आहे. पोलिटिकल एजंटकडे पाठविण्यासाठीं हा तयार केलेला असतो. या रिपोर्टाच्या पान ७२ वर जो मजकूर आहे त्यावरून रयतेची स्थिति समाधानकारक नाहीं हें स्पष्ट आहे. संस्थानची हल्लींची स्थिति कशी व पूर्वीची कशी याचा बारकाईनें विचार केल्यास ती खालावलेलीच आहे असें म्हणावें लागेल. १९३८–३९ सालीं जमखंडी संस्थानांतील बैलांची संख्या तीन हजार होती. ती आतां घटलेली आहे. शेळ्यांची संख्या २५ हजारांवरून १७ हजारांवर आली आहे या गोष्टीकडे दरबारनें डोळेझांक केली तर तें योग्य होणार नाहीं. अर्थात् याचा परिणाम शेतीवर व पर्यायानें

शेतकरीवर्गावर होणार आहे. शेतकऱ्यांचा तुम्हांला कळवळा नाहीं. आम्हांला विचारण्यांत येतें शेतकऱ्यांसाठीं काय केलें पाहिजे. काय केलें पाहिजे हें मोठ्या अम्मलदारांनीं ठरवावें. आम्ही फक्त ओरडणार आहोंत. आपण मोठमोठे पगार देऊन अम्मलदार ठेविले आहेत. आपण तज्ञ आहांत. जमखंडी संस्थानची स्थिति समाधानकारक नाहीं असें वरिष्ठांना कळवितां पण ती स्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें मात्र कांहीं व्यवस्था झालेली दिसत नाहीं. लोक आज कर्जामध्यें, व्याजामध्यें बुडत आहेत.

रा. ब. दिवाणः—आपण मागच्या रिपोर्टांचा आधार दाखवूं नका. माझ्याजवळ त्यानंतरचे रिपोर्ट आहेत. ते आपण पहा. त्यावरून रयतेची स्थिति सुधारूं लागली आहे. हें मी निश्चितपणें सांगतों.

स. स. वाटवेः—असें म्हणणें चुकीचें आहे. गहाणांत पैसे मिळत नाहींत म्हणून लोक घरेंदारें व जमिनी विकूं लागले आहेत. लोक अधोगतीला चालले आहेत. गहाणाचे व्यवहार होते त्यांचीं खरेदीपत्रें होऊं लागलीं आहेत. अशी प्रत्यक्ष परिस्थिति असतांना जमखंडी संस्थानची स्थिति समाधानकारक आहे असें म्हणणें योग्य होणार नाहीं. रयतांचें कर्ज ६० लाखांवरून कोटीवर गेलें आहे. रयतांची स्थिति समाधानकारक आहे असें दरबार म्हणत असेल तर दरबार आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध बोलत आहे असें म्हणावें लागेल. ही इमारत ज्यांच्या वैभवावर उभारली आहे अशांकरितां आपण कांहीं करणार नसाल तर, आज देशामध्यें असंतोषाची लाट उत्पन्न झाली आहे त्याला लोक बळी पडतील. दरबारनें या बाबतींत विचार केला नाहीं, रयतेबद्दल सहानुभूति दाखविली नाहीं तर त्याचे परिणाम दरबारला भोगावे लागतील. ही उपहासात्मक परिस्थिति नाहीं. ज्या जमखंडी संस्थानांत पूर्वीं कितीतरी बैल होते त्या ठिकाणीं आज बैलांची उणीव भासत आहे. ज्या ठिकाणीं २५ हजार शेळ्या होत्या त्या ठिकाणीं आज १७ हजारच आहेत. यामुळें आज खताची पंचाईत झाली आहे. शेतकऱ्यांना पुरेसें खत मिळत नाहीं. खताविना जमिनीचा कस कमी होऊं लागला आहे. आणि त्याचा परिणाम पिकांवर होत आहे व त्यामुळें शेतकऱ्यांचें उत्पन्न घटत चाललें आहे. अशा वेळीं दरबानें त्यांना मदत करणें दरबारचें कर्तव्यच आहे. गेल्या कांहीं वर्षांचे रिपोर्ट पाहिले तर पावसाचें मान कमी होत चाललें आहे. पाऊस कमी झाल्यामुळेंही शेतकऱ्यांची स्थिति खालावत चालली आहे. अशावेळीं नुसती तहकुबी देऊन काम भागणार नाहीं. शेतीला पाणीपुरवठा होईल अशी योजना दरबारनें हातीं घेतली पाहिजे. म्हैसूर संस्थानांत ज्या ज्या गांवांत ओढे होते त्याचें पाणी अडवून तेथील लोकांच्या जमिनी त्या पाण्यानें भिजतील अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळें एखादे वेळीं पाऊस पडला नाहीं तरी त्यांचें नुकसान होत नाहीं. आपल्या सुदैवानें आपल्या शेजारीं मोठी नदी आहे. त्याच्या दुथडी गांवें आहेत. ज्या गावांत नदी नाहीं त्या ठिकाणीं तलाव काढतात. परंतु आमच्या जमखंडी संस्थानांत श्रीकृष्णेचें मोठें पात्र असून सुद्धां त्याचा उपयोग होऊं नये हा परमेश्वरी योगायोग आहे कीं काय हेंच समजत नाहीं. माझें म्हणणें तुम्ही तज्ञ बोलवा. या बाबतींत तज्ञांचें मत घ्यावें. पूर्वीं श्रीमंत अप्पासाहेबांच्या वेळीं १८९४ सालीं एक स्कीम आंखली होती.

रा. सा. घोरपडे:—दड्डीची भिंत बांधावयाची होती व तशी भिंत बांधली तर पुष्कळ गांवें जाणार होतीं म्हणून ती स्कीम कॅन्सल झाली. शिवाय ती फार खर्चाची स्कीम होती.

स. स. वाटवे:—दरबारकडे तज्ज्ञ नसतील तर बाहेरचे आणा व त्यांचें मत आम्हांला कळूं द्या. म्हणजे आमच्या मनाची तळमळ तरी नाहींशी होईल. कालव्यांच्या बाबतींतील अफाट खर्च सोडून दिला तरी ज्या ठिकाणीं मोठमोठें ओढे आहेत त्या गांवांत तरी ओढ्यांच्या सहायानें पाण्याची व्यवस्था व्हावी. आम्हीं असें सांगितलें तर आमचा उपहास करण्यांत येतो. पण तुम्हींहि त्या शास्त्राचे तज्ज्ञ नाहींत. जो इसम तज्ज्ञ आहे त्यानें हेटाळणी केली तर ती योग्य होईल. परंतु तुमच्या उत्तरांनीं आमचें समाधान होणार नाहीं. या बाबतींत तज्ज्ञांचें मत आम्हांला कळूं द्या. दरबारचें धोरण सहानुभूतीचें आहे असें प्रजेला वाटूं द्या. या ठिकाणीं या गोष्टी आम्ही मांडल्या नाहींत तर वर्षांतून आलेली सुसंधि टाळल्याचें पाप आमच्यावर येईल. ह्या ठिकाणीं या शास्त्राचे तज्ज्ञ नाहींत हें आम्ही जाणतों. अेखादा परस्थ तज्ज्ञ आणला, त्याला दोन हजार रुपये दिले तर पुष्कळ उपयोग होणार आहे. शिवाय आमच्याही मनाची समजूत होईल कीं, दरबार कांहींतरी करीत आहे. दरबारचे डोळे उघडले आहेत. अशा प्रकारें दरबारनें प्रजेच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम उत्पन्न करण्याचें धोरण ठेविलें पाहिजे. ज्या गांवांत ३०० बैल होते त्या ठिकाणीं आज ६५ बैल आहेत. सहा लोकांमध्यें अेक गाडी अशीं उदाहरणें आहेत. अेक दिवस ती गाडी बसाप्पानें न्यावी तर दुसऱ्या दिवशीं मल्लाप्पानें न्यावी अशा रीतीनें कशीतरी गरज भागविली जात आहे. बैलांच्या अभावीं स्वतंत्ररीतीनें गाड्या ठेवतां येत नाहींत. आपल्याकडील आमराईची जत्रा म्हणजे अेक 'शो' आहे. यापेक्षां त्याचा ज्यास्त उपयोग कांहीं होत नाहीं. ही जत्रा कां भरविली जाते? चिंचणीला अेक जत्रा भरत असे. त्या जत्रेला हजर राहण्यासाठीं श्रीमंत अप्पासाहेब यांना गव्हर्नरांचेकडून आमंत्रण आलें. श्रीमंत अप्पासाहेब त्या जत्रेला हजर राहिले होते. आपल्याकडेही तशी जत्रा भरवावी असें म्हणून श्रीमंत अप्पासाहेबांनीं ही जत्रा सुरू केली. तथापि त्याचा उपयोग त्या वेळीं चांगला होत होता. परंतु आतां त्या ठिकाणीं उसाचा रस पिण्यापलीकडे कांहीं होत नाहीं. आज शेतकऱ्यांना बैल मिळत नाहींत. खत मिळत नाहीं, बींबियाणें मिळण्याची पंचाईत, पाण्याच्या बाबतींत अनवस्था, कर्ज फेडण्याचे बाबतींत कांहीं योजना नाहीं; अशा स्थितींत शेतकऱ्यांनीं काय करावें? आम्ही येवढे कशासाठीं ओरडतों? जमखंडी संस्थानचा लौकिक दक्षिण महाराष्ट्रांतच नव्हे तर सबंध हिंदुस्थानांत व्हावा अशी आमची तळमळ आहे. जमखंडी दरबारचे लोक चांगले आहेत असें लोकांनीं म्हणावें अशी आमची इच्छा. अखिल महाराष्ट्रांत जमखंडी संस्थान आदर्श व्हावें येवढ्यासाठींच आमची ओरड आहे. आहे ही स्थिति यापुढें नको. या बजेटाकडे पाहिलें तर प्रत्येकांचे पगार, भत्ते व सादील याशिवाय यांत कांहीं नाहीं. आज भागवत गेले उद्यां दुसरे आले तरी हीच स्थिति कायम राहाणार. रयतांकरितां पांचपन्नास हजार रुपये धरून यापुढें काम भागणार नाहीं. जमखंडी संस्थानचें कर्ज आज अेक कोटीवर आहे. शेतकरीकायद्यामुळें कोणताही सावकार जमिनी गहाण घेत नाहीं. सावकार लोक रयतेला कर्ज द्यावयाला कबूल नाहींत, आज कर्ज द्यावयाचें आणि उद्या कोर्टांत धाण करून घ्यावयाची यासाठीं सावकार लोक भितात. तेव्हां

ही स्थिति बरोबर नाहीं. आणि असाच हा आंधळा कारभार चालणार असेल तर हरकत नाहीं. आज या ठिकाणीं कांहीं मंडळी बाहेर पडलेली आहेत. ती कां बाहेर पडली आहेत याचा विचार झाला पाहिजे. मी प्रतिसहकारयोगी असल्यामुळें या ठिकाणीं राहिलों आहें. जों-पर्यंत या असेंब्लींत येण्याची संधि मिळत आहे तोंपर्यंत प्रत्येक गोष्ट आपणांपुढें मांडून त्याचा ऊहापोह करावयाचा असें मी ठरविलें आहे. आपल्या मागें लागून जेवढें जनहित साधतां येईल तेवढें साधावयाचें आहे. मी लोकमान्यांच्या अनुयायांपैकीं अेक भक्त आहें. वर्षातून दोन वेळां या असेंब्लीचीं अधिवेशनें भरवा अशी साधी मागणी केली तरी ती मान्य होत नाहीं. अधिवेशनप्रसंगीं लोकांकडून होणारी टीका दरबारला सहन होत नाहीं. टीकेची दरबा-रला भीति वाटते. परंतु जे प्राथमिक टीकाकार आहेत तेच दरबारचे खरे हितचिंतक आहेत; व जे स्वतःचा स्वार्थ साधण्याकरितां तोंडापुरत्या गोड गोड गोष्टी सांगतील ते दरबारचे हितशत्रू आहेत हें दरबारनें ओळखलें पाहिजे. ज्या जमखंडी संस्थानांत शेंकडा ८२ लोकांचें जीवन शेतीवर अवलंबून आहे तेथील शेतकरीवर्गाकरितां या बजेटामध्यें कांहींच नाहीं. तेव्हां हा शेतकरीवर्ग जिवंत तरी कसा राहील ? जेव्हां उद्योगधंद्याची वाढ होईल तेव्हां शेतकरीजीवनाचें प्रमाण कमी होईल. त्या दृष्टीनें उद्योगधंद्याची तरी वाढ करा असें म्हटलें तर तेंही दरबारला शक्य होत नाहीं. नाहीं म्हणावयास एक जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी आहे. वर्षाकाठीं हंगामी कांहीं महिने चालते व पुन्हां बंद. पण अशानें काय होणार आहे ? एकादी सुताची तरी गिरणी काढा नाहीं तर कापडाची गिरणी काढा. येथील गिरणींत तयार झालेलें कापड बाहेर जाऊं द्या. तरच ती खरी औद्योगिक प्रगति होईल. नुसत्या कापसाच्या गांठी बांधण्यानें काम भागणार नाहीं. उद्योगधंद्यांच्या बाबतींत १९२५ सालीं जी स्थिति होती त्यांत आणि आजच्या परिस्थितींत काय फरक आहे ? या १७ वर्षांच्या काळांत दरबारनें काय केलें आहे ? एक फॅक्टरी आहे तर त्यासाठीं १२६५६ रु. जादा खर्च बजेटांत आहे; आणि त्याचें कारण काय तर लोखंड महाग ! उत्पन्नाच्या बाबतींत पाहिलें तर मात्र पूर्वीचीच स्थिति कायम ! म्हैसूरच्या एका भद्रावती कारखान्याचें दररोजचें उत्पन्न सात हजार रुपये आहे असें म्हैसूरच्या असेंब्लींत एक प्रश्न विचारला असतां सांगण्यांत आल्याचें परवां वर्तमानपत्रांत वाचलें ! यावर जमखंडी दरबार म्हणेल आम्ही व्यापार करावयाचा काय? मी म्हणतों व्यापार करूं नका. परंतु एकाद्या माणसाला शिक्षणासाठीं बाहेर पाठवा. युरोप-मध्यें पाठवा नाहीं तर निदान संयुक्त प्रांतांत तरी पाठवा. इचलकरंजीला अशी शिष्यवृत्ति परदेशांत जाणाऱ्यासाठीं आहे. आपणही तशी व्यवस्था करा. कुंदगोळ सारख्या ठिकाणीं एखादी फॅक्टरी खासगी भांडवलावर निघाली व दरबारनें त्याला मदत केली येवढ्यावरच समाधान मानण्याचें कारण नाहीं. जमखंडी संस्थानच्या लोकांकरितां बँक काढली असें सांगण्यांत येतें. आम्ही शेअर्स घेतलें तेव्हांच बँक निघाली ना ? शिवाय संस्थाननें कर्तव्य म्हणून ज्या गोष्टी केल्या त्या बाबतींत आम्ही त्यांचे आभार म्हणून कां मानावयाचे ? या गोष्टी तुम्ही केल्या नाहींत तर आम्ही तुमच्यामागें लागून त्या करवून घेणार. कुंदगोळच्या फॅक्टरीपेक्षां या संस्थानांत औद्योगिक प्रगति करतां येईल किंवा नाहीं तें पाहिलें पाहिजे. यासाठीं एक तज्ज्ञाची कमिटी नेमून त्यांचें म्हणणें काय तें पाहिलें पाहिजे.

रा. ब. दिवाण:—झालेल्या गोष्टींबद्दल बोलावयाचें नाहीं आणि ज्या झाल्या नाहींत त्याबद्दल ओरड करावयाची हें बरोबर नाहीं. यापूर्वीं एक ( inquiry ) कमिटी नेमली होती.

स. स. वाटवे:—मागें जी ( inquiry ) कमिटी नेमली होती ती शेतीच्या बाबतींत काय सुधारणा करतां येतील यासाठीं नेमली होती. परंतु त्याची डोंगर पोखरून उंदीर काढला याप्रमाणें स्थिति झाली. आम्ही पैसे जमा केले, ठिकठिकाणीं माहिती गोळा करण्यासाठीं दौरे काढले, भत्ते घेतले, मेजवान्या झोडल्या आणि रिपोर्ट तयार केला आणि तो रिपोर्ट दप्तरांत तसाच बांधून ठेविला ! यापलीकडे कांहीं होत नाहीं. जो रिपोर्ट केला आहे तो रेकॉर्डमध्यें धूळ खात पडला आहे ! ज्या कमिटीकरितां येवढा पैसा खर्च झाला, त्या कमिटीनें केलेल्या रिपोर्टाकडे डोळे उघडून पहा. जमखंडी संस्थानांत बन्हट्टी गांव कोष्टी लोकांचें आहे; त्या लोकांना तुम्ही विश्वासांत घ्या. त्यांच्या अडचणी लक्षांत घ्या. त्यांना मदत करा. बन्हट्टीचा कपडा यापुढें संस्थानांतील सर्व लोकांनीं वापरला पाहिजे असा सामान्य नियम केला तरी पुष्कळ काम होणार आहे. यामुळें त्यांच्या धंद्याला मदत केल्यासारखें होणार आहे.

यानंतर शिक्षणाकडे मी वळतों. आमच्याकडे हल्लीं मोफत शिक्षण आहे. या बाबतींत मला २।३ सूचना करावयाच्या आहेत. त्या रा. सा. मंत्र्यांनीं लक्षांत घ्याव्या अशी माझी विनंति आहे. इंग्रजी शाळांमधून मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बहुतेक ४० ते ५० पर्यंत मुलें असतात. वर्गांत ५० मुलें आणि ४५ मिनिटांचा तास ! ४५ मिनिटांत ५० मुलांकडे शिक्षकाला लक्ष द्यायला अवसर कसा मिळणार ? व तो शिक्षक शिकवणार तरी काय ? तेव्हां या बाबतींत जरूर ती तजवीज झाली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी कीं, युनिव्हर्सिटीमध्यें नुसतीं मुलें पास होणें याला कांहीं महत्त्व नाहीं. आमच्या शाळांमधून रामभाऊ रानडे यांच्यामागें एकहि शंकरशेट येऊं नये ही खेदाची गोष्ट आहे. सांगली हायस्कूलमध्यें दरवर्षीं शंकरशेट येऊं शकतो; तर आमचेकडे तसा कां येऊं नये ? सांगली हायस्कूलमध्यें श्रीपादशास्त्री देवधर, आपल्या मंत्र्यांचे चुलते संस्कृत शिकवायला आहेत. त्यांना दरबारकडून २०० रु. रोख व एक शाल मोबदला मिळते. आमच्याकडे ९२ हजार रुपये शिक्षणासाठीं खर्च होत आहे. तेव्हां मी अशी सूचना करणार आहे कीं, आमच्याकडेही असा शंकरशेट येण्याबद्दल प्रयत्न करावा. आपल्याकडे गोटे मास्तर आहेत ते प्रयत्न करतील परंतु दरबारनें त्याबद्दल कांहींतरी बक्षीस म्हणून त्यांना दिलें पाहिजे. त्यांच्या कष्टांचें चीज झालें पाहिजे. मुलांची बौद्धिक वाढ कशी होईल, जमखंडी संस्थानच्या विद्यार्थ्यांचा नांवलौकिक कसा वाढेल यांकडे दरबारनें लक्ष पुरविलें पाहिजे. आमच्याकडील शिक्षकवर्ग अत्यंत कष्टाळू व कसोशीनें काम करणारा आहे. श्री. आपसंगी, रायबागी, बोडस वगैरे हुशार शिक्षक आमच्याकडे आहेत. जे शिक्षक जीवापाड मेहनत करतात त्यांना कांहींतरी पांच, तीन, दोन एक रुपया दरबारनें प्रमोशन म्हणून दिला पाहिजे. अशा प्रकारें त्यांना प्रोत्साहन मिळालें तर चांगलेंच काम त्यांच्या हातून होईल. औद्योगिक शिक्षणासंबंधीं बोलावयाचें झाल्यास बडोदें संस्थानांत जसें कोष्टी लोकांच्या

मुलांकरितां रंग कसा करावा, विणकाम कसें करावें, वगैरेंचे त्यांच्या भावी आयुष्याला उपयोगी पडणारें शिक्षण दिलें जातें; तशा प्रकारची व्यवस्था आपल्याकडेही होणें आवश्यक आहे. गिरणीच्या कापडापेक्षां कोष्टाऊ कापड आकर्षक असतें व त्याची इमिटेशन गिरण्यांना करतां येत नाहीं. यासाठीं जपानसारख्या ठिकाणीं एखादा मनुष्य संस्थानतर्फे पाठविणें जरूर आहे. जमखंडी संस्थानची आयात व निर्यात पाहिली तर निर्यातीपेक्षां आयातच आपल्याकडे जास्त प्रमाणांत आहे. निर्यातीपेक्षां दहा लाख रुपये किंमतीचा माल जास्त येतो. दरवर्षी दहा लाख रुपये आपल्याकडील बाहेर गेले तर १० वर्षांत किती पैसे बाहेर जाईल याचा विचार करा.

कालच श्रीमंतांनीं आपली तिजोरी खर्चानें भारावलेली आहे असा इषारा आपल्या भाषणांत दिला आहे; याचा अर्थ काय होतो ? दरबारांकडून अवास्तव खर्च होत असल्यामुळेंच अशा प्रकारचा इषारा देणें श्रीमंतांना भाग पडलें. या सध्यांच्या आंधळ्या राजकारणामुळें श्रीमंतांची आणि प्रजेची फसवणूक होत आहे. मी गेल्या वर्षी म्हणालों होतों कीं, श्रीमंतांच्या तिजोरीवर हा दरवडा पडत आहे त्यावेळीं माझ्या म्हणण्याचा उपहास करण्यांत आला. परंतु श्रीमंतांनाहि तसाच इषारा देण्याची पुन्हा पाळी आली आहे. याचा सचिवांनीं विचार करावा. आम्ही काटकसर करा म्हटलें तर आम्हांला विचारण्यांत येतें काटकसर कोठें करावी ? मला आपल्याला असें विचारावयाचें आहे कीं, जीं दोन किंवा चार लाखांचीं संस्थानें आहेत त्या ठिकाणीं राज्यकारभार चालविला जातोच ना ? त्या ठिकाणीं दिवाण आहेत, न्यायाधीश आहेत, प्रायव्हेट सेक्रेटरी आहेत, पोलिस ऑफिसर्स आहेत; सर्व कांहीं आहे. मग त्या लोकांचा खर्च कसा भागतो ? हायकोर्टाची जागा कमी करा म्हणून कित्येक दिवस ओरड चालली आहे परंतु अद्याप कमी करण्यांत आलेली नाहीं. त्या जागेसाठीं दरवर्षी ६४०० रु. खर्च होत आहे. बरें काम पहावें तर वर्षाकाठीं ४।६- अपिलें; आणि खर्च पहावा तर ६४०० रु. अक्कलकोट, जत, मुधोळ वगैरे संस्थानांप्रमाणें अपिलांच्या करितां दोन महिने हायकोर्ट बोलवावें व त्याकरितां हजार–पांचशें रुपये खर्च झाले तरी परवडतील. निष्कारण मोठेपणाच्या भावनेला बळी पडून हा अवास्तव खर्च होत आहे. ह्या बजेटासंबंधीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आगडबंब जमेचे, बिनहिशोबाचें, वाह्यात् खर्चाचें, रयतेच्या उपयोगी न पडणारें असें आहे. अशा प्रकारचें बजेट असणें योग्य व युक्त नाहीं असें माझें म्हणणें आहे.

स. स. सोहोनी:—या बजेटासंबंधीं अधिक आतां कांहीं बोलावयाचें राहिलेलें नाहीं. बजेटावर टीका करतांना मनुष्य भावनेच्या भरांत बऱ्याचशा गोष्टी बोलून जातो. तथापि त्याबद्दल मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. आज हें बजेट तोटयाचें आहे तें फायद्याचें कसें होईल याबद्दल आपल्याला विचार केला पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणें यावर तावडतोबीचा इलाज म्हणजे खासगीकडील खर्च कमी करणें हा होय.

मे. अध्यक्षः— तसें आपल्याला बोलतां येणार नाहीं.

स. स. सोहोनी:—तसें बोलतां येणार नाहीं तर आणखी दुसरा मार्गच नाहीं.

नाहीं तर दिवाणसाहेब तरी काय करणार ? याशिवाय मला असें वाटतें कीं, आपल्या संस्थानांतील लोकांनीं जास्तींत जास्त साधी राहणी ठेविली पाहिजे. त्याचप्रमाणें सर्व व्यवहार पैशाच्या रूपानें न होतां प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपानें झाले पाहिजेत हा प्रघात मी ज्या ठिकाणीं काम करतों तेथें आहे. तेथें २५।३० नोकर आहेत. त्यांना रोख पैशाच्या रूपानें सर्व पगार दिला जात नाहीं. कांहीं रोख पैसे देऊन बाकीचे धान्यादि आवश्यक वस्तूंच्या रूपानें दिले जातात. आपल्या संस्थानांत तसाच प्रघात पडल्यास त्याचा फार चांगला उपयोग होईल. जो दीडशें रुपये पगाराचा नोकर आहे त्याला फक्त १०० रु. च रोख मिळतील व राहिलेलें ५० रु. त्याला वस्तूंच्या मोबदल्यांत मिळतील. अशानें संस्थानांत उत्पन्न होणारा माल सरकारतर्फेंच खरेदीला जाईल. तुम्हीं घरांत सुद्धां कोष्टावू लुगडीं वापरलीं पाहिजेत. गिरणीचें कापड बिलकूल घेतां कामा नये. नाहीं तर पगार मिळणार नाहीं. जमखंडी संस्थानांत जेवढा माल तयार होतो तेवढा सर्व सरकारनें खरेदी करून स्टॉक केला पाहिजे. ही कांहीं विशेष खर्चाची बाब आहे असेंहि नाहीं. दुसरें, आपल्या येथें कुंभार लोक आहेत त्यांचेकरितां Pottery वर्क काढलें तर त्या लोकांना चांगलें काम मिळेल. कुंद्गोळ तालुक्यांत तांबडी माती मिळते त्याचा ह्या कामीं उपयोग करावा.

रा. सा. घोरपडे:—आपल्या येथें तांबडी माती कोठेंहि नाहीं.

स. स. सोहनी:—यानंतर आमच्या संस्थानांत कपाशीचें उत्पन्न फार मोठ्या प्रमाणांत आहे; तेव्हां त्या दृष्टीनें Spinning and Weaving मिल्स काढतां आल्यास बरें होईल. अलीकडे बहुतेक संस्थानांतून–सांगली, मिरज, फलटण, कोल्हापूर–साखरेचे कारखाने निघाले आहेत; व त्यामुळें त्या संस्थानच्या उत्पन्नांत बरीच वाढ झाली आहे. तसा कारखाना आपल्याकडे निघावयास कांहींच हरकत नाहीं. फलटणच्या एका साखरकारखान्यामुळें त्या संस्थानचें उत्पन्न साडेतीन लाखांनीं वाढलें आहे. याशिवाय आपल्या संस्थानांत मेंढपाळाचा धंदा मोठ्या प्रमाणावर आहे. त्या दृष्टीनें लोकरीचा एकादा कारखाना निघावयास हरकत नाहीं असें मला वाटतें. त्याकरितां एकादा मनुष्य धारीवाल सारख्या ठिकाणीं पाठविला पाहिजे. शिक्षण-मंत्र्यांनीं या गोष्टींचा अवश्य विचार करावा. अशारीतीनें लहान लहान योजना आंखून हातीं घेतल्यास त्या यशस्वी होतील. अशामुळें आज आपल्याला जें तुटीचें बजेट दिसत आहे, तें तुटीचें न दिसतां फायद्याचेंच दिसेल.

तरी या बाबींचा दरबारनें अवश्य विचार करावा असें माझें आग्रहाचें सांगणें आहे. नुसती टीका करण्यांत कांहीं फायदा आहे असें मला वाटत नाहीं, येवढें सांगून मी माझें भाषण संपवितों.

रा. ब. दिवाण:—अध्यक्ष महाराज आणि सन्मान्य सभासद, माझे सन्मान्य मित्र स. स. वाटवे यांनीं तासभर भाषण करून त्यांनीं आपल्या भाषणानें सभागृहास डोलावयास लावलें. ते अेक नाणावलेले वकील व उत्तम वक्ते आहेत. त्यांनीं कशीहि छाननी केली तरी त्याचा परिणाम श्रोतृवर्गावर तेव्हांच व्हायचा. परंतु असा एकहि गुण दुर्दैवानें माझ्याजवळ नाहीं. माझा सबंध जन्म खर्डेघाशींत गेला असल्यामुळें, मला त्यांच्यासारखें वक्तृत्त्व करतां

येत नाहीं. प्रथम मला सांगावयास वाईट वाटतें कीं, स. स. वाटवे यांनीं बजेटनोट जर carefully वाचली असती तर लोकांची डिपॉझिट्सची १२५००० रु. रक्कम बजेटांत धरलेली नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें असतें. १२५००० रु. इतकी डिपॉझिट्सची रक्कम धरून बजेट तयार करण्यांत आलें आहे हें स.स.वाटवे यांचें चुकीचें विधान आहे.यासंबंधीं बजेटनोटमध्यें मी सविस्तर खुलासा केलेला आहे. कर्ज तसलमात व अनामत, या तीनहि खात्यांकडे मिळून २६०००० रु. जमेकडे व तितकीच रक्कम खर्चाकडे धरणेंत आली आहे; या तिन्ही बाबी जमाखर्चाच रकमा असल्यानें त्याही निव्वळ उत्पन्नाच्या किंवा खर्चाच्या बाबी होऊं शकत नाहींत. याही रकमा दुबेरजीसारख्या समजून वट्ट जमाखर्चाच्या अंदाजाच्या रकमेंतून वजा केल्या तर जमा ७४७३८१ रुपये व खर्च ७८७२०२ अशा खऱ्या जमाखर्चाच्या रकमा राहातात. तेव्हां हें चुकीचें बजेट नाहीं हें मला आपल्या निदर्शनास आणावयाचें आहे. यापेक्षां मला अधिक खुलासा करतां येणार नाहीं. बाकी इतर ज्या गोष्टी सन्मान्य सभासदांनीं सांगितल्या त्यांतील मला एकही नवीन नाहीं. आतांपर्यंत मी सहा बजेट्स् केलीं आहेत; आणि या गोष्टी नेहमींच्याच आहेत. म्हैसूर, हैद्राबाद वगैरे संस्थानचीं नांवें घेण्यांत येतात परंतु त्या संस्थानची परिस्थिति काय, उत्पन्न किती याचा विचार केला आहे काय? त्यांची व आपली बरोबरी कशी होणार? एखादा उत्तम आचारी आणला व त्याला जरूर तें सामान देण्या ऐवजीं फक्त जोंधळ्याचें पीठ व मीठ दिलें व त्याला पुणेरी पद्धतीचें उत्तम जेवण करण्यस सांगितलें तर त्याला तें कसें शक्य होणार? तो आचारी कितीही निष्णात असला तथापि योग्य त्या जिनसांच्या अभावीं त्याला आपलें कौशल्य दाखवितां येणार नाहीं.

यानंतर सांगावयाचें म्हणजे १९३८–३९ सालचा ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला व त्यांवरून रयतांची स्थिति समाधानकारक नाहीं असें सभागृहालां भासविण्यांत आलें. पण त्या रिपोर्टाला चार वर्षें झालीं आहेत त्यानंतरचे अगदीं अलिकडचे रिपोर्ट वाचून पहा; व त्यावरून रयतांची स्थिति सुधारली आहे किंवा नाहीं तें पहा. मी आपल्याला १९४०–४१ चा रिपोर्ट वाचून दाखवितों ( पान ७६ वाचतात. ) यावरून रयतांची स्थिति कशी आहे हें सभागृहाच्या निदर्शनास येईल. गेल्या चारपांच वर्षांत शेतकऱ्यांच्या पदरांत सात लाखांची सूट म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हे.

स. स. वाटवे:—श्रीमंतांनीं पांच वर्षांपूर्वीं रुपयामागें चार आणे सूट दिली. शंभर रुपये द्यावयाचें त्या ठिकाणीं ७५ रु. दिले आहेत. त्या सुटीचा यांत समावेश आहे असें दिसतें.

रा. ब. दिवाण:—जुन्या arrears सोडलेल्या आहेत. मी आपणाला चॅलेंज देऊन सांगतों कीं, पूर्वीपेक्षां रयतांची स्थिति आतां सुधारलेली आहे. को-ऑपरेटिव्ह सोसायट्या ठिकठिकाणीं काढल्या; त्याकरितां प्रो. काळे यांना दरबारनें आणलें. तें शेतकरी लोकांकरितांच ना? ते कांहीं नोकर लोकांकरितां नाहीं. ज्या गोष्टी झाल्या त्याबद्दल बोलायचें नाहीं व झालें नाहीं त्याबद्दल ओरडायचें हा प्रघात आहे. यापेक्षां मला अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं.

रा. सा. देवधर:—सन्मान्य अध्यक्ष व सन्मान्य सभासद, आतांपर्यंत बजेटासंबंधीं दोन सन्मान्य सभासदांनीं ज्या कांहीं सूचना केल्या आहेत त्या सर्वच आम्हांला मान्य करतां येणार नाहींत. आपणाकडे निरनिराळे कारखाने असावे असें सन्मान्य सभासदांचें म्हणणें आहे;

परंतु आपल्या एकंदर संस्थानच्या परिस्थितीचा विचार करतां आपल्याला तसें करणें कितपत शक्य आहे याचा विचार करून जर सन्मान्य सभासदांनीं सूचना मांडल्या असत्या तर अधिक बरें झालें असतें. शिक्षणखात्यासाठीं आज ९२ हजार रु. खर्च होत आहे; यापेक्षां या खात्यावर अधिक खर्च करतां येणें आजच्या परिस्थितींत तरी शक्य नाहीं. आज आमच्या शाळांतील शिक्षण युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमाप्रमाणें चाललें असल्यामुळें त्यांतही कांहीं बदल करतां येणार नाहीं. आपल्याप्रमाणें मलाही साक्षरतेचें प्रमाण वाढावें असें वाटतें. तसेंच आमच्याकडे दरवर्षी शंकरशेट यावा असें माझेंही मत आहे; परंतु या सर्व गोष्टी आहे या बजेटांत कशा बसवाव्यात हा मोठा प्रश्न आहे. आमच्या शाळांतील शिक्षकवर्ग अत्यंत कष्टाळू व मेहनती आहे याची मला जाणीव आहे. आणि त्याचें द्योतक म्हणजे आपल्या शाळांचा रिझल्ट फार चांगला लागतो. आपल्याकडील भट नांवाचा विद्यार्थी बॉम्बे युनिव्हर्सिटींत तिसऱ्यानें बरला आला ही गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं. बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. तथापि शिक्षकांना प्रोत्साहन मिळावें म्हणून त्यांना प्रमोशन देण्यांत येतें हेंहि विसरून चालावयाचें नाहीं.

यानंतर औद्योगिक प्रगतीसंबंधीं सांगावयाचें म्हणजे आपल्या ह्या दक्षिण महाराष्ट्रांत चारदोन मोठीं संस्थानें वगळल्यास बाकी १८ संस्थानांत अशा कोणत्या प्रकारच्या औद्योगिक अगर शैक्षणिक योजना आंखल्या आहेत तें मला दाखवून द्यावें.

स. स. वाटवे:—इचलकरंजीला परदेशांत जाणाऱ्या मुलांकरितां स्कालर्शिप्स ठेविल्या आहेत. आपल्याकडे तशी व्यवस्था आहे काय ?

रा. सा. देवधर:—दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना कॉलेज शिक्षण फ्री मिळावें म्हणून सोय केली असून त्याचा फायदा आज शेकडों मुलांना मिळाला आहे. त्याच रकमेचा निधि केला असतां तर आज दोन लाख रुपये निधि झाला असतां व त्या निधींतून एक नवीन योजना आखतां आली असती किंवा विद्यार्थ्यांना परदेशींहि पाठवितां आलें असतें. यापुढें शिक्षणखात्यांत सुधारणा करावयाची म्हणजे शाळांवर tax बसविल्याशिवाय शक्य नाहीं.

यानंतर शेती, ग्रामसुधारणा वगैरें बाबतींत सुधारणा होण्याच्या दृष्टीनें आपल्या गांवीं जी जत्रा भरते त्याचा चांगला उपयोग होतो. यासाठीं दरबारला बरीच रक्कम खर्च करावी लागते. त्या ठिकाणीं उत्तम गुरांची पैदास कशी करावी; त्यांची जोपासना कशी करावी वगैरेंची माहिती ब्रिटिश हद्दींतील तज्ज्ञाकडून दिली जाते. त्यासंबंधीं मराठीं व कानडी भाषेंत पत्रकें तयार करून वाटण्यांत येतात. खेडेगांवांतील मास्तर लोकांना गुरांची पैदास कशी करावी, कोंबड्यांची पैदास कशी करावी याबद्दलची माहिती देण्यांत येते. यानंतर दुसरी गोष्ट मला आपल्याला अशी सुचवावयाची आहे कीं, यापुढें प्रत्येक बाबतींत दरबारवर अवलंबून न राहतां स्वावलंबनाचा मार्ग पत्करला पाहिजे. महात्मा गांधींनीं सांगितल्याप्रमाणें प्रत्येकानें सूत काढून त्याचें स्वतःकरितां कापड तयार करून तें वापरलें पाहिजे. आज खादी वापरल्याशिवाय तरणोपाय नाहीं. प्रत्येक माणसानें स्वतःला लागणारें कापड स्वतः तयार केलें पाहिजे - हा स्वावलंबनाचा मार्ग आहे. यानंतर विणकरांसंबंधींचा जो प्रश्न आहे तो आपल्यापुरता मर्या-

दित स्वरूपाचा नाहीं. हा संबंध हिंदुस्थानचा प्रश्न आहे. यासंबंधीं ब्रिटिश इंडियांत विचार-विनिमय चालला आहे. त्याचा निर्णय लागल्याशिवाय या बाबतींत आपल्याला धोरण ठरवितां येणार नाहीं. यानंतर एकच गोष्ट मला सांगावयाची आहे ती हीं कीं, आपण सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार करावा व त्यानंतरच योग्य सूचना सुचवाव्या; यापेक्षां मला अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं.

## उपहारानंतर

उपहारानंतर काळरोजीं रा. सा. न्यायमंत्री यांनीं आणलेल्या बिलाबद्दल चर्चा सुरू झाली.

मे. अध्यक्षः—कलम ३ पुन्हां वाचावें. ( कलम ३ वाचतात. )

स. स. सोहोनी—कलम ३ यांतील ' किंवा सर्व मंडळ्यांतून ' हे शब्द काढावे.

रा. सा. न्यायमंत्रीः—कांहीं हरकत नाहीं त्याप्रमाणें हे शब्द काढण्याचें ठरलें. यांत कोणाला कांहीं आणखी दुरुस्ती सुचवावयाची आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) नाहीं. आतां चवथें कलम वाचावें. ( कलम ४ वाचतात. )

स. स. सोहोनीः—कलम ४ मधील " ... सदर बॅन्केची अगर सदर बॅन्केच्या शाखेची .... " " यांतील "शाखेची" हा शब्द Omit करावा.

स. स. वाटवेः—"शाखेची" हा शब्द Omit करण्याचें कारण नाहीं. बँक पतपेढीला कर्ज देतें तेव्हां बँकेचा डायरेक्ट संबंध पतपेढीशीं येत नाहीं काय ?

रा. सा. पटवर्धनः—आतां या बिलाचें दुसरें वाचन मंजूर करावें अशी विनंति आहे.

मे. अध्यक्षः—ह्या बिलाचें दुसरें वाचन मंजूर होण्याला कोणाचा विरोध आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) कोणाचा विरोध नसल्यामुळें या बिलाचें दुसरें वाचन मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों. आतां तिसरें वाचन करावें.

रा. सा. पटवर्धनः—आतां तिसरें वाचन मंजूर व्हावें अशी विनंति आहे.

मे. अध्यक्षः— तिसऱ्या वाचनास कोणाचा विरोध नसल्यानें तिसरें वाचन मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों. आतां ठराव घ्यावे.

### स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णूपंत आपटे यांचा ठराव नं. २.

" हायस्कुलांत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना ड्रिल व सायन्स या विषयांऐवजीं गृहोपयोगी शिक्षणाची सोय करण्यांत यावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे."

स. स. सौ. आपटेः—हल्लीं हायस्कुलांत मुलींना ड्रिल व सायन्स हे विषय शिकविण्यांत येतात. परंतु या विषयांचा मुलींना त्यांच्या भावी आयुष्यांत कांहीं उपयोग होऊं शकत नाहीं. म्हणून हे दोन्ही विषय कमी करून त्याऐवजीं मुलींना गृहशिक्षण द्यावें. बहुतेक मुली कांहींना कांहीं कारणांमुळें त्यांचा शिक्षणक्रम पुरा होतो न होतो तोंच त्या संसारांत पडतात.

चूल आणि मूल हेंच स्त्रियांच्या बाबतींत ब्रीदवाक्य ठरलें असल्यामुळें त्या दृष्टीनें मुलींना शाळांतून शिक्षण मिळालें पाहिजे; व तसें शिक्षण त्यांना लहानपणापासून मिळालें तरच त्यांचा भावी संसार सुखाचा होणार आहे. गृहोपयोगी शिक्षण घेऊन जर सायन्स व ड्रिल हे विषय शिकवितां आले तर तें चांगलेंच होईल. परंतु तसें होईलसें वाटत नाहीं. तेव्हां आपण सर्वांनीं हा ठराव मंजूर करावा अशी आपणांस विनंति आहे.

स. स. वाटवेः—या ठरावांतील "ड्रिल" "व" हे दोन्ही शब्द omit करावेत. तसेंच "सायन्स या विषयाऐवजीं" असे शब्द आहेत त्या ठिकाणीं "सायन्स या विषयाव्यतिरिक्त" असे शब्द घालावेत. ही amendment आपल्याला स्वीकारायला कांहीं हरकत नाहीं.

स. स. सौ. आपटेः—आपली amendment मला मान्य आहे.

सेक्रेटरी अमेंडमेंटसह ठराव वाचतात.

रा. सा. देवधरः—या ठरावाची भाषा आणि विषय फारच उत्तम आहे आणि माझी इच्छा आपल्या शाळांतून मुलींना गृह-शिक्षण (Domestic science) द्यावें अशी आहे. सध्यां आपल्याकडे जें शिक्षण चाललें आहे तें एका विविक्षित संस्थेमार्फत चाललें असून त्या संस्थेच्या कार्यक्रमाप्रमाणें चाललेलें आहे. जोंपर्यंत मुंबई विश्वविद्यालयाच्या कार्यक्रमाप्रमाणें आपला अभ्यासक्रम चालला आहे तोंपर्यंत आपल्याला त्यांत कांहीं बदल करतां येणार नाहीं. कर्वे युनिव्हर्सिटीमध्यें मात्र असा उपक्रम चालू आहे. तेथें गृहोपयोगी अशा प्रकारचें शिक्षण दिलें जातें व त्या युनिव्हर्सिटीची गृहीतागमा अशी पदवी आहे व त्याला मुंबई सरकारची मान्यता आहे. तथापि सध्यांच्या शिक्षणाचा पाया व अंतिम ध्येय मुंबई विश्वविद्यालयाच्या परीक्षांच्या दृष्टीनेंच ठरविलें असल्यामुळें आपण केलेल्या सूचना कितीहि उपयुक्त असल्या तरी त्यांना मला विरोध करावा लागत आहे. सध्यां मुली B. A. झाल्या तरी त्यांना एक कपभर चहासुद्धां करतां येत नाहीं. सध्यां त्यांना जें शिक्षण मिळतें त्या शिक्षणाचा त्यांना आपल्या भावी आयुष्यांत कांहींहि उपयोग होत नाहीं याची मला स्वतःला जाणीव आहे. परंतु आपला हा शिक्षणक्रम मुंबई विश्वविद्यालयाचा असल्यामुळें आपल्याला त्यांत बदल करतां येणार नाहीं. आपण सुचविलेला उपक्रम स्तुत्य आहे व आपला ठरावहि योग्य आणि विषयाला साजेसा आहेः परंतु नाइलाजानें हा मंजूर करतां येत नाहीं, सबब त्याला विरोध करावा लागत आहे. तेव्हां आपण हा ठराव मागें घ्यावा असें मला वाटतें.

स. स. सोहोनीः—प्रतिकूल परिस्थितीमुळें मला या बाबतींत असें सुचवावेसें वाटतें कीं, गृहोपयोगी शिक्षणापेक्षां मुलींना म्युझिक शिकवावें. स्त्रियांचा जात्याच गोड गळा असतो, व त्यामुळें म्युझिकमध्यें त्यांना गोडी लागेल.

रा. सा. देवधरः—सध्यां गाण्याची सोय आहे.

स. स. सोहोनीः—तसेंच चित्रकलेचें शिक्षण मुलींना द्यावें.

रा. सा. देवधरः—Drawing हि शिकविलें जातें.

स. स. सोहोनी:—डोमेस्टिक सायन्स म्हणजे गृहशिक्षण. परंतु गृहशिक्षण हें कोठेंहि दिलें जात नाहीं, तें अनुभवानें आपोआप मिळतेंच. चूल आणि मूल सांभाळण्याचें शिक्षण देऊन कोणी शिकत नाहीं. जसें पाण्यांत पडल्यानें आपोआपच पोहायला येतें तसेंच चूल आणि मुलें सांभाळण्याचें शिक्षण प्रत्यक्ष संसारांत मिळल्यावर आपोआपच मिळत जातें. तेव्हां ह्या ठरावाची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटे:—या ठरावाची भाषा निराळी आहे. ड्रिल आणि सायन्स या विषयांच्या वेळांत गृहशिक्षण शिकवावें असें ठरावांत स्पष्ट आहे, यांत चित्रकला, ललित कला हे विषय येऊं शकत नाहींत. फक्त ड्रिल व सायन्सचे जे तास आहेत तो घेत असतानांच त्याच वेळांत मुलींना गृहशिक्षण द्यावयाचें आहे.

स. स. सोहोनी:—ड्रिलला दोन तास असतात; ९० मिनिटांत काय होणार आहे.

स. स. सी. व्ही. आपटे:—हायस्कूलमधून गृहशिक्षणाची योजना आंखणें ही कल्पनाच मला अभिनव वाटते. चूल आणि मूल ही योजना शाळेंत कशी साध्य होणार ?

स. स. वाटवे:—शाळांत मुलींना शिवणकाम, भरतकाम वगैरे शिकवायला कांहीं हरकत नाहीं. भावी आयुष्यांत या कलांचा मुलींना चांगला उपयोग होईल. आपल्याकडे हायस्कूलमधून ही सोय नाहीं.

रा. सा. देवधर:—ते विषय औद्योगिक शिक्षणांत येतील.

स. स. वाटवे:—त्याला आपण नांव कांहींही द्या.

रा. सा. देवधर:—अशी लोकांची मागणी आहे काय ?

स. स. वाटवे:—होय.

मे. अध्यक्ष:—ड्रिल अजिबात नको काय ?

स. स. वाटवे:—गृहशिक्षण मिळत असून शिवाय ड्रिल मिळत असल्यास अवश्य पाहिजे.

रा. सा. देवधर:—ही खर्चाची बाब आहे.

स. स. वाटवे:—बजेटमध्यें तशी व्यवस्था करावी.

रा. सा. देवधर:—हें कसें होईल.

स. स. वाटवे:—एक जादा मास्तरीण ठेवा.

स. स. चौधरी:—मुलींना निराळें शिक्षण द्या. मुलें–मुली यांचा एकत्र गोंधळ करूं नका. नाहीं तर भाऊ नाहीं, बहीण नाहीं अशी स्थिति व्हायची.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव ६ विरुद्ध ७ मतांनीं नापास झाला.

### स. स. पांडुरंग वाटवे यांचा ठराव नं. ३

" जमखंडी हायस्कूलांत फिजियॉलजी व हायजिन मॅट्रिकचे विद्यार्थ्यांस शिकविणेची सोय जरूर व्हावी अशी या सभेची श्रीमंत राजेसाहेबांना विनंति आहे. "

हा ठराव अतिशय सरळ आहे. आपल्याकडे शाळांमधून फक्त फिजिक्स केमिस्ट्रि शिकविली जाते. फिजियॉलजी व हायजीन हे विषय शिकविण्याची सोय नाहीं. वैद्यकीकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यामुळें गैरसोय होते. शिवाय हे विषय मुंबई विश्वविद्यालयाच्या कार्यक्रमांत आहेत. तसेंच हे विषय शिकविण्यासाठीं स्वतंत्र शिक्षक ठेवण्याची आवश्यकता नाहीं. आपल्याकडे डॉक्टर्स आहेत त्यांचेकडे हे विषय द्यावे. शिवाय अशी व्यवस्था इतर संस्थानांतून आहे. तरी हा ठराव सर्वांनीं मंजूर करावा अशी विनंति आहे.

रा. सा. देवधरः—ह्या ठरावाला विरोध करण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु फिजियॉलाजि हायजिन हा विषय घेणारे आपल्याकडे किती विद्यार्थी आहेत याचा विचार केला पाहिजे. हा विषय घेऊन बसणारांची संख्या फारच कमी असते.

स. स. वाटवेः—हा विषय शिकविला जात नाहीं म्हणून मुलें हा विषय घेत नाहींत. आमच्या शाळांमधून तशी व्यवस्था झाल्यास पुष्कळ मुलें हा विषय घेतील. तरी या बाबतींत दरबारनें विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांची कोणतीहि गैरसोय होऊं नये याकडे लक्ष दिलें पाहिजे. या विषयाची अवहेलना होऊन चालणार नाहीं. शिवाय हा विषय एखाद्या डॉक्टरकडे सोंपवावा.

मे. अध्यक्षः—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव सर्वानुमतें मंजूर झाल्याचें मे. अध्यक्षांनीं जाहीर केलें.

### स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचा ठराव नं. २

" हरिजन वर्गासाठीं निराळ्या शाळा काढणें इष्ट न वाटल्यास, आहे त्या शाळांमधून जास्तीचे नोकर नेमून सदर मागासलेल्या वर्गाची शिक्षणाची सोय जास्त प्रमाणांत होईल अशी सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था करणेंबद्दल या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे."

### स. स. नवणी ( कानडी भाषण )

मी हा जो ठराव मांडला आहें, त्याबद्दल कोणाचें दुमत असूं शकेल असें मला वाटत नाहीं. हरिजनांना साक्षर करण्याच्या दृष्टीनें त्यांच्यासाठी निराळ्या शाळा काढण्यांत याव्यात असें माझें म्हणणें आहे; तसें शक्य नसल्यास हल्लींच्या शाळांमधून मागासलेल्या लोकांच्या शिक्षणाची सोय जास्तीचे नोकर नेमून करण्यांत यावी. मागासलेल्या लोकांवर शिक्षणाची

सक्ति करण्यांत यावी; त्याशिवाय त्यांचीं मुलें शिक्षण घेण्यास मोठ्या प्रमाणावर येणें शक्य नाहीं. तरी या ठरावाचा सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा अशी माझी विनंति आहे.

रा. सा. देवधरः—ह्या ठरावाचें तत्त्व पूर्णपणें मान्य आहे. हल्लीं शाळांतून हरिजन आणि इतर असा भेदभाव राहिला नाहीं. हरिजनांचीं मुलें उच्चवर्णीयांबरोबर एकत्र बसतात व शिक्षण घेतात. तेथें भेद राहिलेला नाहीं. खेडेगांवांतूनही अशा प्रकारचा भेदाभेद नाहींसा होत आहे. शाळाखात्याचें लक्ष हरिजनाकडे आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. मात्र हरिजनासाठीं स्वतंत्र शाळा काढल्यास स्पृश्यास्पृश्य हा भेद जास्त वाढेल अशी भीति वाटते. महात्मा गांधी आदि राष्ट्राचे पुढारी हा भेदाभेद नाहींसा व्हावा म्हणून जिवापाड मेहनत करीत आहेत. परंतु आपल्या ह्या संस्थानांत हा वर्णभेद आपोआपच नाहींसा होत आहे. आमच्या मुलांबरोबर हरिजनादी अस्पृश्य मुलें आज शिक्षण घेत आहेत. कोणताही मास्तरसुद्धां हा वर्णभेद शाळांतून मानीत नाहीं. शिवाय आपल्या समाजापैकीं एक मास्तर नेमलेला आहे; व त्याच्याकडे इतर जातींतील मुलें शिक्षण घेतात. गुरुजी म्हटल्याबरोबर— मग तो कोणत्याही जातींतील असला तरी—त्याच्या पायापाशीं बसून शिक्षण घेतलें पाहिजे. तेथें भेद मानण्याचें कारण नाहीं. समाजांतून स्पृश्यास्पृश्य हा भेद नाहींसा होऊन समाज प्रगमनशील मार्गावर असतां आपण हा अशा तऱ्हेचा वर्णभेद कायम राहाण्याचा ठराव आणावा हें बरोबर नाहीं. महात्मा गांधींचेंही म्हणणें असें आहे कीं, हरिजनांसाठीं निराळया शाळा काढूं नका. अशा परिस्थितींत हा जो उपक्रम आपण चालविला तो बरोबर नाहीं. कदाचित् वरच्या समाजांतील लोकांनीं यासंबंधीं तक्रार केली असती तर गोष्ट निराळी; पण तसाही प्रकार नाहीं. सर्व कांहीं व्यवस्थित ठाकठीक चाललेलें आहे. हरिजनांचे बाबतींत दरबारचीच नव्हे तर सर्व जनतेचीहि सहानुभूति आहे हें मला सांगावयास आनंद वाटतो. आणि याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे श्री. टेंबे साहेबांनीं आपल्या शेतांतील विहीर हरिजनाकरितां दिली आहे हा होय. तथापि हरिजनापैकीं जी सुशिक्षित मंडळी पुढें येतील त्यांना नोकऱ्याचे बाबतींत प्रथम चान्स देण्यांत येईल येवढें आश्वासन मी देतों. तेव्हां आपण हा ठराव मागें घ्यावा अशी आपणांस विनंती आहे.

स. स. नवणीः—( कानडी )

मीं हा ठराव मागें घेण्यास नाकबूल आहे.

रा. सा. देवधरः—इतर मुलांबरोबर आपलीं मुलें शाळेंत बसतात ना ? मग स्वतंत्र शाळा काढण्याची जरूरीच काय ? शिवाय सध्यां ज्या ठिकाणीं सक्तीच्या शाळा आहेत तेथील पालकांचें, यंदाच्या सालीं पिकपाणी नाहीं तरी सक्तीचें शिक्षण माफ करा; सक्तीचें शिक्षण नको असे अर्ज आलेले आहेत. तेव्हां आणखी सक्तीच्या शाळा काढण्यांत फायदा काय ? सक्तीच्या शिक्षणाचा इतर शाळांतील उपक्रम पाहूनच इतर ठिकाणीं तशी अधिक प्रमाणांत व्यवस्था करण्यांत येईल. आज तेरा ठिकाणीं सक्तीच्या शाळा आहेत आणखी सक्तीच्या शाळा काढून आपलीं मुलें शाळेंत आलीं नाहींत तर कायद्याप्रमाणें पालकांना दंड भरावा लागेल तेव्हां आपण या सर्व गोष्टींचा अवश्य विचार करावा.

स. स. नवणीः—( कानडी )

मागासलेल्या लोकांपैकीं नोकरींसाठीं किती लोकांचे अर्ज आले आहेत ? पैकीं एकाला नोकरी मिळाली व दोघांना नोकरी देण्याचा विचार आहे.

स. स. नवणीः—( कानडी )

रा. सा. देवधरः—जागा रिकाम्या झाल्या म्हणजे त्यांना नेमतां येईल.

स. स. शिंदेः—त्यापेक्षां असें म्हणाना, जेवढे हरिजन पास होतील तेवढ्यांना नोकऱ्या मिळाव्या.

स. स. वाटवेः—मी या ठरावांत थोडी दुरुस्ती सुचवितों.ठरावांत"...आहे त्या शाळांमधून जास्तीचे नोकर नेमून..." असे शब्द आहेत त्याऐवजीं "...आहे त्या शाळांमधून जास्तीचे अस्पृश्य नोकर नेमून..." असे शब्द घालावे. माझी amendment स. स. नवणी यांना मान्य होईलच.

स. स. नवणीः— आपली amendment मला मान्य आहे.

स. स. वाटवेः—ह्या ठरावाचे दोन भाग आहेत. सक्तीचें शिक्षण करावें हा एक व हरिजनांना नोकऱ्या द्याव्या हा दुसरा भाग होय. ह्या ठरावाचा गर्भितार्थ असा आहे कीं, ज्यावेळीं शाळाखात्यामध्यें नोकरी देण्याचे प्रसंग येतील त्यावेळीं हरिजन उमेदवारांचा अवश्य विचार करावा. आज या संस्थानांत अकरा हजार लोक अस्पृश्य वर्गापैकीं आहेत. आणि त्यांत फक्त शिकलेले लोक तीन असून त्या तिघांनाहि अद्याप नोकऱ्या मिळूं नयेत याबद्दल सखेद आश्चर्य वाटतें ! तेव्हां आपण हा ठराव मंजूर करावा. मूळ ठराव आहे त्याचे Wording तितकेसें बरोबर नाहीं; तथापि त्याचा गर्भितार्थ लक्षांत घेऊन तो मंजूर करण्यांत यावा.

मे. अध्यक्षः—मी हा ठराव मतांस टाकतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव ४ विरुद्ध ७ मतांनीं नापास झाला.

## स. स. चिदंबर विनायक आपटे यांचा ठराव नं. ३

" बन्हट्टी येथील इंग्रजी शाळा सोसायटीकडून चालविल्यामुळें बन्हट्टी नागरिकांचा फायदा झालेला दिसत नाहीं. अशा परिस्थितींत सदरची शाळा, सरकारचें शिक्षणविषयक धोरण पाहातां, सोसायटीचे ताब्यांत राहाणें इष्ट दिसत नाहीं. तरी पूर्ववत् सरकार मार्फतच शाळा चालविली जावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेबांस विनंति आहे. "

रा. ब. दिवाणः—हा ठराव परत घ्यावा. ह्या बाबतींत दरबारचा विचार चालू आहे. आज या बाबतींत अधिक खुलासा करतां येत नाहीं. या बाबतींत Seriously विचार चालला आहे येवढेंच आतां आपल्याला सांगतों.

स. स. वाटवेः—आज अनेक वर्षें ह्या शाळेबद्दल लोकांची ओरड चालली आहे; परंतु अद्याप कांहीं निर्णय मात्र लागलेला नाहीं. तेव्हां आणखी किती महिने, वर्षें हें प्रकरण असेंच चालणार याचा दरबारनें खुलासा करावा.

रा. ब. दिवाणः—दोन महिन्यांच्या आंत या प्रकरणाचा निर्णय मी देईन येवढेंच आश्वासन मीं आपल्याला देतों.

स. स. सी. व्ही आपटेः—मी माझा ठराव परत घेतों.

मे. अध्यक्षः—आतां आपण चार नंबरचा ठराव वाचावा.

### स. स. चिदंबर विनायक आपटे यांचा ठराव नं. ४

" गरीब व अनाथ लोकांवर फौजदारी कामें चाललेवेळीं त्यास आपले बचावाकरितां कायद्याचा सल्ला व मदत सरकारतर्फे देण्याची व्यवस्था आहे. अशावेळीं सदरची मदत ज्याचेकडून घेण्यांत येते त्यास त्याबद्दल मोबदला दिला जावा अशी या मंडळाची शिफारस आहे. "

रा. ब. दिवाणः—हा ठराव मंजूर करण्यास आमची कांहींच हरकत नाहीं.

मे. अध्यक्षः—ह्या ठरावास कोणाचा विरोध नसल्यामुळें तो सर्वानुमतें पास झाल्याचें जाहीर करतों.

### स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णूपंत आपटे यांचा ठराव नं. ५

" (अ) जमखंडी संस्थानांत शिक्षणाचा पाया उत्तम असावा म्हणून प्राथमिक शाळांत सहशिक्षण असावें व प्राथमिक शाळांत स्त्री–शिक्षिका नेमण्यांत याव्या.

(ब) संस्थानांत प्राथमिक शिक्षण मुलांच्याकरितां सक्तीचें आहे तसेंच मुलींच्या करितांहि सक्तीचें शिक्षण करणेंत यावें अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे. "

स. स. सौ. आपटेः—फारतर प्रौढ मुलींना सहशिक्षण देऊं नये परंतु दहा वर्षांच्या आंतील मुलांमुलींना एकत्र शिक्षण देण्यास कांहींच हरकत नाहीं. व तसें शिक्षण देण्यास पुरुष शिक्षकांऐवजीं स्त्री–शिक्षिका नेमाव्यात. कारण स्त्रियांच्याजवळ ममता, विनयशीलता हे गुण नैसर्गिकच असतात. तेव्हां त्या जितक्या लहान मुलांमुलींमध्यें समरस होतील तेवढे पुरुष–शिक्षकांना समरस होतां येणार नाहीं. हा ठराव तावडतोब अंमलांत येणार नाहीं ही गोष्ट खरी आहे, परंतु जसजसे पुरुष शिक्षक निवृत्त होतील तसतसे त्या जागांवर स्त्री–शिक्षिका नेमण्यांत याव्यात. तसेंच मुलांना ज्याप्रमाणें सक्तीचें शिक्षण दिलें जातें त्याप्रमाणें मुलींनाहि सक्तीचें शिक्षण दिलें जावें. तरी आपण हा ठराव मंजूर करावा अशी विनंति आहे.

रा. सा. देवधरः—ह्या ठरावाबद्दल विचार केला असतां पूर्वीची पद्धति कां बदलावी हें समजत नाहीं. ठरावावरूनहि तसा कांहीं बोध होत नाहीं. शिवाय असा जो नवीन उपक्रम चालू करावयाचा याला कारण तरी काय तेंहि सांगण्यांत आलेलें नाहीं. हल्लीं चालू असलेली पद्धत कां वाईट आहे तें सांगण्यांत आलें तर बरें होईल. बरें असा उपक्रम करावयाचा तर स्त्रीशिक्षिका सर्वच ठिकाणीं मिळणें जड पडेल. शहरांतून फार तर स्त्रीशिक्षिका मिळूं शकतील परंतु खेड्यांपाड्यांतून मिळणें दुरापास्त होईल. तसेंच पुरुष–शिक्षकांना जें ज्ञान व अनु-

भव असतो त्या मानानें स्त्रियांना कमीच असतो हा अनुभव सर्वत्र आहे. सक्तीच्या शिक्षणा-संबंधींचा जो भाग ठरावांत आहे; तसा उपक्रम आज चालूच आहे. आज ज्या ठिकाणीं सक्तीचें शिक्षण दिलें जातें त्या ठिकाणीं मुलींना वगळण्यांत येत नाहीं. मुलांमुलींना मिळूनच असें सक्तीचें शिक्षण दिलें जातें. तेव्हां आपण हा ठराव परत घ्यावा असें मला वाटतें.

स. स. सौ. आपटेः—मी ह्या ठरावाचा ( ब ) भाग तेवढा परत घेतें.

स. स. सोहोनीः—सन्मान्य सभासद ह्या स्त्री असल्यामुळें स्त्रियांच्या भावना त्यांना सहज समजूं शकतात. आतांपर्यंत पुरुषांनीं सर्व क्षेत्रांत स्त्रियांवर आक्रमण केलें आहे; तेव्हां तशीच स्थिति यापुढें राहूं नये म्हणून हा ठराव मांडला असावा असें मला वाटतें. शिवाय त्यांनीं आपल्या भाषणांत जसजसे पुरुष-शिक्षक निवृत्त होतील तसतसे त्या जागांवर स्त्री शिक्षिका नेमण्यांत याव्या असें सांगितलें आहे. त्यामुळें आतांच सर्व पुरुष शिक्षक कमी करून त्या-ठिकाणीं स्त्री-शिक्षक नेमा अशीहि तातडीची मागणी होत नाहीं. तसेंच १० वर्षांच्या आंतील मलांस शिकविण्यासाठीं स्त्री-शिक्षिका असल्यानें, मुलांना त्यांच्या मातांकडून जसें प्रेमळपणें व ममतेनें शिकविलें जातें तद्वतच स्त्रीशिक्षिकांकडून मुलांना शिक्षण मिळणार आहे, तेव्हां हा ठराव अत्यंत उदात्त व स्तुत्य आहे असें मला वाटतें व म्हणून मी या ठरावाला सपोर्ट करतों.

मे. अध्यक्ष—मी ह्या ठरावावर मतें घेतों.

मे. अध्यक्षः—यांनीं मतें घेतां सदर ठरावाचा ( अ ) भाग ४ विरुद्ध ११ मतांनीं नापास झाला.

## स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ४

"जमखंडी येथें इंग्रजी शाळेंत शिकणाऱ्या मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढत आल्यानें मुलींचे करितां स्वतंत्र A. V. School काढणेंत यावें अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेबांना विनंती आहे."

स. स. वाटवे :—सध्यां जमखंडी हायस्कूलमध्यें १५० मुली आहेत. ह्या मुलींनीं मुलांच्या बरोबर शिक्षण घ्यावें हें बरोबर नाहीं. पुणें, मुंबई सारख्या शहरांतून मुलींसाठीं स्वतंत्र शाळा आहेत. पुण्याच्या हुजूरपागेंत १८०० मुलीं आहेत. त्या ठिकाणीं मुलगा एकहि मिळणार नाहीं. मुलांना आणि मुलींना एकत्र शिक्षण दिल्याचे सुपरिणाम आपणां सर्वांना माहितच आहेत. सांगलीसारख्या संस्थानांत सुद्धां मुलींकरितां स्वतंत्र A. V. School आहे तेव्हां आपणहि येथें अशा प्रकारची तजवीज करावी.

स. स. शिंदे:—A. V. School चें शिक्षण पुरें झाल्यावर मुलींनीं पुढें काय करावें ?

स. स. वाटवे:—अगोदर मिळेल तें पदरांत घ्यावें.

रा. सा. देवधरः—ठरावाचें तत्त्व मान्य आहे; तथापि बजेटाच्या सोयीप्रमाणें तजवीज करणेंत येईल.

स. स. वाटवेः—मी बजेटकडे पाहात नाहीं. आमच्या गरजांकडे मी पाहाणार आहें.

रा. सा. देवधर:—बजेटाच्या सोयीप्रमाणें शक्य तितक्या लवकर अशी दुरुस्ती या ठरावांत करावी म्हणजे ठराव मान्य करण्यांत येईल.

स. स. वाटवे:—शक्य तितक्या लवकर या शब्दानें माझें समाधान होणार नाहीं. त्याला कांहीं एक, दोन, तीन वर्षें अशी मर्यादा घालावी. नऊ वर्षांपूर्वी असा ठराव झालेला आहे; त्याचा आजतागायत विचार झालेला नाहीं. तेव्हां ते शब्द मान्य करण्यास मी कबूल नाहीं. शक्य तितक्या लवकर हे शब्द मला मान्य नाहींत. त्या शब्दांना meaning नाहीं. जमखंडी दरबारांत ते शब्द meaningless आहेत.

रा. सा. पटवर्धन:—१० वर्षें मुतद घालावी.

स. स. वाटवे:—इतकी दीर्घ मुदत मला मान्य नाहीं.

रा. सा. देवधर:—१० वर्षांच्या ऐवजीं पांच वर्षें मुतद घालावी.

स. स. वाटवे:—मला तेंहि मान्य नाहीं. वर्ष, दोन वर्षें फार तर तीन वर्षें मुदतीला मी कबूल होईन.

रा. सा. भाऊराव आपटे:—तीनच्या ऐवजीं चार वर्षांची मुदत आपण मान्य करावी. म्हणजे ह्या दुरुस्तीसह ठराव मान्य करण्यांत येईल.

स. स. वाटवे:—आपण सुचविलेली चार वर्षांची मुदत मला मान्य आहे.

मे. अध्यक्ष:—दुरुस्ती कोठें करावयाची तें वाचून दाखवा.

स. स. वाटवे:—मूळ ठरावांत " स्वतंत्र A. V. School काढणेंत यावें " असे शब्द आहेत त्याऐवजीं स्वतंत्र " A. V. School चार वर्षांत काढणेंत यावें. " अशी दुरुस्ती करण्यांत आली आहे.

मे. अध्यक्ष:—मी ह्या दुरुस्त ठरावावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर दुरुस्त ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

## स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचा ठराव न. ३

" संस्थानमजकुरीं ज्या गांवांतील हरिजनांस पाण्याची सोय नाहीं तेथें नवीन विहिरी बांधून देणेंबद्दल या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे. "

रा. सा. देवधर:—गेल्या ९ महिन्यांत हरिजनांकरितां आठ विहिरी बांधण्यांत आल्या आहेत; व आणखींहि विहीरी बांधण्याचा दरबारचा विचार आहे. तेव्हां आपण हा ठराव मागें घेतला तरी हरकत नाहीं किंवा याला सभागृहानें मंजुरी दिली तरीहि आमची हरकत नाहीं.

मे. अध्यक्ष:—मी ह्या ठरावावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

**स. स. चिदंबर विनायक आपटे यांचा ठराव नं. ५**

" नागरिक संरक्षक दलाप्रमाणेंच ( सिव्हिक गार्ड ) कार्य करणाऱ्या इतर संस्थांसहि योग्य तें सहाय्य व पाठिंबा दरबारकडून मिळावा व अशा संस्था सरकारांत नोंद केल्या जाव्या अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांना शिफारस आहे. "

रा. सा. भाऊराव आपटे:—या ठरावांवर मला amendment सुचवावयाची आहे. मूळ ठरावांत "...कार्य करणाऱ्या इतर संस्थांसही योग्य तें सहाय्य व पाठिंबा दरबारकडून मिळावा..." असे शब्द आहेत त्याऐवजीं "...कार्य करणाऱ्या इतर संस्थांसही दरबारास आक्षेपार्ह न वाटल्यास योग्य तें सहाय्य व पाठिंबा दरबारकडून मिळावा असे शब्द घालावे.

स. स. सी. व्ही. आपटे:—मला amendment मान्य आहे. सध्यां गांवांत जें नागरिक–संरक्षक दल आहे, त्या दलांतील स्वयंसेवकांची संख्या ४० आहे व ती संख्या अपुरी आहे. संरक्षणाच्या दृष्टीनें हें कार्य इतर संस्थांनाही करतां येण्यासारखें आहे व तसें त्या संस्थांमार्फत कार्य चाललें आहे. परंतु त्यांना सरकारचें sanction नसल्यामुळें त्यांचें कार्य विफल आहे. तेव्हां ज्या इतर संस्था नागरिक संरक्षक दलाचें कार्य करतात त्यांना सरकारचें sanction पाहिजे व तेवढ्यासाठींच हा ठराव आणला आहे.

स. स. वाटवे:—हा ठराव योग्य असून अत्यंत व्यापक आहे; परंतु amendment मात्र अत्यंत घातूक आहे.

रा. सा. भाऊराव आपटे:—amendment घातूक नसून व्यापक आहे.

स. स. वाटवे:—सिव्हिक गार्डसूसाठीं फक्त राजनिष्ठेची शपथ असली म्हणजे झालें. सिव्हिक गार्डसूचें काम लोकांच्या संरक्षणाचें आहे. रात्रींची गस्त घालून लोकांचें संरक्षण करणें, व आपत्तीच्या वेळीं जनतेला सर्व प्रकारचें सहाय्य करणें हीं सिव्हिक गार्डसूचीं कामें असल्यामुळें यांत दरबारचा संबंध कशाला? लोक शांततेचा भंग करणार नाहींत. जनतेची सहानुभूति सिव्हिक गार्डसूना आहे. तेव्हां हा सरकारी बडगा त्यांचेवर असूं नये असें मला वाटतें.

रा. सा. पटवर्धनः— amendment स. स. चि. वि. आपटे यांनीं मान्य केली आहे.

स. स. वाटवे:—मग माझी कांहीं हरकत नाहीं.

मे. अध्यक्ष:—मी ह्या ठरावावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर दुरुस्त ठराव १६ विरुद्ध २ मतांनीं पास झाला.

**स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णूपंत आपटे यांचा ठराव नं. ४**

" जमखंडी संस्थानांतील कोणत्याही खासगी नोकरींत, दुकानांत अगर कारखान्यांत दहा वर्षांचे आंतील मुलांना ठेवूं नये अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे. "

स. स. सी. व्ही. आपटे:—सर्वसाधारण १० वर्षांच्या आंतील मुलांसंबंधीं व विशेषत: गरीब वर्गांतील मुलांचे बाबतींत हा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हां अशा मुलांवर लहानपणींच कामाचा बोजा पडून त्यांच्या शरीरावर ताण पडूं नये म्हणून हा ठराव आणला आहे.

रा. सा. पटवर्धन:—फॅक्टरी ॲक्टमध्यें कांहीं प्रोव्हिजन केलेली आहे. शिवाय Employment of children's Act-१९३८ प्रमाणें पोर्ट आणि रेल्वे यांमध्यें १० वर्षांच्या आंतील मुलांस कामावर घेऊं नये असा निर्बंध आहे. Shop Act मध्येंही अशी provision आहे. तेव्हां असा ठराव न आणतां तो बिल स्वरूपांत यावा म्हणजे अवश्य विचार होईल. Factory act येथें लागू आहे. तेव्हां हा ठराव मागें घ्या व त्याबद्दल बिल आणा. ठरावाचें तत्त्व मान्य आहे परंतु तो ठराव व्यवस्थित नाहीं. तो कोणत्या ॲक्टान्वयें लागूं करावा याचा विचार झाला पाहिजे.

स. स. वाटवे:—कलम नं. ९१ प्रमाणें तो form मध्यें नाहीं.

रा. सा. पटवर्धन:—हा ठराव 'व्हेग' आहे. तेव्हां हा ठराव परत घ्यावा.

स. स. सौ. आपटे:—मी हा ठराव परत घेतें.

### स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ५

" इंग्रजी शाळेंत हल्लीं मुलांची संख्या जास्त व शिक्षक कमी अशी परिस्थिति झाली असल्यानें बालविद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दूर करविणेचे बाबतींत विचार व्हावा यासाठीं ही श्रीमंतांना विनंति करीत आहे."

मी बजेटाच्या भाषणामध्यें पहिल्या इयत्तेंत ५० मुलें व ४५ मिनिटांचा तास व त्यांना शिकविणारा एक मास्तर अशी इंग्रजी शाळांत परिस्थिति आहे असें जें सांगितलें तेंच या ठरावाच्या रूपानें मांडलें आहे. रा. सा. मंत्र्यांनीं या बाबतींत मला जर आश्वासन दिलें तर हा ठराव परत घ्यावयास मी तयार आहें.

रा. सा. देवधर:...आपल्या सूचनेचा शक्य तो विचार करावयास हरकत नाहीं.

स. स. वाटवे:—याचा अर्थ काय? मी उद्यां आपणांस म्हणालों कीं कांहीं जादा मास्तर नेमा; तर आपण नेमाल काय? शक्यतो विचार करून हे शब्द मला योग्य वाटत नाहींत. जास्तींत जास्त ३० मुलें क्लासमध्यें असावी असा नियम आहे. ३० मुलांच्या ऐवजीं क्लासमध्यें ४५ ते ५० असल्यामुळें मुलांना योग्य शिक्षण मिळत नाहीं. तेव्हां प्रयोगादाखल इंग्रजी पहिली, दुसरी व तिसरी या इयत्तांतून जादा मास्तर नेमावा अशी माझी सूचना आहे.

रा. सा. देवधर:—आपणांपुढें मी बजेट मांडलें आहें. शिक्षण मोफत असल्यामुळें शाळांतून मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला आपल्याला आळा घालतां येत नाहीं. वाढत्या शिक्षणाचे मानानें बजेट अपुरें पडतें. बजेटांत वाढ झाल्याशिवाय आपल्याला अधिक योजना आखतां येणार नाहीं. आपण प्रत्येक गोष्ट मांडाल व ती झाली नाहीं म्हणजे ओरडत बसाल. परंतु बजेटाच्या दृष्टीनें आपण विचार केला आहे. काय? मला या बाबतींत असें वाटतें कीं, खासगी प्रयत्नांनीं ऐकादें हायस्कूल निघालें तर बरें होईल. पूर्वी असा उपक्रम

झाला होता व त्यांत आपण एक शिक्षक होतां. तो पूर्वीचा उपक्रम आज चालू झाला तर बरें होईल. जनतेकडून त्याला पाठिंबा मिळेल. प्रत्येक गोष्ट सरकारनें करावयाची असें म्हटलें तर तें शक्य होणार नाहीं. आज गांवोगांवीं अशा स्वतंत्र शाळा निघत आहेत. आपणाकडेहि तशा शाळा निघाल्या पाहिजेत. नाहींतर मुलांकडून फी वसूल करावी लागेल. लोकांची शिक्षणाबद्दलची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. प्रत्येकाला कॉलेज--शिक्षण पाहिजे. तेव्हां या बाबतींत कांहींतरी योजना झाली पाहिजे. आपण मागें शाळा काढली होती तशी यावेळीं शाळा निघाली पाहिजे. तेव्हां आपण तसा प्रयत्न करावा. दरबारकडून त्याला जरूर ती मदत मिळेलच.

स. स. वाटवे:—माझें म्हणणें आहे कीं प्रत्येक वर्गांत ५० मुलें आहेत तीं कमी असावींत.

रा. सा. देवधरः—तशी परिस्थिति नाहीं. इतकी भलतीं मुलें वाढलेलीं नाहींत.

स. स. वाटवेः—माझी माहिती अनधिकृत असल्यास आपण अधिकृत माहिती सांगावी. युनिव्हर्सिटी कोडमध्यें प्रत्येक वर्गांत ३० पेक्षां जास्त मुलें असूं नयेत असें आहे.

रा. सा. देवधरः—आपण कायदा वाचला आहे काय ?

स. स. वाटवेः—कायदा वाचणें हें काम मंत्र्यांचें आहे का माझें आहे ? प्रत्येक वर्गांत ५० मुलें नाहींत काय ?

रा. सा. देवधरः—तशी परिस्थिति नाहीं.

स. स. वाटवेः—आपण उद्यां माहिती मागवा; व तोंपर्यंत हा प्रश्न तहकूब ठेवावा अशी मे. अध्यक्षांना माझी विनंति आहे. आम्हीं ठराव मांडला तो अपुऱ्या माहितीनें मांडला असें आपलें म्हणणें असेल तर आपण माहिती पुरवा. माझी तक्रार येवढीच आहे कीं ४५ मिनिटांचा तास, मास्तरांना वर्गात यायला ५ मिनिटें उशिर होतो व तास संपण्यापूर्वी पांच-मिनिटें अगोदर मास्तर वर्गांतून जातात; अशा परिस्थितींत आमच्या मुलांना एक मिनिटहि वांचायला येत नाहीं

रा. सा. देवधरः—अशी आपणाकडे अधिकृत माहिती आहे काय ? मास्तरांना दंड करावा काय ?

स. स. वाटवेः—माझी तक्रार मास्तरांविरुद्ध नाहीं; शाळाखात्याविरुद्ध आहे. मुलें जास्ती, मास्तर कमी अशी परिस्थिति आहे. मोफत शिक्षण म्हणून डांगोरा पिटला जातो तेथें अशा प्रकारची अव्यवस्था योग्य नाहीं.

रा. सा. देवधरः—बजेटामध्यें प्रोव्हिजन झाल्याशिवाय या गोष्टी कशा करतां येतील ?

स. स. वाटवेः—लोकांच्या अडचणी बरोबर आहेत. ठराव मान्य आहे परंतु बजेटमध्यें पैशांची व्यवस्था नाहीं असें म्हणा व तें रेकॉर्डला तरी राहूं द्या. तत्त्व मान्य आहे असें मंत्र्यांनीं म्हणावें.

रा. सा. देवधरः—मी तत्त्व मान्य केलें आहे; सवड होईल त्याप्रमाणें योजना करूं. आपल्या ठरावांत 'सवडीप्रमाणें' हे शब्द घालावे म्हणजे ठराव मान्य करण्यास कांहींच हरकत नाहीं.

मे. अध्यक्षः–' सवडीप्रमाणें ' हे शब्द कोठें घालावयाचे,

स. स. वाटवेः–ठरावाच्या शेवटच्या वाक्यात ' गैरसोय ' शब्दापुढें ' सवडीप्रमाणें ' हे शब्द घालावयाचे आहेत.

मे. अध्यक्षः–मी ह्या दुरुस्त ठरावावर मतें घेतों.

मे अध्यक्ष यांनीं मतें न घेतां सदर दुरुस्त ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

### स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचा ठराव नं ४

" हल्लीं मिळत असलेल्या हरिजनांना शिष्यवृत्त्या लोकसंख्येचे मानानें कमी पडत आहेत. तरी त्या वाढवून मिळाव्यात अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब यांना विनंति आहे."

रा. सा. देवधरः–हल्लीं हरिजनाकरितां १०० रु. पर्यंत शिष्यवृत्त्या दिल्या जातात सध्यांच्या परिस्थितींत ही रक्कम आणखी जास्त वाढविण्याची जरूरी नाहीं. चालू सालीं एक विद्यार्थी नापास झाला म्हणून त्याची शिष्यवृत्ति बंद ठेवण्यांत आली आहे. याचें कारण यापुढें विद्यार्थी जास्त अभ्यास करतील. सध्यां जेवढी मुलें येतात त्यांना शिष्यवृत्ति मिळते. जास्त मुलें वाढली तर दरबार सहानुभूतिपूर्वक विचार करील.

स. स. वाटवेः–एकदां मुलगा एकाद्या विषयांत नापास झाला तर त्याची शिष्यवृत्ति बंद ठेवू नये. शंभर रुपये आंकडा मोठा आहे. परंतु मुलांच्या मानानें कमी आहे.

रा. सा. देवधरः–एकाद्या विषयांत नापास झाला तर शिष्यवृत्ति बंद करण्यांत येत नाहीं. तो मुलगा बऱ्याच विषयांत नापास झाला म्हणून त्याची शिष्यवृत्ति बंद करण्यांत आली. यंदा एक मुलगा मॅट्रिक नापास झाला परंतु त्याला शिष्यवृत्ति देण्यांत आली आहे.

स. स. सोहनीः–लोकसंख्येच्या मानानें सर्वांना शिष्यवृत्त्या मिळाल्या पाहिजेत. मातंग, रामोशी, मुसलमान, अशा सर्व जातींना मिळाल्या पाहिजेत. नाहीं तर हरिजनानांच तेवढ्या सर्व सवलती द्यावयाच्या व इतरांकडे डोळेझांक करावयाची ही प्रवृत्ति बरोबर नाहीं. लोकसंख्येच्या प्रमाणांत याचा अर्थ आक्रमण करण्याचे असा असूं नये.

रा. सा. देवधरः–आपण हा ठराव परत घ्यावा असें मला वाटतें.

स. स. नवणीः—ह्या ठरावावर मतें घ्यावीं.

मे. अध्यक्षः—मी ह्या ठरावावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव २ विरुद्ध १४ मतांनीं नापास झाला.

### स. स. सौ. लक्ष्मीबाई विष्णूपंत आपटे यांचा ठराव नं. ५

" मागासलेल्या जातींमधून रूढ असलेली देवदासी–पद्धत सरकारनें कायदा करून बंद करावी अशी या मंडळाची श्रीमंत राजासाहेब सरकार यांना विनंति आहे."

रा. सा. पटवर्धनः—Bombay मध्यें Bombay Presidency Deodasi Act आहे. मद्रास सरकारनेंही या बाबतींत कायदा केला आहे. त्याचप्रमाणें त्रावणकोर, सावंतवाडी या

संस्थानांतून असा कायदा आहे. तथापि हा ठराव देवळांतील देवदासींकरितां आहे, कां बाहेर हिंडतात त्यांचेकरितां आहे हें समजत नाहीं. देवळांत देवदासी असतां त्यांना कांहीं वतनी जमिनी असतात. त्यांना लग्न करतां येतें. त्यांनीं लग्न केलें तर जमिनीबद्दल रेन्ट देऊन त्यांना मुक्त करण्यांत येईल. तथापि हा ठराव आहे तसा पास करतां येणार नाहीं. हा ठराव बिल-स्वरूपांत आणावा. बिलस्वरूपांत मांडला तर त्यावर पब्लिकचें मत अजमावतां येईल. तेव्हां आपण यासंबंधीं बिल आणावें म्हणजे त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल.

स. स. वाटवे:—आपलें म्हणणें मला मान्य नाहीं. या ठरावांतील तत्त्व आपल्याला मान्य करावयास कांहीं हरकत नाहीं. समाजांत अत्यंत घातूक अशी ही रूढी आहे ती नाहींशी व्हावी हा या ठरावाचा हेतू आहे. तेव्हां आपण तत्त्व मान्य करा म्हणजे आपण तशी श्रीमंत राजासाहेबांना विनंति करूं.

रा. सा. आपटे:—आपल्याकडे देवदासींची पद्धति रूढ आहे असें मला वाटत नाहीं. तेव्हां या ठरावाची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं.

मे. अध्यक्ष:—दरबारला हें तत्त्व पटत नसेल तर बिल आणण्यांत अर्थ काय ?

स. स. वाटवे:—देवदासीची पद्धत येथें रूढ आहे. महार लोकांत अशा बाया सोड-लेल्या असतात त्यांना मुरळया म्हणतात; व मराठे लोकांत सोडतात त्यांना मुरळया म्हणतात. आपल्याकडे केव्हां केव्हां ५०।५० अशा बायकांचा तांडा येतो. मी समाजाच्या दृष्टीनें ह्या ठरावास पाठिंबा देत आहें. देवदासी हा शब्द चुकीचा घातला आहे असें मीं म्हणतों. देवदासीच्या ऐवजीं कलावंतीण हा शब्द पाहिजे. तेव्हां आपण या ठरावाचें तत्त्व मान्य केलें तरच पुढें बिल आणतां येईल. नाहीं तर बिल आणून उपयोग काय ?

रा. ब. दिवाण:—आम्ही या ठरावाला oppose करत नाहीं. किंवा support ही करत नाहीं.

मे. अध्यक्ष:—मी या ठरावर मतें घेतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव ६ मतांनीं बिनविरोध पास करण्यांत आला. बारा सन्मान्य सभासद तटस्थ होते.

मे. अध्यक्ष:—आतां वेळ संपल्यानें काम तहकूब ठेवावें.

## तिसरा दिवस

### गुरुवार, ता. २०-८-४२

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवसाच्या बैठकीस सकाळीं ९ वाजतां सुरवात झाली. पहिल्या दोन दिवसांइतकेच सन्मान्य सभासद हजर होते. प्रथम बजेटमधील बाबींची क्रमवार चर्चा सुरू झाली.

मे. अध्यक्ष:—आज प्रश्न शिल्लक नाहींत. तेव्हां बजेटवर क्रमवार चर्चा व्हावी.

## जमेचे बाजूकडील रकमेचे खुलासे.

स. स. वाटवेः—मला जमेकडील कांहीं बाबींबद्दल खुलासा पाहिजे.

पान नं. ४ आयटेम नं. ५ (९) मुलकी अमानत पक्के सदरीं जमा याचा अर्थ काय?

रा. ब. दिवाणः—कांहीं कांहीं रकमा प्रथम अमानतकडे अलग अलग ठेवलेल्या असतात. त्यानंतर एकत्र करून पक्क्या समजल्या जातात.

स. स. वाटवेः—पान नं. ४ आयटेम नं. ७ (२) गवताबद्दल जी रकम धरलेली आहे याचा खुलासा करावा.

रा. ब. दिवाणः—बाहेरच्या शेळ्या, मेंढ्या वगैरे जनावरें परवानगीशिवाय चरावयाला आणतात, त्यांच्याकडून दंडादाखल वसूल झालेली ही रकम असते.

स. स. शिंदेः—पान नं. १२ आयटम १९ (१) छापणावळीचे उत्पन्न. हें उत्पन्न कशाचें? हें Commercial Department नाहीं.

रा. ब. दिवाणः—श्रीमंत सरकारांचें कांहीं खासगी प्रिंटिंग झालें तर त्याचें हें उत्पन्न धरलें आहे.

मे. अध्यक्षः—आतां खर्चाकडील बाबींची चर्चा व्हावी.

स. स. वाटवेः—खर्चाकडील बाबींची चर्चा होण्यापूर्वी जमेकडील कांहीं बाबींबद्दल मला सूचना करावयाची आहे. पान नं. ५ आयटेम १ कायम जमीनबाब सालगुदस्त व सालमजकुरीचें जें उत्पन्न धरलें आहे तें कमी धरावें. येवढा वसूल येईल किंवा नाहीं अशी शंका वाटते तेव्हां हा आकडा कमी करावा अशी विनंति आहे. तेवढी रकम वसूल झाली नाहीं तर आपत्ति टळावी म्हणून यांत ६० हजार रुपये कमी करावे.

रा. ब. दिवाणः—साधारणतः जमाबंदीचे पांच लाख रुपये वसूल होतात. तेव्हां आहे तो आकडा कमी करण्याचें कांहीं कारण नाहीं. शिवाय बजेटाच्या प्रोव्हिजनकरतां ३२००० रु. यांत कमी धरले आहेत. तेव्हां आतां आणखी कमी धरण्याचें कारण नाहीं.

स. स. वाटवेः—सर्व रकम वसूल होईल अशी अपेक्षा बाळगणें चुकीचें आहे. मागाहून वसुलीच्या बाबतींत सक्ति होते हा नेहमींचा अनुभव आहे.

रा. ब. दिवाणः—सक्ति होत नाहीं.

स. स. वाटवेः—मामलतदारांना सक्ति करावी लागते.

रा. ब. दिवाणः—पण या ठिकाणीं मुळांतच ३२००० रु. कमी धरले आहेत. तेव्हां आणखी आतां कमी करतां येणार नाहीं.

मे. अध्यक्षः—आतां या बाबतींत चर्चा पुरे. खर्चाकडील बाबींचे खुलासे विचारावे.

## खर्चाचे बाजूकडील रकमांचे खुलासे

स. स. वाटवे:—पान नं. २८ आयटेम नं. १ श्रीमंत राजासाहेब यांचे हुजूर ऑफिस यासंबंधीं आम्हांला चर्चा करतां येत नसली तरी त्या बाबतींत कट्मोशन आणतां येईल असें वाटतें.

रा. सा. आपटे:—यावर चर्चा करतां येणार नाहीं किंवा कट्मोशनही आणतां येणार नाहीं.

स. स. वाटवे:—मला माहिती पाहिजे. प्रत्येक खात्यांतून या वर्षी वाढ दाखविली आहे ती महागाईबद्दल आहे काय? शिवाय श्रीमंतांच्या ऑफिसला फिरती नाहीं. तेव्हां भत्ता व सादील यासाठीं २८१ रु. जास्त रक्कम धरली आहे ती कमी करावी अशी माझी सूचना आहे.

रा. ब. दिवाण:—श्रीमंतांच्या हुजूर ऑफिसला फिरती नाहीं असें विधान करणें चुकीचें आहे. शिवाय कायद्यानें आपणास या बाबतींत बोलतां येत नाहीं.

रा. सा. आपटे:—कलम ४८ प्रमाणें ही बाब चर्चेला पात्र नाहीं.

स. स. वाटवे:—पान नं. २८ आयटेम १ (२) राजघराण्यांतील कार्यसमारंभ. गेलीं दोन वर्षे राजघराण्यांतील कार्य-समारंभाकरितां रक्कम धरण्यांत येत आहे. मला अशी शंका आहे कीं ही रक्कम कशासाठीं खर्च करण्यांत येत आहे?

रा. ब. दिवाण:—आम्हीं दरवर्षी ही रक्कम हुजुरांकडे पाठवितों. त्याचें पुढें काय झालें तें आम्हांस ठाऊक नाहीं.

स. स. वाटवे:—पान न. २८ आयटेम १ (३), २ देणगी वगैरेसाठीं दोन हजार रुपये धरण्यांत आले आहेत ते स्कालरशिपच्या रूपानें आहेत काय?

रा. ब. दिवाण:—नाहींत. राज्यारोहणाच्या वेळीं ज्या देणग्या दिल्या जातात त्या साठीं ही रक्कम आहे.

स. स. वाटवे:—परठिकाणच्या लोकांना हे दोन हजार रुपये मिळणार ते कमी करावे असें माझें श्रीमंत राजासाहेबांना appeal आहे.

रा. सा. आपटे:—कलम ४८ प्रमाणें या बाबतींत आपणास बोलतां येत नाहीं.

स. स. वाटवे:— ही देणगी जमखंडीच्या विठोबाला मिळणार नसून ती पुण्याच्या एकाद्या मारुतीलाच मिळणार आहे. ही देणगी कमी केली तर त्यांत दरबारचें कांहीं नुकसान होणार आहे असें नाहीं म्हणून ही रक्कम कमी करावयास कांहींच हरकत नाहीं.

रा. ब. दिवाण:—तो अधिकार आमचा नसून श्रीमंतांचा आहे.

स. स. वाटवे:—पान नं. ४८ आयटेम नं. २ (४) पाटील–कुलकर्णी यांच्यासाठीं बक्षिसासाठीं जी रक्कम धरली आहे ती कमी करावी. श्रीमंतांनीं पाटील कुळकर्ण्यांना वतनें दिलीं आहेत.

रा. ब. दिवाण:—गरीब लोकांना चार दोन रुपये मिळतात त्याच्या आड आपण यावें हें बरोबर नाहीं. हे कांहीं पगारी लोक नाहींत. त्यांना वतनें आहेत पण त्या वतनावर त्यांचें पोट भरणें शक्य नाहीं.

स. स. वाटवे:—गोरगरीब लोकांना फटके मारून हे शेतसारा वसूल करतात म्हणून त्यांना हें पारितोषिक आहे काय ?

रा. ब. दिवाण:—आपलें म्हणणें बरोबर नाहीं. आपण अशीं उदाहरणें दाखवून द्यावीं.

स. स. वाटवे:—पान नं. ३ आयटेम ५ (१) दिवाण ऑफिस यांत पगाराचे बाबतींत १७०८ रु. जास्त धरले आहेत ते कमी करावे.

रा. ब दिवाण:- पगाराचे बाबतींत चर्चा करतां येत नाहीं.

स. स. वाटवे:—चर्चा करतां येत नाहीं हें मला मान्य आहे पण मला त्या बाबतींत खुलासा पाहिजे. हे १७०८ रु. जास्त धरले आहेत ते कोणत्या कामासाठीं याची माहिती पाहिजे. कायद्याचें बंधन आहे हें मला माहीत आहे. मी कायदेभंग करणार नाहीं.

रा. ब. दिवाण:—ही बाब चर्चेला पात्र नसल्यामुळें माहिती देतां येत नाहीं.

स. स. वाटवे:—यांत पर्सनल असिस्टंटचा पगार धरला आहे असें मला वाटतें. एकाच माणसानें दोन ठिकाणीं काम करावें हें बरोबर नाहीं. रा. सा. टिकेकर हे मामलतदार म्हणून काम करतात व तेच पर्सनल असिस्टंट म्हणूनहि काम करतात. तेव्हां असें करणें बरोबर नाहीं.

रा. ब. दिवाण:—आम्ही तसा दुप्पट पगार देत नाहीं. असा स्वतंत्र मनुष्य घ्यावा लागेल म्हणून ही provision आहे.

स. स. वाटवे:—स्वतंत्र मनुष्य अद्याप कां नेमला नाहीं ?

रा. ब. दिवाण:—योग्य माणूस मिळाला नाहीं म्हणून नेमला नाहीं.

स. स. वाटवे:—रा. सा. टिकेकरांना दुप्पट पगार मिळतो असें मी म्हणत नाहीं. परंतु त्यांनीं बारा बारा तास काम करावें हें बरोबर नाहीं.

रा. ब. दिवाण:—अलिकडे वॉरमुळें काम फारच वाढलें आहे व सर्वांनाच जास्त काम करावें लागतें.

स. स. वाटवे:—पान नं. ३४ आयटेम ६ (१) न्यायमंत्रि ऑफिस. न्यायमंत्र्यांची जागा कमी करावी, याबद्दल मी काल सांगितलें आहेच. मुधोळ, जत, अक्कलकोट वगैरे ठिकाणीं या बाबतींत जशी व्यवस्था आहे तशी करावी. अशाप्रकारची मोठी जागा यापुढें ठेवूं नये. काटकसरीच्या दृष्टीनें ही योग्य सूचना आहे.

रा. ब. दिवाण:—हा अधिकार आमचा नाहीं. श्रीमंत सरकारचा आहे.

स. स. वाटवेः—पान नं. ४० आयटेम ९ पोलीस खातें. पोलीसखात्यासंबंधीं मला दोन तीन गोष्टी मंडळाच्या निदर्शनास आणावयाच्या आहेत. जमखंडी संस्थानचा जो वार्षिक अहवाल आहे त्यांत पोलिसफोर्स २२६ आहे असें नमूद केलें आहे. आणि या बजेटमध्यें मात्र ३५८ लोकांचा पगार धरलेला आहे. रिपोर्टावरून पाहातां actual काम करणारे २२६ पोलिस आहेत; असें असतां १३२ लोकांचा पगार यांत जास्त धरलेला आहे. तेव्हां जर हे १३२ पोलिस जादा नेमावयाचे असतील तर ते नेमण्यांत कां आले नाहींत ? जमखंडी संस्थानांत पोलिस आहेत ते कार्यक्षम नाहींत. त्यांना योग्य असें शिक्षण देऊन त्यांची सुधारणा केली पाहिजे. या खात्यामध्यें १३२ लोक कमी आहेत त्यांची तावडतोब भरती करावी,

रा. ब. दिवाणः—२५८ लोकांची बजेटमध्यें provision नाहीं.

स. स. वाटवेः—या बाबतींतील administration समाधानकारक नाहीं. सध्यां ठिकठिकाणीं चोऱ्या होतात. माझी आपणास विनंति आहे कीं, आपण शक्य तेवढीं अधिक हुशार व चांगलीं धडधाकट माणसें पोलीस खात्यांत घ्यावीं. तरच हें खातें कार्यक्षम होणार आहे. याच ठिकाणीं गेल्यावर्षी स्थानिक परस्थवादासंबंधीं वादळ माजलें होतें. त्यावेळीं असें सांगण्यांत आलें कीं, शक्यतोंवर परस्थ इसम यापुढें नेमण्यांत येणार नाहीं. परंतु या गोष्टीला पुरें वर्ष व्हायच्यापूर्वीच जी नवीन पोलिस ऑफिसरची नेमणूक केली आहे ते गृहस्थ परस्थच आहेत. आपल्याकडे चार फौजदार आहेत. मंगळवेढेकरांसारखीं हुशार व लायक माणसें आहेत. त्यांना त्या जागेवर नेमलें असतें तर कांहीं बिघडलें नसतें. पण एक पार्सल गेलें व त्याच्याऐवजी दुसरें आलें. बाहेरचीं माणसें तेवढीं लायक व जमखंडी संस्थानचीं माणसें मात्र नालायक असें कां आपल्याला म्हणावयाचें आहे. बाहेरचे लोक आले तर जमखंडीच्या लोकांची माहिति व्हायला तीन वर्षें तरी लागतील. जमखंडी संस्थानच्या ७६ खेड्यांची माहिती व्हायला बराच वेळ लागतो. आज १५० रु. पगाराचा पोलिस ऑफिसर बाहेरचा आणला हें बरोबर नाहीं. माझ्या बोलण्याचा उपयोग होणार नाहीं हें मला माहीत आहे परंतु संधि आहे तोंपर्यंत ओरडत रहाणार.

मे. अध्यक्षः—मागें बाब्रा सुभेदारांना असा चान्स दिला होता ना ?

रा. ब. दिवाणः—गेल्या वर्षी स्थानिक परस्थ वादासंबंधीं जी चर्चा झाली त्यावेळीं अपवादात्मक जागा सोडून बाकीच्या सर्व जागांवर जमखंडी संस्थानांतील प्रजाजनानांच नेमण्यांत येईल असें सांगण्यांत आलें होतें.

स. स. वाटवेः—हे दरबारी शब्द आहेत. त्याला इलाज नाहीं. यानंतर पान नं. ४८ आयटेम २१ ( १ ) युद्धास मदत. यांतील पांच हजार रुपये या वर्षी कमी करावे. साम्राज्य सरकार संकटांत आहे व त्याला मदत करणें आपलें कर्तव्य आहे ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु त्यासाठीं आमची उपासमार करूं नये. शाळाखात्यांत एक मास्तर जादा नेमा म्हटलें तर पैशांची अडचण दाखविण्यांत येते. आणि युद्धासाठीं साम्राज्य सरकारास १५ हजार रुपये

दरवर्षास देण्यास मात्र अवसर सांपडतो. घरच्या लोकांना उपाशी ठेवून बाहेर मदत करणें हें धोरण बरोबर नाहीं. तेव्हां यांतील पांच हजार रुपये कमी करावे.

मे. अध्यक्षः—या बाबतींत कमिटमेंट झाली तर आपल्याला तसें करतां येणार नाहीं.

रा. ब. दिवाणः—युद्ध सुरू झाल्यापासून युद्ध संपेपर्यंत दरवर्षी पंधरा हजार रुपये साम्राज्य सरकारास मदत देण्यांत येतील अशी कमिटमेंट झाली आहे.

स. स. वाटवेः—कमिटमेंट झाली असेल तर उपाय नाहीं. आणि तशी झाली नसेल तर पांच हजार रुपये कमी करावे. आतां पान नं. ४८ आयटेम २१ ( २ ) फॅमिन रिझर्व्ह फंड या आयटेममध्यें धरलेली रक्कम दोन ठिकाणीं विभागावी. एक फॅमिन रिलिफफंड व दुसरा रिझर्व्ह फंडाकरितां अशी निरनिराळी ठेवावी.

रा. ब. दिवाणः—आपल्या सूचनेचा विचार होईल.

स. स. शिंदेः—पान ४८ आयटम २२ ( १ ) तगाई. तगाईसाठीं धरलेली रक्कम कमी आहे ती थोडी जास्त धरावी.

रा. ब. दिवाणः—कमी पडली तर जास्त करूं.

स. स. चौधरीः—पान ४६ आयटेम १९ ( ५ ) गरीब लोकांस मूठमाती याचा खुलासा करावा.

रा. ब. दिवाणः—जे बेवारशी लोक असतात त्यांना मूठमाती देण्यासाठीं ही रक्कम धरलेली आहे.

स. स. चौधरीः—ही रक्कम कमी आहे.

रा. ब. दिवाणः—यापेक्षां अधिक खर्च होत नाहीं हा नेहमींचा अनुभव आहे.

स. स. वाटवेः—अधिक खर्च लागत नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे. सध्यां एका मेताला मूठमाती द्यावयाची असेल तर २० रु. खर्च येतो. शिवाय असें कितीतरी लोक मरतात कीं त्यांना मूठमाती देण्यासाठीं आम्हांला आपआपसांत वर्गणी करून पैसे गोळा करावे लागतात. आज लाकडाचा भाव ६॥ रु. खंडी आहे. तेव्हां यासाठीं थोडी जास्त रक्कम धरल्यास अनाठायीं जाणार नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटेः—पान ४८ आयटेम २१ ( ३ ) सेन्ससासाठीं रक्कम धरली आहे ती कशाकरितां ?

रा. ब. दिवाणः—मागील बिलें अद्याप द्यावयाचीं आहेत त्यासाठीं ही रक्कम धरली आहे.

मे. अध्यक्षः—मंत्र्यांच्या पगारासंबंधीं काल ठराव आला होता तो त्यांनीं मांडावा व त्यावर आपण चर्चा करावी.

रा. स. देवधरः—त्यासंबंधीं उद्यां चर्चा व्हावी. सोपीव खात्याच्या बजेटाच्या प्रति आपणास देण्यांत आल्या आहेत. चालू सालीं सोंपीव खात्याच्या वांट्याला १५९७४० रु. आलेले आहेत. व या रकमेपैकीं ५३९३० इतक्या रकमेला आपली मंजुरी पाहिजे आहे. यापैकीं ६०० रु. मंत्र्याच्या पगारवाढीसाठीं धरलेली बाजूला ठेवून बाकीची सर्व रक्कम मी आपणां-पुढें खातेवार मांडतों व आपण त्याला मंजुरी द्यावी. या वर्षींच्या बजेटांत आकस्मिक खातें ठेवलें असून त्या खात्याला २००० रु. धरलेले आहेत. गेल्या वर्षी आकस्मिक खातें ठेवलें नव्हतें. कॉलऱ्याची सांथ आली त्यासाठीं श्रीमंतांकडून ९८६ रु. जादा घ्यावे लागले. या वर्षी आकस्मिक खातें ठेवल्यामुळें तशी गैरसोय होणार नाहीं. पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटकडील कांहीं 'मटिरियल' विकलें गेल्यामुळें त्याचाही फायदा मिळाला आहे. त्याचप्रमाणें वॉर अलावन्स-साठीं दोन हजार रुपये जादा देण्यांत आले आहेत. मंत्र्याची मागणी असो वा नसो श्रीमंतांकडून योग्य कामीं रक्कम मिळतेच ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पब्लिक वर्क्स खात्याला २८००० रु. या वर्षी धरलेले आहेत व त्या रकमेला आपली मंजूरी पाहिजे आहे. बजेट कमिटीच्या सभा गेल्या जून व जुलै महिन्यांत झाल्या. पब्लिक वर्क्स डिपार्डमेंटकडे तालुकावार कसकसा खर्च होणार आहे याचा तरजुमा तयार करण्यांत आला असून, त्याच्या प्रतीही आपणांस देण्यांत आलेल्या आहेत. आतां मी आपणांस खातेवार कसकसा खर्च होणार आहे तें सांगतों व प्रत्येक आयटेमला मंजुरी घेतों. सर्वांत मोठा आयटेम रस्तेरिपेअरीचा आहे. रस्तेरिपेअरीसाठीं या वर्षी १२१७५ रु. बजेटांत धरलेले आहेत. जमखंडी तालुक्यांतील रस्त्याकरितां ७५०० रु., सावळगी डिव्हिजनकरितां २३०० रु., कुंदगोळ तालुक्याकरितां २१७५, व ठाणें वाठारकरितां २०० रु. अशा रकमा धरल्या आहेत. यांत कांहीं ॲप्रोच रोडसुद्दि आहेत. या बाबतींत स्थानिक लोकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. लोकांची जास्तींत जास्त सोय व्हावी अशी आमची इच्छा आहे. लोकांनीं सहकार्याचा हात पुढें केल्यानंतर स्टेट आपला हात मागें घेईल असें होणार नाहीं. तेव्हां आपण ही १२१७५ रु. इतकी रक्कम मंजूर करावी.

मे. अध्यक्षः—याला कोणाची हरकत आहे असें मला वाटत नाहीं म्हणून १२१७५ रु. इतकी रक्कम मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों.

रा. सा. देवधरः— आतां दुसरा आयटेम नावा--रिपेअरीचा आहे. यासाठीं चालू सालीं ६१५ रु. बजेटमध्ये धरलेले आहेत. यांतील जमखंडी तालुक्यासाठीं ४१५ रु., सावळगी डिव्हिजनकरितां १५० रु. व ठाणें वाठारकरितां ५० अशी ६१५ रु. इतकी रक्कम नावा-रिपेअरीसाठीं खर्च होणार आहे तरी त्याला आपण मंजुरी द्यावी.

मे. अध्यक्षः—यालाही कोणाचा विरोध नसल्यामुळें, ६१५ रु. रक्कम मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

रा. सा. देवधरः—यानंतर पाण्याचीं कामें याकरितां यावर्षी ३६१५ रु. बजेटमध्यें धरलेले आहेत. लोकांची पाण्याची सोय व्हावी या दृष्टीनें ठिकठिकाणीं विहीरी काढण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें हरिजन लोकांनाही पाण्याची सोय व्हावी अशीहि योजना आहे.

स. स. वाटवेः—आपण जी विहिरीची योजना आंखली आहे त्यांत कुंभारहाळ येथील. हरिजनांकरितां कांहीं पाण्याची व्यवस्था केली आहे काय ?

रा. सा. देवधरः—त्यांची टर्न आली म्हणजे तेथील व्यवस्था होईल.

स. स. वाटवेः—तेथें पाण्याची व्यवस्था प्रथम झाली पाहिजे. त्या लोकांना पाण्याच्या मोबदल्याकरितां खत द्यावें लागतें. एक घागर पाण्याला कांहीं ठराविक खत द्यावें लागतें.

रा. सा. देवधरः—मी आपली सूचना मान्य करतों. एकूण ३६१५ रु. पैकीं जमखंडी तालुक्याकरितां १३०० रु. धरलेले आहेत. सावळगी विभागाकरितां ९५० रु., कुंदगोळ तालुक्याकरितां १२६५ रु. आणि ठाणें पाठखळकरितां १०० रु. अशा रकमा धरण्यांत आलेल्या आहेत. तेव्हां ही सर्व रक्कम आपण मंजूर करावी.

मे. अध्यक्षः—याला कोणाचा विरोध आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) कोणाचा विरोध नसल्यामुळें ३६१५ रु. पाण्याचे कामाकरितां मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

रा. सा. देवधरः—या वर्षीं चावड्यांकरितां ३१७० रु. इतकी रक्कम बजेटांत धरण्यांत आली आहे. चावड्यांचा उपयोग केवळ शेतसारा वसुलीकरितां होतो असें नाहीं; तर त्यांचा उपयोग सर्व लोकांना होतो. सार्वजनिक कामाकरितांहि लोकांना चावड्यांचा उपयोग होतो. लोकांना एकत्र जमून विचारविनिमय करण्यासाठींहि चावड्या उपयोगी पडतात.

स. स. वाटवेः—हें मला मान्य नाहीं. चावड्यांचा उपयोग सार्वजनिक कार्याकरितां होऊं शकत नाहीं. शिवाय चावड्यांची बाब ही सार्वजनिक नाहीं. ती एक आमच्या गळ्यांत धोंड आहे. माझें म्हणणें असें आहे कीं या सर्व चावड्यांचें काम आतांच हातीं घेऊं नये. अगोदर पाण्याची व्यवस्था करावी; चावड्यांसाठीं जी रक्कम धरली आहे त्यांतील २०० रु. कमी करावे व त्याच्या ऐवजीं कुंभारहाळ येथील हरिजनांची पाण्याची व्यवस्था करावी. चावड्यांमुळें आतांच कांहीं अडलेलें नाहीं. चावड्यांकरितां इतकी जास्त रक्कम धरूं नये अशा मताचा मी आहें. चावड्यांपेक्षां आज विहिरींची अत्यंत आवश्यकता आहे.

स. स. सोहनीः—चावड्या कमी करतां येत असतील तर कराव्या. नाहींतर 'आकस्मिक'साठीं जी दोन हजार रुपये रक्कम धरली आहे त्यांतील दोनशें रु. काढून कुंभारहाळ येथील विहीर तयार करावी.

रा. सा. देवधरः—तसें करण्यास कांहींच हरकत नाहीं. मी आपली सूचना मान्य करतों. आतां चावड्यांसाठीं धरलेली रक्कम मंजूर करावी.

मे. अध्यक्षः—याला कोणाचा विरोध आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) कोणाचा विरोध नसल्यामुळें चावड्यांची रक्कम मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों.

रा. सा. देवधरः—यानंतर धर्मशाळांकरितां एकूण ९७० रु. बजेटमध्यें धरलेलें आहेत.

स. स. चौधरीः—यांत मशिदीकरितां कांहीं रक्कम धरलेली आहे काय ?

रा. सा. देवधरः—नाहीं. तशी कांहीं मागणी नाहीं. शिवाय माशिदीचीहि सर्व व्यवस्था ठीक आहे. तेव्हां आपण ही ९७० रु. धर्मशाळांकरितां धरलेली रक्कम मंजूर करावी अशी विनंति आहे.

मे. अध्यक्षः—ह्याला कोणाचा विरोध नसल्यामुळें ही रक्कम मंजूर झाल्याचें जाहिर करतों.

रा. सा. देवधरः—यानंतर शाळांच्या वार्षिक रिपेअरीकरितां या वर्षी २००० रु. बजेटमध्यें धरण्यांत आले आहेत.

स. स. वाटवेः—कोणकोणत्या शाळांकरितां कसकशा रकमा खर्च होणार आहेत याबद्दलची माहिती देण्यांत येईल काय?

रा. सा. देवधरः—होय. याबद्दलच्या माहितीचें पत्रक मी आपल्याला वाचून दाखवितों. ( पत्रक वाचतात ) याप्रमाणें जमखंडी तालुक्यांतील रिपेअरीकरितां १०४० रु., सावळगी डिव्हिजनकरितां ३०० रु. कुंदगोळ तालुक्याकरितां ५८०, ठाणें वाठारकरितां ५० रु., व ठाणें पाटखळकरितां, ३० अशा रकमा धरल्या आहेत त्याला आपण मंजुरी द्यावी.

मे. अध्यक्षः—याला कोणाचा विरोध नसल्यामुळें ही दोन हजार रुपये रक्कम मंजूर झाल्याचें जाहिर करतों.

रा. सा. देवधरः—यानंतर शाळांच्या नवीन इमारतीच्या कामासाठीं एकूण ४४५५ रु. रक्कम धरली आहे तरी ती मंजूर करावी अशी विनंति आहे.

स. स. वाटवेः—जमखंडी येथील कानडी शाळेंत मुलांची वाढ झाली आहे व सॅनिटेशनच्या दृष्टीनें सध्यांची शाळेची जागा योग्य नाहीं ही गोष्ट दरबारच्या निदर्शनास आली आहे काय? व या बजेटांत त्यासंबंधीं कांहीं व्यवस्था आहे काय?

रा. सा. देवधरः—ही गोष्ट दरबारच्या निदर्शनास आली आहे व याप्रमाणें यावर्षी ४७० रु. त्या शाळेकरितां धरले आहेत.

स. स. वाटवेः—४७० रु. नीं काय होणार आहे?

रा. सा. देवधरः—फर्शी व पार्टिशनकरितां तेवढी रक्कम पुरे होईल.

स. स. वाटवेः—ती जागा अपुरी आहे ही गोष्ट आपल्या निदर्शनास आली आहे काय? फर्शी व पार्टिशननें जागेचा प्रश्न भागत नाहीं.

रा. सा. देवधरः—जागेच्या दृष्टीनें दुसरी इमारत बांधण्याचा विचार चालू आहे. तेव्हां आपण ही ४४५५ रु. मंजूर करावी.

मे. अध्यक्षः—ह्याला कोणाचा विरोध आहे काय? ( थोडा वेळ थांबून ) कोणाचा विरोध नसल्यामुळें ही रक्कम मंजूर झाल्याचें जाहिर करतों.

रा. सा. देवधरः—यानंतर सरकारी इमारतीकरितां ५४० रु. यावर्षी बजेटांत धरले आहेत; त्याचप्रमाणें किरकोळ कामाकरितां ३०० रु. धरले असून कॉंटिन्‌जन्सीकरितां १६० रु. धरले आहेत. तरी या तिन्ही रकमांना आपण मंजूरी द्यावी.

मे. अध्यक्ष:—याला कोणाचा विरोध नसल्यामुळें या तीन्ही रकमा मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों.

स. स. वाटवे:—आकस्मिक खर्चासाठीं म्हणून बजेटांत दोन हजार रुपये धरण्यांत आले आहेत. त्यांतील पांचशें रुपये कमी करून त्या रकमेमध्यें कुंभारहाळ येथील हरिजनांची विहीर तयार करावी.

मे. अध्यक्ष:—आपण तशी सूचना द्यावी.

स. स. वाटवे:—मी सूचना देतों. "मजरे कुंभारहाळ येथील अस्पृश्यांच्या विहिरीकरितां ५०० रुपये पर्यंत खर्च करावे."

रा. सा. देवधर:—या सूचनेंत 'सर्वांना मोकळीक असावी' असे शब्द घालावे.

स. स. वाटवे:—'अस्पृश्यांकरितां स्वतंत्र अशी विहीर बांधावी' असे शब्द मुद्दाम ठेविले आहेत. सर्वांना मोकळीक असावी असें शब्द घातले तर त्याचा उपयोग इतर लोकच करतील व हरिजनांना तेथें पाय ठेवायलाहि मिळणार नाहीं.

रा. सा. देवधर:—विहीर हरिजनवस्तींतच राहणार आहे. शिवाय स्पृश्यास्पृश्य हे भेद नाहींसे करावें असें धोरण आहे.

स. स. वाटवे:—शाब्दिक म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. स्पृश्य लोक हरिजनांना जवळ येऊं देत नाहींत असा कर्नाटकांतील अनुभव आहे.

मे. अध्यक्ष:—आतां यावर चर्चा पुरे. मी ही सूचना मतास टाकतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां ११ विरुद्ध ७ मतांनीं स. स. वाटवे यांची सूचना मंजूर झाली.

स. स. वाटवे:—यानंतर स्टँपखात्याच्या बाबतींत मला सूचना करावयाची आहे. स्टँप्स ज्या कागदावर छापले जातात तो कागद चांगला नाहीं; तरी तो यापुढें चांगला वापरावा. स्टँपसाठीं कागद वाईट वापरणें हा प्रजेवर अन्याय आहे. लोकांची या बाबतींत तक्रार आहे. एकादा कागद तयार होऊन कचेरीच्या बाहेर पडला नाहीं तों इतक्यांतच कागदाचा तुकडा पडतो. तेव्हां यापुढें हा कागद वापरण्यांत येऊं नये.

रा. ब. दिवाण:—हा कागद अद्याप बराच शिल्लक आहे.

स. स. वाटवे:—तो दुसरीकडे वापरावा.

रा. ब. दिवाण:—तो छापून तयार आहे.

स. स. सी. व्ही. आपटे:—या बाबतींत मला अशी सूचना करावयाची आहे कीं, स्टँपच्या शिक्क्यापासून 'परफोरेशन' फार दूर असतें व त्यामुळें बराच कागद वायां जातो. तरी या बाबतींत जरूर ती सुधारणा करावी.

रा. सा. देवधरः—आपली सूचना मान्य केली जाईल.

स. स. वाटवेः—जंगलखात्यासंबंधीं अशी सूचना आहे कीं, जंगल वाढविण्याच्या दृष्टीनें बाभळ व लिंब यांचें बीं वापरावें.

स. स. सोहोनीः—त्याचबरोबर चंदनाचें बींहि वापरावें.

रा. सा. देवधरः—तसा प्रयत्न चालू आहे.

स. स. शिंदेः—आपल्याकडे हायस्कूल त्याचप्रमाणें ए. व्ही. स्कूल अशा दोन शाळा असूनहि त्याचा फायदा जसा मिळावा तसा आपल्या मुलांना मिळत नाहीं. जीं मुलें पास होतात तीं खासगी शिकवण्या वगैरे ठेवून होतात. लोकांना मात्र आपल्याकडे शिक्षण मोफत आहे असें वाटतें. परंतु तशी खरी परिस्थिति नाहीं. कारण मुलगा पास झाला पाहिजे तर शिकवणी ठेवल्याशिवाय भागत नाहीं. तेव्हां या बाबीकडे मी रा. सा. मंत्र्यांचें लक्ष वेधतों.

रा. सा. देवधरः—आपण म्हणतां तशी खरोखर वस्तुस्थिति नाहीं.

स. स. वाटवेः—आपणाकडे हायस्कूलमधून शंकरशेट विद्यार्थी येण्यासाठीं कांहीं अधिक रकम धरावी. जो मास्तर हें काम कसोशीनें करील त्याला तीन चारशें रुपये देण्याची व्यवस्था करावी. आपण पाटील–कुळकर्णी यांना पारितोषिक देण्यासाठीं १०० रु. दरवर्षी बजेटमध्यें धरतां; तेव्हां आमचीं मुलें–जी भावी पिढी–त्यांच्या शिक्षणाकरितां जादा तीनचारशें रुपये धरण्यास कांहीं हरकत नाहीं. आपणाला तशी प्रोव्हिजन करतां येत नसेल तर आकस्मिकमधून तीनशें रुपये या कामासाठीं खर्च करावे. याचा चार वर्षांनंतर उपयोग होईल. चौथ्या इयत्तेपासून तसा प्रयत्न झाला पाहिजे.

स. स. सोहनीः—'आकस्मिक'मधून जर अशा प्रकारें खर्च होऊं लागला तर तें खातेंच राहूं शकत नाहीं.

रा. सा. देवधरः—आपलें बजेटावरील स्पीच माझ्या लक्षांत आहे. त्या दृष्टीनें शक्य तेवढा विचार होईल.

स. स. वाटवेः—मंत्र्यांनीं श्रीमंत राजेसाहेबांच्या कानावर ह्या गोष्टी घातल्या पाहिजेत; त्यांचेकडे रिपोर्ट केला पाहिजे. यानंतर मागासलेल्या वर्गासाठीं स्कॉलरशिपकरितां १०० रु. बजेटांत धरलेले आहेत; परंतु ही रक्कम अपुरी आहे. तेव्हां स्कॉलरशिपसाठीं ३०० रु. धरावे.

स. स. सोहनीः—उठल्या सुटल्या अस्पृश्यांचेच तेवढे लाड करणें हें बरोबर नाहीं. आमच्या सातारच्या बाजूला अस्पृश्य लोकांचें प्रमाण बरेंच आहे. अस्पृश्याप्रमाणें इतर मागासलेल्या वर्गाचीहि सोय आपण पाहिली पाहिजे. इतर लोकांच्या शिक्षणाची कांहीं तजवीज न करतां फक्त अस्पृश्यांचीच तेवढीं करणें हें अन्यायाचें होईल.

स. स. चौधरीः—उर्दू शाळांतील मुलांकरितांही अशी स्कॉलरशिप मिळावी.

स. स. वाटवे:—मागासलेला वर्ग म्हणजे ज्याला Depressed class म्हणतात त्यांचें १०० रु. त भागणें शक्य नाहीं. तीं मुलें म्हशी राखण्याकरितां हिंडतात. त्यांना शाळेंत पाठवावयाचें तर निदान पाटीपुस्तक तरी दिलें पाहिजे. पाटी-पुस्तक मिळत नाहीं म्हणून तीं मुलें शाळेंत जात नाहींत. हल्लींच्या परिस्थितींत पाटीपुस्तकाला सहा आणे पडतात. अशा स्थितींत १०० रु. पुरणार नाहींत. तेव्हां १०० च्या ऐवजीं ३०० रु. धरावे.

रा. सा. देवधरः—तशी बजेटमध्यें provision नाहीं.

स. स. वाटवे:—इतर कोणत्याही खात्यांतून तेवढी रक्कम घ्यावी.

रा. सा. देवधरः—तशी कशी घेतां येईल ?

स. स. वाटवे:—ज्याअर्थी एक लक्ष अठावन हजार रुपये सरकारनें आमच्या ताब्यांत दिले आहेत त्याअर्थी तें खर्च करण्याचा अधिकार आमचा आहे.

रा. सा. देवधरः—आपण तशी सूचना मांडावी.

स. स. वाटवे:—मी मांडतों.

"मागासलेल्या वर्गास स्कॉलरशिप म्हणून १०० बजेटांत धरले आहेत त्या ऐवजीं २०१ रुपये धरावेत."

मे. अध्यक्षः—मी ही सूचना मतांस घालतों.

गे. अध्यक्षांनीं मतें घेतां ८ विरुद्ध शून्य मतांनीं सूचना पास झाली. मतें मोजणीचे वेळीं दहा सभासद तटस्थ होते.

स. स. वाटवे:—वैद्यकीखात्यासंबंधीं बोलावयाचें झाल्यास कुंदगोळ येथील काम सध्यां चांगलें चाललेलें आहे. त्या ठिकाणीं maternity ward करितां नर्सची अत्यंत आवश्यकता आहे; तेव्हां ती ताबडतोब व्हावी. डॉ. टोणपी यांचें काम समाधानकारक आहे. राणीबेन्नूर; हुबळी वगैरे ठिकाणांहून पेशंट लोक येतात. त्या दवाखान्याचें काम बरेंच वाढलेलें आहे. त्या दृष्टीनें तेथें आणखी एका जादा कंपाऊंडरची जरुरी आहे. त्याचप्रमाणें एका नर्सचीही जरुरी आहे. तरी तशी व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. म्हणजे ती एक छोटेशी वानलेसवाडीच होईल.

रा. सा. देवधरः—डॉ. टोणपीसाहेबांनीं कायमचें कुंदगोळला राहायचें म्हणजे त्यांचा उत्कर्ष होण्याऐवजीं अपकर्षच होईल.

स. स. वाटवे:—डॉ. टोणपी गेले म्हणून काय झालें ? त्यांचे जागीं दुसरा एखादा जर्मनी, इंग्लंडमधून आलेला डॉक्टर आणतां येईल. जमखंडी दवाखान्याचेंही काम डॉ. पटवर्धन आल्यापासून बरेंच वाढलेलें आहे. कंपाऊंडराशिवाय तेथें उमेदवारही आहेत. परंतु उमेदवारांची स्थिति चमत्कारिक आहे. कोणत्याही खात्यांत नोकरीपूर्वी उमेदवार म्हणून घेतात. व त्याला कांहीं वर्षांनीं नोकरीवर घेतात. परंतु या दवाखान्यांत ४।५ वर्षें उमेदवार म्हणून काम करणारीं माणसें आहेत. परंतु त्यांना अद्याप नोकरीवर घेण्यांत आलेलें नाहीं. त्यांच्या-

कडून फुकट काम करून घेणें बरें नाहीं. या संस्थानांत गणेश रानडे या नांवाचे गृहस्थ ४० वर्षेपर्यंत उमेदवारच होते.

रा. सा. देवधरः—ते स्वतः कायम करून घ्यायला कबूल नव्हते. दुसरी एखादी अशी केस आहे काय ?

रा. ब. दिवाणः—कांहीं लोक उमेदवार म्हणून दवाखान्यांत काम करीत नसून कांहीं लोक माहिती घेण्याच्या दृष्टीनें राहिलेले आहेत. हे लोक कंपाऊंडरच्या परीक्षेला बसण्याकरितां माहिती घेतात. नोकरीच्या दृष्टीनें हीं माणसें दवाखान्यांत राहिलेलीं नाहींत. मात्र जे उमेदवार म्हणून येतात ते नोकरीच्या दृष्टीनेंच राहतात.

स. स. वाटवेः—शब्दांतील फरक कळला. पण त्या लोकांना दवाखान्यांत जाऊन कांपाउंडिंग करावें लागतें ना ?

त्या ठिकाणीं ड्यूटी करावी लागते ना ?

रा. सा. देवधरः—आपली सूचना विचारांत घेतली जाईल.

स. स. वाटवेः—पान नं. ७० आयटेम १२ ( २ ) ग्रामसुधारणा. या ग्रामसुधारणेचें स्वरूप काय ?

रा. सा. देवधरः—कांहीं ठिकाणच्या अपुऱ्या विहिरी पुऱ्या करणें, कांहीं रस्त्यांची दुरुस्ती करणें वगैरे कामें यांत येतात.

स. स. वाटवेः—पब्लिक वर्क्स खात्याकडून हीं कामें झालीं पाहिजेत. माझ्या समजुतीनें विहिरी काढणें ही ग्रामसुधारणा नाहीं. हल्ली बऱ्याच खेड्यांतून गुरांची पैदास नाहीं; त्याकरितां चांगल्या वळूंची निपज झाली पाहिजे.

रा. सा. देवधरः—प्रथम प्रयोगादाखल अशी एक दोन गांवांतून व्यवस्था करूं.

स. स. वाटवेः—यांत पोल्ट्री—कोंबड्यांचा धंदा येऊं शकतो. तेव्हां यासाठीं कांहीं रक्कम धरून तो धंदा सुरू करावा. तसेंच खेड्यांतून adult education ची सोय झाली पाहिजे. जीं माणसें संध्याकाळीं थोडी फार शिकतील त्यांच्याकरितां एक ८।१० रु.च्या माणसाची नेमणूक करावी. औंध संस्थानांत अशी सोय आहे. आणखी एक सूचना करावयाची आहे ती अशी कीं बडोदें संस्थानाप्रमाणें ठिकठिकाणीं मोफत वाचनालयाची व्यवस्था करणें. निदान प्रत्येक खेड्याला एकादें मासिक, दैनिक किंवा साप्ताहिक—विशेषतः शेतकी किंवा शिक्षण-खात्याला वाहिलेलें सुरू करावें.

रा. सा. देवधरः—आपल्या सूचनांचा विचार करूं.

मे. अध्यक्षः—आतां वेळ होत आली आहे; तेव्हां थोडक्यांत उरकावें.

रा. सा. देवधरः—आतां चर्चा बरीच झाली आहे. तेव्हां आपण ५३३३० रु. ( मंत्र्याच्या पगाराव्यतिरिक्त ) इतकी रक्कम मंजूर करावी.

मे. अध्यक्षः—याला कोणाचा विरोध आहे काय ? ( थोडा वेळ थांबून ) कोणाचा विरोध नसल्यामुळें ५३३३० रु. इतकी रक्कम मंजूर झाल्याचें जाहीर करतों. त्याचप्रमाणें आतां वेळ संपल्यानें काम तहकूब ठेवावें.

---

# चवथा दिवस

## शुक्रवार, ता. २१-८-४२

अधिवेशनाच्या चवथ्या दिवसाच्या बैठकीस दुपारीं १२॥ वाजतां सुरुवात झाली. पहिल्या तीन दिवसां इतकेच सन्मान्य सभासद हजर होते.

### मंत्र्यांच्या पगारवाढीबद्दल चर्चा

मे. अध्यक्षः—प्रथम मंत्र्यांच्या पगारवाढीबद्दल आलेल्या यादीसंबंधीं चर्चा व्हावी.

रा. सा. देवधरः—माझ्या पगाराबद्दल मलाच बोलण्याची पाळी येत आहे. तथापि त्याला इलाज नाहीं. गेल्या वर्षी १२५ रु. पगार व २५ रु. भत्ता मंजूर करण्यांत आला आहे. यावर्षी बजेट-कमिटीनें १७५ रु. पगार व २५ रु. भत्ता याप्रमाणें रक्कम आकारून त्याप्रमाणें बजेटमध्यें प्रोव्हिजन केली आहे. व त्याला अनुसरूनच ही यादी आली आहे. अर्थात् या संबंधीं मी अधिक कांहीं बोलावयास पाहिजे असें नाहीं. आपण सर्वांनीं चर्चा करून तो पगार ठरवावयाचा आहे.

रा. ब. हुल्याळः—मला या बाबतींत असें विचारायचें कीं, एकदां मंत्र्याचा पगार ठरल्यावर पुन्हां हा प्रश्न उद्भवतो किंवा कसें? कॉंग्रेस मिनिस्ट्रीच्या वेळीं त्यांनीं एकदां ठरविलेला पगार अखेरपर्यंत घेतला. त्यांत पुन्हां कांहीं बदल केला नाहीं. जेव्हां एक मिनिस्ट्री जाऊन दुसरी मिनिस्ट्री येते त्यावेळीं पुन्हां पगाराचा प्रश्न उद्भवतो. आपल्या येथें आज तशी परिस्थिती नाहीं. शिवाय येथील एकंदर परिस्थितीचा विचार करतां मंत्र्यांनीं आपण होऊन उदार मनानें पगार जास्त न मागतां त्यांनीं उलट ऑनररी म्हणून काम केलें पाहिजे. अभिमानासाठीं त्यांनीं ही जागा स्वीकारली आहे. जनतेमध्यें popularity मिळवावयाची असेल तर ऑनररी काम केलें पाहिजे. आणि मंत्र्यांनीं स्वतः आपण होऊन तशी suggestion करावी. मंत्र्यांची या गोष्टीला तयारी नसेल तर असेंब्लीनें प्रथम एकदां ठरलेल्या पगारांत फिरून बदल करतां येतो कीं काय हें ठरविलें पाहिजे.

रा. सा. पटवर्धनः—या बाबतींत कायद्याचे कलम नं. २४ हें अगदीं मोघम स्वरूपांत आहे. गेल्यावर्षी पगाराबद्दल जो निर्णय झाला आहे तो एका वर्षापुरताच होता कीं तीन वर्षांकरितां होता याबद्दल कांहींच मर्यादा नाहीं. या कलमामध्यें अगदीं मोघम शब्द आहेत. (कलम नं. २४ वाचतात.) या दृष्टीनें हा प्रश्न वादग्रस्त आहे. बॉम्बे गव्हर्मेंटचाहि तसा कांहीं रूल नाहीं. पण कन्व्हेन्शन मात्र अशी आहे कीं, मंत्र्यांचा जो पगार एकदां ठरतो तोच कायम असतो. शिवाय या ठिकाणीं मागच्या वर्षीचा पगार धरून त्याशिवाय ६०० रु. वाढीव रकम बजेट कमिटीनें बजेटमध्यें धरलेली आहे. परंतु असें करणें बरोबर नाहीं. जो पगार द्यावयाचा असेल तो सबंध पगार मंडळापुढें मांडला पाहिजे व त्याला मंडळाची मंजुरी घेतली पाहिजे असें मला वाटतें. या ठिकाणीं गेल्या वर्षीचा पगार कायम धरून वाढ ही स्वतंत्र धरली आहे; शिवाय दुसरा मुद्दा असा आहे कीं, मंत्र्याचा पगार दरवर्षी मंडळानें ठरवावयाचा

कीं आज ठरविण्यांत येईल तोच पगार कायम समजण्यांत यावयाचा हें निश्चित ठरविलें पाहिजे. आणि दरवर्षी मंत्र्याचा पगार ठरवावयाचा तर मागच्या वर्षाच्या पगाराचा आतां विचार करण्याचें कारण नाहीं असें मला वाटतें. तेव्हां या बाबतींत मंडळानें कायतो निर्णय द्यावयाचा आहे.

मे. अध्यक्षः—सबंध पगार एकदम मांडून तो मंडळाला मंजूर करतां येईल काय ?

रा. सा. पटवर्धनः—ह्या सर्व गोष्टी ठरवावयाच्या आहेत. दरवर्षी पगार ठरवावयाचा असेल तर सबंध पगार एकदम मंडळापुढें मंजुरीसाठीं मांडला पाहिजे. हा निर्णय कायदेमंडळानें घ्यावयाचा तर सबंध पगार मंडळापुढें मांडला पाहिजे.

स. स. सी. व्ही. आपटेः—या धोरणामुळें मंत्र्याला हाऊसमध्यें मेजॉरिटी नसेल तर त्याचा पगार कमी करतां येईल. कारण कलम नं. २४ मध्यें याबद्दल कांहींच निर्बंध नाहीं.

रा. सा. पटवर्धनः—कलम नं. २४ चा अर्थ दरसाल पगार ठरवायचा कीं एकदां ठरविलेला तीन वर्षेपर्यंत कायम समजावयाचा हें निश्चित ठरवावयाचें आहे.

स. स. वाटवेः—कलम २४ प्रमाणें मंत्र्याचा पगार कायदेमंडळाला मतास घालतां येईल किंवा काय हा मुख्य प्रश्न आहे.

स. स. हुल्याळः—हा interpretation चा प्रश्न आहे. तेव्हां हा मतास न घालतां याबद्दल प्रेसिडेंटनीं निर्णय द्यावा.

स. स. वाटवेः—आपली सूचना मला मान्य आहे. अध्यक्षांनींच या बाबतींत रूलिंग द्यावें.

मे. अध्यक्षः—या बाबतींत liberal view घेतां मंत्र्याचा पगार दरसाल ठरविण्याचा हक्क कायदेमंडळास असावा असें मी या प्रश्नावर रूलिंग देतों.

रा. सा पटवर्धनः—आतां हा सबंध पगार मांडावयाचा कीं ६०० रु. च इतकी वाढीव रकम मांडावयाची हें ठरवावें.

मे. अध्यक्षः—यंदा हा सबंध पगार पुन्हां मंजूर करावा.

स. स. वाटवेः—याचा अर्थ मंत्र्याचा पगार १ रु. पासून दोनशें रुपये पर्यंत असा समजावयाचा ना ?

मे. अध्यक्षः—होय. आतां मंत्र्यांनीं पगाराची डिमांड मांडावी.

रा. सा. देवधरः—दरमहा दोनशें रुपये पगार व शिवाय पन्नास रुपये भत्ता अशी मी डिमांड करतों.

मे. अध्यक्षः—कायद्याप्रमाणें २०० रु. च्यावर आपल्याला जास्त रकमेची मागणी करतां येणार नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटेः—बजेट कमिटीच्या शिफारसीप्रमाणें १७५ रु. पगार व २५ रु. रक्कम भत्ता अशी मंजूर करण्यास हरकत नाहीं.

रा. सा. देवधरः—बजेट कमिटीची शिफारस मला मान्य आहे.

रा. ब. दिवाणः—कायद्याच्या कलमाप्रमाणें २०० रु. पर्यंत रक्कम मंजूर करण्यास हरकत नाहीं. परंतु गेल्यावर्षी त्यांनीं स्वतः १५० रु. पगार व शिवाय ३० रु. भत्ता अशी मागणी केली होती; तेव्हां त्यापेक्षां त्यांनीं जास्त रक्कम मागूं नये अशी माझी सूचना आहे.

स. स. शिंदेः—मंत्र्यांनीं १५० रु. पगार व २५ रु. भत्ता इतकी रक्कम घ्यावी अशी माझी amendment आहे.

मे. अध्यक्षः—ही amendment कबूल आहे काय ?

रा. ब. दिवाणः—नाहीं.

मे. अध्यक्षः—मी आपली सूचना मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर सूचना १६ मतांनी बिनविरोध पास झाली.

मे. अध्यक्षः—आतां ऑडिट कमिटीसाठीं नांवें सुचवावीं.

रा. सा. देवधरः—गेल्या वर्षी (१) रा. सा. गोखले (२) स. स. शिंदे (३) स. स. कल्लनगौडा पाटील (४) स. स. नवणी व (५) स. स. अच्युतराव पाटील अशी मंडळी ऑडिट कमिटीवर होती. माझ्यामतें ह्या वर्षीहि हीच मंडळी ऑडिट कमिटीवर घ्यावी. फक्त स. स. अच्युतराव पाटील यांच्या ऐवजीं, स. स. अनिखिंडी यांना घ्यावें.

स. स. शिंदेः—माझें स्वतःचें नांव यांतून वगळावें.

रा. सा. देवधरः—तसें कसें होईल. आपल्याशिवाय काम होणार नाहीं, आपल्या अनुभवाचा फायदा आम्हांला मिळाला पाहिजे.

रा. सा. गोखलेः—ह्यांच्याशिवाय काम होणार नाहीं हे शब्द अयोग्य आहेत.

रा. सा. देवधरः—त्या दृष्टीनें मी म्हटलेलें नाहीं.

स. स. वाटवेः—माहितगार या दृष्टीनें असा त्याचा अर्थ घ्यावा.

रा. ब. दिवाणः—आज जे स. सभासद absent आहेत त्यांपैकीं एकाला ऑडिट कमिटीवर घ्यावें. माझ्या मतें स. स. गाडगीळ यांचें नांव घालावें.

स. स. वाटवेः—स. स. गाडगीळ यांचेबद्दल objection नाहीं. परंतु मी स. स. बंगी यांचें नांव सुचवितों. माझा विरोध नाहीं. स. स. कल्लन गौडा पाटील यांचें नांव कमी करावें व त्याऐवजीं स. स. बंगी यांचें नांव घालावें.

स. स. चौधरीः—मी स. स. सौ. आपटे यांचें नांव ऑडिट कमिटीवर सुचवितों.

रा. ब. दिवाणः—मी सूचना केली ती एवढ्यासाठींच कीं, त्या पक्षाचा एकतरी सभासद ऑडिट कमिटीवर असावा. त्यांत नांवाचा प्रश्न नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटेः—त्यांनीं नाकारलें तर ?

स. स. वाटवेः—तो पुढचा प्रश्न आहे. कदाचित् स. स. गाडगीळ आमच्या पक्षांत येतील असें मला वाटतें तेव्हां त्यांचेंच नांव घालावें.

रा. सा. देवधर:—ऑडिट कमिटीसाठीं पुढीलप्रमाणें नांवें मंजूर करण्यांत यावीं. (१) रा. सा. गोखले (२) स. स. शिंदे (३) स. स. गाडगीळ (४) स. स. अनिखिंडी व (५) स. स. नवणी.

स. स. चौधरी:—जे हजर नाहींत त्यांचें नांव घालणें बरोबर नाहीं.

मे. अध्यक्ष:—रा. सा. मंत्री यांनीं ऑडिट कमिटीसाठीं जीं नांवें सुचविलीं आहेत त्यांना कोणाचा विरोध आहे काय? (थोडा वेळ थांबून) कोणाचा विरोध नसल्यामुळें रा. सा. देवधर यांनीं सुचविलेली ऑडिट कमिटी मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों. आतां ठराव घ्यावे.

## उपहारानंतर

### स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ६

"सर परशुरामभाऊ कॉलेजांत हल्लीं ५० विद्यार्थ्यांना फ्रीशिप देणेची योजना आहे. त्याऐवजीं १०० विद्यार्थ्यांना हाफ्-फ्रीशिप देणेची योजना आंखल्यास सर्वांस फायदा मिळेल. तरी तशी व्यवस्था व्हावी अशाबद्दल श्रीमंत राजासाहेब यांना हें मंडळ विनंति करीत आहे."

स.स. वाटवे:—सध्यां ५० मुलांना फ्रीशिप मिळते त्याऐवजीं १०० मुलांना हाफ्-फ्रीशिप मिळावी म्हणून हा ठराव आहे. हल्लीं हायस्कूलमधून विद्यार्थ्यांची संख्या बरीच वाढत आहे; तेव्हां फ्रीशिपचा फायदा सर्वांना मिळावा असा ह्या ठरावाचा हेतु आहे. तेव्हां तो मंजूर करण्यास कांहींच हरकत नाहीं.

मे. अध्यक्ष:—या बाबतींत कमिटमेंट झाली असावी असें वाटतें.

स. स. वाटवे:—माझ्या मुलाला १०० रु. फ्रीशिप म्हणून मिळणार असतील त्याऐवजीं ५० रु. मिळावे. यांत दरबारचें कांहीं नुकसान नाहीं.

रा. सा. पटवर्धन:—दरबारचें नुकसान नसलें तरी कॉलेजनें तसें मान्य केलें पाहिजे ना?

मे. अध्यक्ष:—कॉलेज तसें मान्य कसें करील?

रा. सा आपटे:—पांच हजार रुपये द्यावयाचे व ५० मुलें कॉलेजमध्यें घ्यावयाचीं असें ठरलेलें आहे तेव्हां त्यांत बदल कसा करतां येईल? शिवाय कॉलेजवर मुलांच्या संख्येच्या बाबतींत निर्बंध असल्यामुळें कॉलेजला तसें मान्य करतां येणार नाहीं.

स. स. वाटवे:—Commitment झाली असेल तर मी हा ठराव परत घेतों.

### स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ७

"जमखंडी संस्थानांतील शेतीसुधारणेचे बाबतींत एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घेऊन एखादी विधायक योजना आंखणें जरूर झालें असल्यानें तशी योजना अंमलांत आणावी अशी या सभेची श्रीमंत राजेसाहेबांना विनंति आहे."

जमखंडी संस्थानांत शेतीसुधारणेच्या बाबतींत काय काय सुधारणा कराव्या यासंबंधींच्या सूचना मी बजेटच्या भाषणाच्या वेळीं मांडलेल्या आहेत. परंतु त्या सूचना ठरावाच्या रूपानें मांडून त्याकडे दरबारचें लक्ष वेधावें म्हणून हा ठराव मांडला आहे. या संस्थानांत निव्वळ शेतीचें उत्पन्न ४॥ लाखांचें आहे. परंतु शेतीसुधारणेच्या दृष्टीनें कोणतीच योजना नाहीं. तशांत पावसाचें मान दिवसेंदिवस कमी होत चाललें आहे. यामुळें संस्थानच्या रयतांची स्थिति अत्यंत हलाखीची झाली आहे. जमखंडी दरबारनें ती नाहींशी व्हावी म्हणून प्रयत्न करावा म्हणून हा ठराव मांडला आहे. शेतीसुधारणेच्या दृष्टीनें कोणकोणत्या अडचणी आहेत व त्या नाहींशा कशा कराव्या हें मी सांगणार आहे. पावसाचें प्रमाण कमी होत चालल्यानें शेतीला पाण्याची फार टंचाई भासते; तेव्हां ती दूर करण्यासाठीं Bunding system अमलांत आणावी. ज्या त्या ठिकाणीं ओढे अडवून त्या पाण्याचा शेतीसाठीं उपयोग होईल अशी तजवीज दरबारनें करावी. तसेंच ज्या ठिकाणीं तलाव आहेत ते दुरुस्त करून त्या पाण्याचा शेतीला उपयोग होईल अशी व्यवस्था करावी. जमिनीची सुपीकता कमी झाली आहे त्या दृष्टीनें ज़मिनीमध्यें कसाची वाढ करण्याकरितां योजना आंखणें. यासाठीं तज्ञ नेमावे व त्यांच्या सल्ल्याप्रमाणें योजना आंखावी. हल्लीं जीं धान्यें पिकविलीं जातात त्यांच्याशिवाय दुसरीं धान्यें पिकविण्याची प्रथा पाडली जावी. असा प्रयत्न करणें, सोयाबिनसारखीं धान्यें सर्वत्र पिकविणें, त्याचप्रमाणें रयतांची स्थिति सुधारणेच्या दृष्टीनें संस्थाननें कर्ज उभारून रयतांचें कर्ज स्वतःला फेडणें शक्य आहे काय हें तज्ज्ञामार्फत ठरविणें व त्याप्रमाणें व्यवस्था करणें; याप्रमाणें दरबारकडून तजवीज झाल्यास रयतांची स्थिति थोड्याफार प्रमाणांत सुधारेल असें मला वाटतें.

रा. सा. देवधरः—आपण योजना सुचविण्यापूर्वींच आपल्याकडे कांहीं ठिकाणीं तसा उपक्रम चालू झाला आहे. अलबाळ गांवच्या तलावाचें पाणी शेतीला उपयोगी पडावें म्हणून तशी व्यवस्था करण्यांत आली आहे. मरेगुद्दी गांवीं शाळामास्तराच्या हाताखालीं असा उपक्रम चालू आहे. ते ६० रु. शेतसारा भरतात.

स. स. वाटवेः—माझा ठराव शेतकऱ्यांकरितां आहे; शाळामास्तरांकरितां नाहीं. तज्ज्ञांचें या बाबतींत काय मत असेल तें सांगा. इतरांचें नको.

रा. सा. देवधरः—आपलें तत्त्व दरबारला मान्य आहे. आपणांपुढें बजेट आहे. ५०० रु. नीं हा निर्वाह होणार नाहीं. तेव्हां बजेटमध्यें ज्या ज्या वेळीं सवड होईल त्या त्या वेळीं आपल्या सूचना स्वीकारतां येतील. तथापि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न असल्यामुळें त्यांनीं, ज्या ठिकाणीं असा उपक्रम चालू आहे तेथें जाऊन प्रत्यक्ष माहिती मिळवावी व तसा उपक्रम चालू करावा. सर्वस्वीं दरबारवर अवलंबून रहाण्याचें कारण नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटेः—या बाबतींत तज्ज्ञ आणून जमखंडी संस्थानची सबंध सर्व्हे केली पाहिजे. कोणत्या गांवांत कोणत्या प्रकारच्या जमिनी आहेत, त्या जमिनींत कोणतें

धान्य येईल, जमिनींची सुपीकता वाढविण्यासाठीं काय तजवीज केली पाहिजे वगैरेबद्दल जमिनींची पाहाणी करून रिपोर्ट तयार केला पाहिजे. को-ऑपरेटिव्ह सोसायट्या काढण्यापूर्वीं जसा रिपोर्ट तयार केला होता तसाच रिपोर्ट या बाबतींतही झाला पाहिजे. तज्ज्ञ आणून नुसती सदीप व्याख्यानें देऊन कांहीं उपयोग होणार नाहीं. प्रत्येक ठिकाणीं जमिनी आहेत त्यांची agricultural survey झाली पाहिजे. तेव्हां त्या दृष्टीनें या ठरावाकडे पहा. एकदां योजना तयार झाल्यावर ती अमलांत कशी आणावयाची तो प्रश्न वेगळा. विणकरांच्या बाबतींत माहिती गोळा करण्याचे बाबतींत जसा ठराव झाला आहे त्याच स्वरूपाचा हा ठराव आहे. तेव्हां हा मान्य करण्यास कांहीं हरकत नाहीं.

स. स. वाटवे:—माझा जो ठराव आहे तो रा. ब. दिवाणसाहेबांच्या अधिकारक्षेत्रांतील आहे. ते शेतसारा वसूल करतात तेव्हां त्यांनीं या ठरावाबद्दल विचार करावा. या बाबतींत रा. ब. दिवाणसाहेबांनीं खुलासा केला तर अधिक बरें होईल.

रा. ब. दिवाण:—आपण ठराव मांडला आहे व त्याला सोंपीव खात्याच्या मंत्र्यानीं उत्तरही दिलें आहे. बजेटमध्यें provision नसल्यामुळें या ठरावाबद्दल तूर्त विचार करतां येत नाहीं असें सांगण्यांत आलें आहे. योजना स्तुत्य आहे; चांगली accept करण्यासारखी आहे; परंतु सोंपीव खात्याच्या बजेटमध्यें तशी provision नाहीं; त्याला मी काय करणार?

रा. सा. पटवर्धन:—हा सोंपीव खात्याच्या कक्षेंतील प्रश्न आहे.

स. स. वाटवे:—ज्या संस्थानचें निव्वळ शेतीचें उत्पन्न ४॥ लाख रुपयांचें आहे तेथील शेतकऱ्यांचे करितां एखादी योजना सुचविली तर त्याला provision नाहीं असें सांगण्यांत यावें ही गोष्ट खरोखर दुर्दैवाची आहे. परंतु हा सोंपीव खात्याचा प्रश्न नाहीं. सोंपीव खात्याच्या मंत्र्याकडे यांतील एक पै सुद्धां जात नाहीं. हा प्रश्न दिवाणसाहेबांच्या क्षेत्रांतील आहे तेव्हां त्यांनीं खुलासा करावा.

रा. ब. दिवाण:—या ठरावाला आमचा विरोध नाहीं.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतांस घालतों.

स. स. वाटवे:—ठराव मतांस घालण्याचें कारण नाहीं. हा ठराव सर्वांना मान्य आहे.

रा. सा. देवधर:—या ठरावांत 'शक्य तोंवर' असा शब्द घालावा.

रा. ब. दिवाण:—'शक्य तोंवर' यापेक्षां 'होतां होईल तों' असा शब्द घालावा.

स. स. सी. व्ही. आपटे:—ठरावाचें तत्त्व मान्य केल्यानंतर त्यांत शाब्दिक फेरफार करण्यांत अर्थ काय? शिवाय ही कांहीं अगडबंब मागणी नाहीं. थोड्या पैशांचा प्रश्न आहे. परंतु तो कुठूनही काढतां येईल.

मे. अध्यक्ष:—या ठरावाला कोणाचा विरोध नसल्यामुळें हा सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

रा. सा. गोखले:—ऑडिट कमिटीबद्दल थोडासा खुलासा करावयाचा आहे. गेल्या वर्षी जी ऑडिट कमिटी नेमली होती तिनें आपला ऑडिट रिपोर्ट तयार करून तो मंडळाला सादर केला आहे. तथापि त्या रिपोर्टांत ज्या कांहीं सूचना केल्या आहेत त्यांचा विचार होण्यासाठीं सदरहू रिपोर्ट मंडळापुढें चर्चिला जावा असें मला वाटतें. तरी या गोष्टीचा विचार व्हावा.

स. स. वाटवे:—मी प्रथमच याबद्दल सांगितलें होतें.

रा. सा. गोखले:—पुन्हां तीच अडचण आहे. कायद्याचें कलमहि या बाबतींत मोघम आहे. बरें ठराव आणावयाचा तर ३० दिवसांची मुदत लागते.

स. स. वाटवे:—कायद्याप्रमाणें तसा ठराव आणतां येत नाहीं.

स. स. सी. व्ही. आपटे:—कलम नं. ५० अगदीं मोघम स्वरूपांत आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि आमच्यापुढें जो ऑडिट कमिटीचा रिपोर्ट आला आहे तो मान्य आहे किंवा अमान्य आहे यांपैकीं कोणती तरी एक गोष्ट म्हणावीच लागेल. परंतु त्या रिपोर्टावर चर्चा झाल्याशिवाय आपल्याला त्यावर कांहींच मतप्रदर्शन करतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें आम्ही बजेटावर चर्चा करतों तशीच चर्चा या रिपोर्टावरहि करावयास पाहिजे.

मे. अध्यक्ष:—रा. सा. न्यायमंत्र्यांनीं या कायद्याच्या बाबतींत ज्या ज्या उणीवा व अडचणी भासत आहेत त्यांची नोंद करून ठेवावी व त्या पुढच्या वर्षी दुरुस्त होतील अशी तजवीज करावी.

रा. सा. पटवर्धन:—कायद्याच्या अम्मलबजावणीच्या दृष्टीनें ज्या ज्या अडचणी येत आहेत त्यांची नोंद करण्यांत आली असून त्या कलेक्टर अगर दिवाणसाहेब यांचे मार्फत श्रीमंत राजेसाहेब यांचेकडे पाठविण्यांत येतील.

मे. अध्यक्ष:—रा. ब. दिवाणसाहेबांचे मार्फतच पाठवाव्या.

स. स. वाटवे:—मे. रा. ब. अध्यक्षांचे मार्फत पाठवाव्या.

रा. ब. दिवाण:—Executive officer मार्फत श्रीमंत राजासाहेबांकडे पाठविण्यांत येतील.

### स. स. विठ्ठल रामचंद्र नवणी यांचा ठराव नं. ६

" हरिजनांच्या बाबतींत रावसाहेब मंत्र्यांनीं आंखलेलें धोरण हरिजनास मान्य असल्यानें तें असेंच मंत्र्यांनीं चालवावें अशी शिफारस श्रीमंत राजासाहेब यांना करावी अशी या कौन्सिलची शिफारस आहे. "

रा. ब. दिवाण:—ऑफिशियली आम्हांला या ठरावाचे बाबतींत भाग घेतां येणार नाहीं.

स. स. सोहनी:—या ठरावाच्या शब्दांत थोडासा बदल करावा. ' ही गोष्ट नमूद करून शिफारस करावी. ' असें शब्द घालावे.

स. स. वाटवे:—यांत बदल करण्याची कांहीं जरूरी आहे असें मला वाटत नाहीं.

मे. अध्यक्ष:—हा ठराव बिनविरोध मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों.

## स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ८

" मौजे सावळगी व बनहट्टी व कसबें कुंदगोळ येथील प्रजाजनांना पाण्याची अत्यंत टंचाई असल्यानें त्यांचे बाबतींत एकादी योजना आंखून काम सत्वर सुरू करावें अशी या सभेची श्रीमंत राजेसाहेबांना विनंति आहे. "

रा. ब. दिवाण:—मौजे सावळगी येथें पाण्याचे बाबतींत सरकारी योजना चालू आहे. बनहट्टी व कुंदगोळ हीं गांवें म्युनिसिपालटीच्या हद्दींतील असल्यानें तेथील पाण्याची व्यवस्था म्युनिसिपालटीनेंच करणें आवश्यक आहे. स्टेट या बाबतींत कांहीं करूं शकत नाहीं. म्युनिसिपालटीनें हें काम हातीं घेतल्यास दरबारकडून त्याला योग्य ती मदत होईल.

स. स. वाटवे:—सावळगी येथील पाण्याचे बाबतींत सरकारी योजना आहे असें सांगण्यांत आलें. परंतु बनहट्टी व कुंदगोळ येथेंहि पाण्याची अतिशय टंचाई आहे ती दूर करणें जरूरीचें आहे. या बाबतींत हवाला देऊन काम भागणार नाहीं. बनहट्टी व कुंदगोळ येथील म्युनिसिपालिट्यांचे फंड अत्यंत कमी आहेत. थोड्या फंडांत अशा मोठ्या योजना म्युनिसिपालिट्यांना आंखतां येणें शक्य नाहीं. झाडलोट, दिवाबत्ती यालाच म्युनिसिपालिटीचें उत्पन्न पुरत नाहीं तेव्हां एवढ्या मोठ्या योजना त्यांना कशा हातीं घेतां येतील? तेव्हां दरबारनें पैसा खर्च करून पाण्याची व्यवस्था करावी अशी विनंति आहे. पाण्याच्या बाबतींत असंतोष वाढूं देणें बरोबर नाहीं. तेव्हां दरबारनें पुच्छप्रगतीचें धोरण न स्वीकारतां अग्रगामी धोरण स्वीकारावें अशी विनंति आहे.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर ठराव १ विरुद्ध ७ मतांनीं नापास झाला.

## स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. ९

" जमखंडी संस्थानांतील खेड्यांतील लोकांचीं गांवठाण्यांत पेवें आहेत व नवीन पेवें उकरलीं जातात. त्याबाबत प्रत्येक खेड्यांत पेवाबद्दलचें पत्रक ठेवणेंत यावें व त्यावर नंबर घालण्यांत यावा व दर पेवास दरसाल ८८३ पै प्रमाणें आकार ठेवणेंत यावा अशाबद्दल श्रीमंत राजेसाहेबांना ही सभा विनंति करीत आहे. "

रा. ब. दिवाण:—सन्मान्य सभासदांनीं हा ठराव आणल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु " दरसाल ८८३ पैप्रमाणें आकार ठेवणेंत यावा " ह्या ठरावांतील शब्दांऐवजीं " दरसाल योग्य तो आकार ठेवणेंत यावा " असे शब्द घालावे. दरबारला ठरावाचें तत्त्व मान्य आहे.

स. स. वाटवे:—दरबारला ठरावाचें तत्त्व मान्य आहे तेव्हां माझें काम बिनमोबदल्यांत होणार आहे. यापुढें पेवास पैसे घेणार नाहींत म्हणून मी हा परत घेतों.

रा. ब. दिवाण:—पैसे घेणार नाहीं असें होणार नाहीं.

स. स. हुल्ल्याळ:—तत्त्व मान्य केल्यावर प्रश्नच उरत नाहीं. मग मोबदला घेणें किंवा न घेणें हा सरकारचा प्रश्न आहे.

रा. सा. आपटे:—या ठरावाचे दोन भाग करावे.

मे. अध्यक्ष:—तसे दोन भाग पाडतां येतात. मागें तसें केलें होतें.

स. स. सी. व्ही. आपटे:—ठरावाचे दोन भाग करण्याऐवजीं मी ह्या ठरावावर amendment सुचवितों. या ठरावांतील "व दर पेवास दरसाल ८८३ पैप्रमाणें आकार ठेवणेंत यावा" इतके शब्द काढून टाकावे. म्हणजे ठरावाचे दोन भाग करण्याचें कारण नाहीं व ठरावाच्या तत्त्वालाहि बाध येत नाहीं.

स. स. वाटवे:—मला amendment मान्य आहे.

मे. अध्यक्ष:—मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं मतें घेतां सदर दुरुस्त ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

नंतर स. स. वाटवे यांनीं आपले ठराव नं. १०-११-१२-१३-१४-१७ परत घेतले व नं. १६ चा ठराव पुढें मांडला.

**सन्मान्य सभासद पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. १६**

" जमखंडी संस्थानांत बऱ्याच ठिकाणीं चांगल्या प्रकारचे रस्ते नाहींत. तरी तसे रस्ते करण्यास खर्च काय येईल याबद्दल पब्लिक वर्क्स खात्याकडून विचार होऊन, एखादी दश-वार्षिक योजना या खात्याकडून तयार करणेंबद्दल श्रीमंत राजेसाहेबांचा हुकूम व्हावा अशी या मंडळाची श्रीमंतांना विनंति आहे."

हा ठराव मान्य करावयाला कांहीं हरकत नाहीं व आज ठिकठिकाणीं रस्ते चांगले नाहींत, तेव्हां एकंदर रस्ते तयार करण्यास किती खर्च येईल याबद्दल चौकशी करून एक दशवार्षिक योजना तयार करावी. या योजनेनुसार दरवर्षी थोडथोडे रस्ते तयार करावयाचे आहेत.

रा. सा. देवधर:—पूर्वी एकदां असा ठराव आला होता व त्या ठरावांत पांच वर्षांची योजना होती.

स. स. वाटवे:—तो ठराव मीं मांडला होता, परंतु तो पुढें आला नाहीं.

रा. सा. देवधर:—या ठरावाप्रमाणें योजना आंखावयाची झाल्यास या योजनेसाठीं ७० हजार रुपये लागतील. व येवढी मोठी स्कीम सरकारनें घ्यावयाची कीं काय व बजेटाच्या दृष्टीनें तें कितपत शक्य आहे या सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे. दिल्लीच्या रोड कॉन्फरन्सचे अध्यक्ष सर हेन्री क्लो यांनीं जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांचा या दृष्टीनें विचार होणें आवश्यक आहे. व त्यांच्या विचारांना रस्किनसाहेबांनीं पाठिंबा दिला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, हें approach Roads लोकांनीं आपल्या खर्चानें तयार केले पाहिजेत. प्रत्येक गांवच्या लोकांनीं आपआपल्या गांवचे जवळपासचे रस्ते तयार केले पाहिजेत. या योजनेनुसार बेळगांव जिल्ह्यांतील चंदनगड तालुक्यांत रस्ते तयार करण्यांत आले आहेत.

सरकारला सर्वच गोष्टी करतां येणें शक्य नाहीं, अशा वेळीं जनतेनें पुढाकार घेऊन या गोष्टी केल्या पाहिजेत. काल बजेटाच्या भाषणाच्या वेळीं आपण टीका करतांना हें बजेट अगडबंब जमेचें आहे असें म्हणालां तेव्हां आमच्या चिमकुल्या बजेटावर आपली अगडबंब मागणी असह्य होईल. आज ही आपली मागणी मान्य केल्यास उद्यां आपण प्रत्येक घरांत पाण्याचे नळ पाहिजेत असें म्हणाल. आपला हा ठराव मंजूर झाला तर तो दरबारवर बंधनकारक राहील. ह्या संस्थाननें कितपत रहावें ह्याचा विचार करून जर ठराव मांडला असतां तर बरें झालें असतें. आज रस्ते तयार केले तर उद्यां त्याच्या मेंटेनन्सची वाट काय? तेव्हां आपण या सर्व बाबींचा विचार करावा आणि मग ठरावाला मान्यता द्यावी.

स. स. वाटवेः—मी लेक्चर हॉलमध्यें बसलों आहे व मला रा. सा. मंत्री कांहीं तरी शिकवीत आहेत असा मंत्र्यांच्या भाषणानें मला भास होत आहे. मी जमखंडी संस्थानचा प्रजाजन आहें मला ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास काय करावयाचा?

रा. सा. देवधरः—लेक्चर देण्याचें मला कारणच नाहीं. आपण थोडा विचार केला असतां तर हा ठराव आणला नसता. आज अशा मोठमाठ्या योजना हातीं घ्यावयाच्या म्हणजे आपणांवर कर बसवावा लागेल.

स. स. वाटवेः—करबंदी करीन.

रा. सा. देवधरः—आपली योजना पार पाडण्यासाठीं नवीन कर बसवावे लागतील व आपणांला ते द्यावे लागतील.

स. स. सी. व्ही. आपटेः—या ठरावाला येवढा विरोध कां व्हावा हेंच समजत नाहीं. या ठरावांत रस्त्याचे बाबतींत दशवार्षिक योजना सुचविली आहे व त्या योजनेनुसार दहा वर्षांत सर्व रस्ते करावयाचे आहेत. दहा वर्षांत इतके रस्ते तयार होतील किंवा नाहीं हा पुढचा प्रश्न आहे. या योजनेसाठीं ७० हजार रुपये लागतील असें सांगण्यांत आलें. परंतु आम्ही कांहीं ॲस्फाल्टचे रस्ते मागत नाहीं व घरांत नळही मागत नाहीं; तर साध्या मुरुम-मातीचे व खडीचेच करावे. यांत अगडबंब मागणी काय आहे हें समजत नाहीं. सर हेन्री क्लोचा प्रश्न कोठें व जमखंडी संस्थानचा प्रश्न कोठे? व रस्कीनच्या उदाहरणाचा या ठिकाणीं काय उपयोग आहे? योजना म्हटली म्हणजे आपल्याकडे कांहीं विशिष्ट कल्पना करून घेतली जाते. ही कांहीं मोठी बाब आहे असें नाहीं. किंवा याला मोठमोठ्या तज्ज्ञांची जरुरी आहे असेंही नाहीं. पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटनें ठरवावयाचें कीं यांतील म्युनिसिपालिट्यांनीं किती भाग उचलावयाचा व स्वतः सरकारनें किती उचलावयाचा व त्याप्रमाणें कामास सुरुवात करावयाची आहे. यांत दरबारनें स्वतःवर मोठा बोजा घेण्याचें कारण नाहीं.

स. स. वाटवेः—यांनीं माझें बरेंचसें काम केलें आहे.

रा. सा. देवधरः—आपण गैरसमज करून घेऊं नये.

स. स. वाटवे:—गैरसमज आपण करून घेत आहांत. मीं नाहीं. आम्हांला रस्कीन व रेनाल्ड साहेबांचीं उदाहरणें देण्यांत आलीं. पण आम्हांला त्यांचा काय उपयोग? रा. सा. पुराणिक, मण्णूर हेच आमचे रेनाल्ड व रस्कीन आहेत. व त्यांच्याच मदतीनें हीं कामें व्हावयाचीं आहेत.

मे. अध्यक्ष:—हे रेनाल्ड कोण?

रा. सा. देवधर:—मी रेनाल्डच्या नांवाचा रेफरन्स केलाच नव्हता. सर हेन्री क्लो साहेब व रस्किन साहेब अशा दोघांचा माझ्या भाषणांत उल्लेख केला होता.

स. स. वाटवे:—सर हेन्री क्लो असेल किंवा रस्किन असेल किंवा आणखी कोणीही असेल. आम्हांला त्यांच्याशीं कर्तव्य काय?

मे. अध्यक्ष:—आतां चर्चा पुरे. मी हा ठराव मतास घालतों.

मे. अध्यक्ष यांनीं सदर ठरावावर मतें घेतां ठराव ९ मतांनीं बिनविरोध मंजूर करण्यांत आला. या ठरावाच्या वेळीं ९ स. सभासद तटस्थ होते.

### स. स. पांडुरंग बळवंत वाटवे यांचा ठराव नं. १८

"जमखंडी शहरांतील दारूचीं व शिंदीचीं दुकानें गांवांबाहेर न्यावींत अशाबद्दल श्रीमंत राजेसाहेब यांचा जमखंडी दरबारास हुकूम व्हावा अशाबद्दल या मंडळाची श्रीमंत राजेसाहेब यांना शिफारस आहे."

रा. ब. दिवाण:—ह्या ठरावास आमचा विरोध नाहीं.

मे. अध्यक्ष:—ह्या ठरावास कोणाचा विरोध नसल्यामुळें हा सर्वानुमतें मंजूर झाल्याचें जाहीर करतों.

### मे. अध्यक्षांचें समारोपाचें भाषण

"सन्मान्य सभासद हो, गतवर्षाप्रमाणें यंदाही कायदेमंडळाचें काम आपण शांततेनें व व्यवस्थित रितीनें पार पाडलें हें सांगावयास मला आनंद वाटतो. आपण जे प्रश्न, बिलें व ठराव आणले त्या सर्वांचा निकाल लागला आहे. आपण या ठिकाणीं येऊन जसें सहकार्य केलें तसेंच यापुढेंही या ठिकाणीं येऊन सरकारला नेहमी सल्ला द्याल अशी मला आशा आहे.

यानंतर या ठिकाणीं जे कांहीं विधायक स्वरूपाचे ठराव आले त्या बाबतींत मला दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत त्यांचा मंत्र्यांनीं अवश्य विचार करावा. कोणतीही दश-वार्षिक योजना आंखावयास कांहींच हरकत नाहीं. मग जशी सवड होईल तशी ती अमलांत येईल. रशियाचें उदाहरण आपणां सर्वांस माहित असेलच. त्या ठिकाणीं पंचवार्षिक व दशवार्षिक अशा योजना आंखूनच तेथें प्रचंड स्वरूपाची कामगिरी झाली आहे. पहिल्या पहिल्यानें या योजनांबद्दल लोकांनीं थट्टा केली होती. सांगण्याचा मुख्य मुद्दा प्रथम कोणती-तरी योजना आंखली पाहिजे. मग ती कोणतीही असो; रस्त्यांबद्दल असो, शाळांबद्दल असो, इमारतींबद्दल असो किंवा आणखी कशाबद्दलही असो. आपल्याकडे योजना तयार असल्या-

वर त्यांपैकीं आज एकादी हातीं घेतां येईल तर पुढच्या वर्षी दुसरी घेतां येईल. परंतु आरंभ केल्याशिवाय कांहींही होत नाहीं. तरी या बाबतींत मंत्री विचार करतील अशी आशा आहे. केल्या याशिवाय बाकी पुष्कळ गोष्टी करतां येण्यासारख्या आहे. त्यांपैकीं एका गोष्टीवर विशेष भर देण्यासारखा आहे आणि ती म्हणजे ग्रामोद्योग ही होय. ग्रामोद्योग आपल्याकडे सुरू आहेच. परंतु खालसा मुलखांत याचा फार प्रचार झालेला दिसतो. हा व्यापक स्वरूपाचा शब्द आहे. यांत सर्व गोष्टींचा समावेश होतो. यांत शाळा येतील, को-ऑपरेटिव्ह सोसायट्या येतील, शेती येईल, गुरांची निपज येईल; सर्व कांहीं येईल. आपण याप्रमाणें व्यवस्था केली तर संस्थानमध्यें पुष्कळ सुधारणा होईल. प्रथम सुरवातीला एक एक गांव अशा कामासाठीं घेतला पाहिजे. एकदम सर्व गांवें घ्यावयाचीं म्हटलें तर तें शक्य होणार नाहीं. या बाबतींत लोकांचें सहकार्य पाहिजे ही गोष्ट खरी; तथापि सरकारनें असा उपक्रम केला तर पाटील कुलकर्णी यांत सामील होतील. व त्यामुळें या उपक्रमाला खेडोंपाडीं अधिक चालना मिळेल. केवळ प्रदर्शनाकरितां म्हणून हा उपक्रम करावयाचा नाहीं. तर चिरस्थायी होण्याच्या दृष्टीनेंच हा उपक्रम करावयाचा आहे. यांत गुरांचीहि निपज येऊं शकते. आपल्या संस्थानांत पुष्कळ गुरें आहेत परंतु एकाद्या गाईला जास्तीत जास्त दूध किती मिळतें व तिचा खुराक वाढविला तर तिला किती दूध मिळेल याबद्दलचा कोणी विचार केला आहे काय? खरोखर असा प्रयत्न होईल तर पुष्कळ सुधारणा होईल. आपल्या संस्थानांत गुरांची उत्तम प्रकारें निपज होण्यासारखी आहे. हा एक लहानसा उद्योगच आहे. तसेंच कोंबड्यांची निपज हाही एक लहानसा उद्योग सर्वत्र खेड्यापाड्यांतून करतां येण्यासारखा आहे. सोंपीव खात्याचे मंत्री संस्थानांतून सगळीकडे फिरतात; त्यांनीं या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे; म्हणजे या गोष्टी आपोआप होतील.

यानंतर पुष्कळ मंडळींची अशी तक्रार आहे कीं, या ठिकाणीं येऊन बोलून त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. सरकारची ज्याबद्दल सहानुभूति असेल तेवढ्याच गोष्टी येथें होतात. बाकीच्या फेटाळल्या जातात. परंतु ही समजूत चुकीची आहे. मी या ठिकाणीं असेंब्लीच्या सुरुवातीपासून आतांपर्यंत ९ वर्षे येत आहे. परंतु आपण गेल्या ६ वर्षांतील परिस्थिति पहा. व अलिकडच्या तीन वर्षांतील परिस्थिती पहा. आपल्याला पुष्कळ फरक पडलेला दिसेल, आज या ठिकाणीं तर आपला लोकनियुक्त मंत्री असून, त्यांकडे बरींच खातीं दिलीं आहेत. मंत्र्याच्या हातांत दीड लाखाचें संस्थान दिल्यासारखें आहे. आज आपण चांगल्या रीतीनें कारभार चालविलांत तर उद्यां आणखीं खातीं आपल्या मंत्र्यांच्या ताब्यांत मिळतील. अर्थात् या गोष्टीला चिकाटी पाहिजे.

यानंतर मी दुसऱ्या एका गोष्टीकडे सन्मान्य सभासदांचें लक्ष वेधूं इच्छितों. स. स. वाटवे यांचें दरसाल असें म्हणणें असतें कीं, परस्थ लोक येथें येतात व त्यामुळें संस्थानचा बराचसा पैसा बाहेर जातो. परंतु बाहेरचे लोक येथें कां आणले जातात याचा सन्मान्य सभासदांनीं विचार केला आहे काय? गेल्यावर्षी स्थानिक-परस्थ वादासंबंधीं बराच उहापोह

झाला होता. व त्यावेळीं या बाबतींत मी मोघम शब्दांत सांगितलें होतें. परंतु आज पुन्हां त्याबाबत बोलण्याचा प्रसंग आला आहे. आज या ठिकाणीं परस्थ असे दोन अंमलदार आहेत. एक दिवाणसाहेब व दुसरे पोलिस ऑफिसर. पोलिस ऑफिसरसाहेब नुकतेच आलेले आहेत. परंतु सध्यां जे दिवाण आहेत ते आल्यापासून आपल्या संस्थानांत कांहींच सुधारणा झाल्या नाहींत काय ? प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें त्यांनीं कांहींच काम केलें नाहीं काय ? यावर आपण कदाचित् असेंहि म्हणाल आमच्याकडेहि तशीं लायक माणसें आहेत. परंतु या बाबतींत संस्थानशीं ज्या माणसांचा कांहीं संबंध नाहीं अशींच माणसें अशा वरच्या जागांवर असणें अधिक बरें असें मला वाटतें. या वरच्या जागा अशा आहेत कीं त्या-ठिकाणीं अनेक मोहाचे प्रसंग येतात. तेव्हां असे मोहाचे प्रसंग टाळण्याची जितकी परस्थ माणूस पराकाष्ठा करील तितकी स्थानिक माणसाच्या हातून होणें शक्य नाहीं. म्हणून ह्या दोन जागांवर बाहेरचेच अम्मलदार असणें हितावह आहे. शिवाय इतर जागा आपल्यांतील योग्य व लायक माणसांना मिळतच आहेत. न्यायमंत्र्यांच्या जागेवर श्रीमंतांनीं आपल्या-पैकींच माणसाची योजना केली ना ? येथें सध्यां इंजिनियर्स आहेत ते येथील रहिवाशीच ना ? याशिवाय या वरिष्ठ जागांवर बाहेरचीं माणसें आणण्यांत दुसरा एक मतलब असतो. तो हा कीं, श्रीमंतांचे व दिवाणसाहेबांचे मतभेदाचे प्रसंग अनेक नेतात. अशा वेळी गांवचा माणूस दिवाण-पदावर असला तर तो श्रीमंतांना स्पष्ट शब्दांत आपला सल्ला सांगू शकेल काय ? आणि तसें सांगणारा टिकेल काय ? परंतु ज्यावेळीं असे मतभेदाचे प्रसंग येतील व अशावेळीं बाहेरचा दिवाण असला आणि त्याला वाटलें कीं, आपला अकारण मतभेद होत आहे; तर तो नोकरी सोडून निघून जाईल. परंतु अशा वेळीं गांवचा माणूस त्या जागेवर असला आणि मतभेदाचा प्रसंग आला तर तो कोठें जाईल ? त्याला गांवांत राहणेंसुद्धां शक्य होणार नाहीं. ज्याच्यावर श्रीमंतांची मर्जी नाहीं त्याला गांवांत राहणें सोपें नाहीं. म्हणून अशा वेळीं बाहेरचीं माणसें असणें श्रेयस्कर असतें. शिवाय ही मंडळीं पेन्शनर असतात व त्यामुळें त्यांना थोडक्या पगा-रांत काम करण्यास परवडतें.

दुसरें असें सांगण्यांत येतें कीं, बाहेरचा दिवाण असला म्हणजे तो श्रीमंत राजासाहे-बांना बरोबर सल्ला देत नाहीं. परंतु हा गैरसमज आहे. कारण दिवाणांचें कांहीं म्हणणें असलें तरी अखेरचा निर्णय घेण्याचा अधिकार श्रीमंतांचाच असतो. अर्थात् माझें हें म्हणणें आपणाला पटेलच असें नाहीं, किंवा तें पटलेंच पाहिजे असा माझा आग्रहही नाहीं.

यानंतर अलीकडे देशांत जी दंगल चालली आहे, त्यापासून आपली प्रजा अलिप्त राहील असा प्रयत्न सर्व सन्मान्य सभासदांनीं केला पाहिजे. आपणांवर प्रजेचा विश्वास आहे. आपणहि प्रजेला आपल्या विश्वासांत घेतलें पाहिजे. हुल्लड करून स्वराज्य मिळालें आहे असें ऐकिवांत नाहीं. दंगेधोपे करून स्वराज्य मिळणार नाहीं. अशानें आमचीं डोकीं मात्र फुट-णार आहेत, हें प्रजेला आपण पटवून दिलें पाहिजे. आपल्या संस्थानची कीर्ति वाढवावयाची असेल तर शांतता ठेवून व चिकाटी धरून कार्य केलें पाहिजे. यापेक्षां अधिक मला कांहीं

सांगावयाचें नाहीं. शेवटीं श्रीमंतांचे व आपणां सर्वांचे आभार मानून आणि श्रीमंतांना आयुरारोग्य चिंतून मी माझें भाषण संपवितों.

स. स. सोहनीः—ता. १८ ते २१ अखेर चार दिवस आपल्या कौन्सिलच्या अधिवेशनाचें काम चांगल्या रीतीनें पार पडलें आहे, याबद्दल आनंद वाटतो. या अधिवेशनांत आमचे कांहीं सहकारी बंधू उपस्थित राहूं शकले नाहींत व त्यामुळें त्यांचें सहकार्य आपल्याला मिळालें नाहीं याबद्दल थोडेसें वाईट वाटतें. ते उपस्थित राहून जर जनतेचें हित साधूं शकलें असतें तर फार उत्तम झालें असतें. अधिवेशनाच्या सुरुवातीस आज या ठिकाणीं minority मध्यें जो पक्ष आहे त्या पक्षाच्या Unity च्या अभावीं त्यांचा गैरवाजवी फायदा घेतला जाईल असें वाटत होतें; तथापि तसा फायदा घेतला गेला नाहीं याबद्दल आनंद वाटतो; व ही गोष्ट दरबारलाहि भूषणावह आहे. यानंतर सांगावयाचें म्हणजे आमचा योगायोग होता म्हणून आम्हांला यावर्षीहि अध्यक्ष म्हणून रा. ब. बाळ हे लाभले आहेत. श्रीमंतांनीं त्यांचे अंगचे गुण पाहूनच त्यांना पुन्हां अध्यक्ष म्हणून निवडलें आहे. रा. ब. बाळ यांनीं नेहमींप्रमाणें आपलें काम सभतोल रीतीनें केलें याबद्दल मी लोकपक्षातर्फे त्यांचे आभार मानतों. दरबारच्या मंडळींनींहि लोकपक्षांशीं जें सहकार्याचें धोरण ठेविलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. यापुढेंहि लोकपक्ष जास्तीत जास्त आपल्याजवळ येईल असें उदार धोरण दरबारनें ठेवावें अशी दरबारला विनंति आहे. यानंतर जमखंडी संस्थान अखिल महाराष्ट्रांत आदर्श होवो अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझें भाषण संपविता.

रा. सा. पटवर्धनः—खरोखर अधिवेशन सुरु व्हायच्यापूर्वी—एका पक्षानें आम्हीं आगामी अधिवेशनांत भाग घेऊं शकत नाहीं अशी नोटीस दिल्यानें—हें अधिवेशन पहिल्या एक दोन दिवसांतच संपतें कीं काय अशाबद्दल आम्हीं साशंक होतों. परंतु आनंदाची गोष्ट अशी कीं, आगाऊ ठरल्याप्रमाणें या अधिवेशनाचें काम चार दिवस चालून हें अधिवेशन संपत आहे. तथापि याचें सर्व श्रेय स. स. वाटवे यांनाच दिलें पाहिजे. कारण यावेळीं दुसरा पक्ष उपस्थित नसल्यामुळें लोकपक्षाचा भार स. स. वाटवे यांच्यावरच पडला व त्यांनीं तो चांगल्या रितीनें पार पाडला याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. यावेळीं दुसरा पक्ष नसला तरी लोकपक्षातर्फे प्रजेची बाजू चांगल्या रीतीने मांडली गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें रा. सा. देवधर यांनीं त्यांचें अधिकारक्षेत्र Limited असतांही जी कामगिरी केली आहे ती वाखाणण्याजोगी आहे. त्यांनीं आपल्या अधिकारक्षेत्रांत जेवढें करतां येणें शक्य होतें तेवढें कार्य केलें आहे. मध्यंतरी ज्या ज्या वेळीं कायद्याचा प्रश्न आला त्या त्या वेळीं मे. अध्यक्षांनीं निर्णय देण्याचा अधिकार मंडळाला दिला ही गोष्ट अभिनंदनीय अशी आहे. कायदा करतांना त्याच्या अम्मलबजावणीच्या दृष्टीनें पुढें काय काय अडचणी येतील याची कांहीं कल्पना नसते. प्रत्यक्ष अम्मलबजावणीच्या वेळीं मात्र बऱ्याच अडचणी येतात. आपल्या नवीन सुधारणा कायद्याचें बाब-

तींतही तसाच प्रकार घडला आहे. तथापि प्रत्यक्ष कामकाजाच्या दृष्टीनें ज्या अडचणी आल्या आहेत त्यांची नोंद करून ठेवण्यांत आली असून त्या श्रीमंतांच्या कानांवर घालण्यांत येतीलच.

यानंतर कांहीं लोकांचें म्हणणें असें असतें कीं या ठिकाणीं येऊन प्रजेचें हित साधतां येत नाहीं; परंतु तें म्हणणें चुकीचें आहे. या संस्थानचें उत्पन्न कमी असल्यामुळें डोक्यांत ज्या कल्पना येतील त्या तशाच सर्व कृतींत आणतां येणें शक्य नाहीं. तथापि मला व्यक्तिशः सांगावयास अभिमान वाटतो कीं, आम्हीं सर्व दरबारची मंडळी प्रजेच्या हिताच्या दृष्टीनेंच एकंदर धोरण आंखण्याचा प्रयत्न करीत असतो. आपले मे. अध्यक्ष यांचाही कल नेहमीं लोकपक्षाकडेच असतो. तेव्हां आपण या सर्व गोष्टींचा सारासार विचार केला पाहिजे. आपण दरबारच्या अडीअडचणीकडे सहानुभूतीनें पाहिलें पाहिजे.

यानंतर मे. अध्यक्ष रा. ब. बाळ यांनीं इतक्या उतार वयांतहि या ठिकाणीं येऊन आम्हांला मदत केली याबद्दल त्यांचेही दरबारतर्फे मी आभार मानतों व त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझें भाषण संपवितों.

मे. अध्यक्ष:—आपण माझे आभार मानले त्याबद्दल मी आपला आभारी आहें; व आतां हें अधिवेशनाचें काम संपल्याचें मी जाहीर करतों.

# परिशिष्ट नं. १

हुजूर ऑफिस जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ४८
सन १९४२ इसवी.

## दप्तरी हुकूम.

जमखंडी संस्थानच्या राज्यकारभाराबाबतचा १९४० इ. चा कायदा नं. २ कलम ३९ अन्वयें जाहीर करणेंत येतें कीं, जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचें सन १९४२ इ. सालचे अधिवेशनाची बैठक जमखंडी येथें परशुरामभाऊ हायस्कूलचे असेंब्ली हॉल-मध्यें मंगळवार ता. १८ माहे ऑगस्ट सन १९४२ इ. पासून शुक्रवार ता. २१ माहे ऑगस्ट सन १९४२ इ. अखेर चार दिवस भरविण्याचें मुक्रर करण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख २७ माहे जून सन १९४२ इ.

S. A. Patwardhan.
राजे सं॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी
हुजूर दप्तरी हुकूम नं. ६९
सन १९४२ इसवी

## दप्तरी हुकूम

जमखंडी संस्थानचा राज्यकारभाराबाबतचा सन १९४० इसवीचा कायदा नंबर २ कलम ३३ अन्वयें जाहीर करणेंत येतें कीं, रावबहादूर रामचंद्र केशव बाळ, B. A.,LL. B. ( रिटायर्ड स्मॉलकॉज जज्ज पुणें व माजी दिवाण जमखंडी ) यांना सन १९४२ इ. सालचे कायदेमंडळाचे अधिवेशनाचे मुदतीपुरतें कायदेमंडळाचे जादा सभासद म्हणून नेमणेंत आलें आहे व त्यांनीं चालू सालचे कायदेमंडळाचे अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून काम पाहाणेचें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १० माहे ऑगस्ट सन १९४२ इ.

S. A. Patwardhan.
राजे सं॥ जमखंडी.

हुजूर ऑफिस जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ७०
सन १९४२ इसवी.

## दप्तरी हुकूम.

चालू सालचें जमखंडी संस्थानचें प्रातिनिधिक कायदेमंडळाचें अधिवेशन ता. १८ ते ता. २१ माहे ऑगस्ट सन १९४२ इ. अखेर चार दिवस भरणेचें आहे. सबब कायदेमंडळांतील सरकारी सभासदांमध्यें कायदेमंडळाच्या कामापुरती निरनिराळया राखीव व सोंपीव खात्याची विभागणी कामाच्या सोयीच्या दृष्टीनें होणें इष्ट व अवश्यक असल्यानें व रावसाहेब भास्कर बहिरव महाबळ, B. A., LL. B., न्यायमंत्री, यांनीं आपली प्रकृति बरी नसल्यानें, चालू अधिवेशनांत काम करणें शक्य नसल्यानें सरकारी सभासदत्वाचा राजीनामा दिल्यानें त्याजागीं रावसाहेब वामन त्र्यंबक आपटे, M. A., LL. B., न्यायाधीश जमखंडी, यांची चालू सालचे अधिवेशनापुरती नेमणूक करण्यांत येऊन, खालीलप्रमाणें कामाची विभागणी करणेंत आली आहे:—

| | |
|---|---|
| १ रावबहादूर दिवाण:— | रेव्हेन्यू, फायनॅन्स, अबकारी, रिसाला, बॉडीगार्ड पोलीस, देवस्थान धर्मादाय, प्रेस, पोलिटिकल खातें, व अकौंटंट जनरल खातें, व खाली दिले सभासदांमध्यें विभागलेल्या खात्यांव्यतिरिक्त इतर सर्व खातीं. |
| २ रावसाहेब मंत्री ( सोंपीव खातीं ):— | जमखंडी ॲक्ट सन १९४० इ, चा दुसरा यांत निर्दिष्ट केलेलीं खातीं. |
| ३ रावसाहेब सरन्यायाधीश:— | न्यायखातें, व हुजुर रेकॉर्ड व ट्रेझरी ऑफिसर या नात्यानें रावबहादूर दिवाण यांना मदत करणें. |
| ४ रावसाहेब न्यायाधीश:— | रावबहादूर दिवाण व रावसाहेब सरन्यायाधीश या उभयतांचे कामीं मदत करणें. |
| ५ रावसाहेब स्टेट इंजिनियर:— | पब्लिकवर्क्स खातें ( राखीव भाग ) |
| ६ रावसाहेब स्टेट मे. इंजिनियर:— | स्टेट मेकॅनिकल खातें, वॉटरवर्क्स खातें. व्यापार, उद्योग धंदे वगैरे. |
| ७ रावसाहेब खासगी मे. इंजिनियर:— | रावसाहेब स्टेट मे. इंजिनियर यांना त्यांचे कामीं मदत करणें. |

तसेंच कायदेमंडळाचे कामाकरितां रावबहादूर दिवाण यांस सभागृहाचे नेते ( Leader of the House ) नेमणेंत आलें आहे. त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १० माहे ऑगस्ट सन १९४२ इसवी.

S. A. Patwardhan.
राजे सां। जमखंडी.

हुजूर ऑफिस, जमखंडी.
हुजूर दप्तरी हुकूम नं. ७१
सन १९४२ इसवी.

चालूं सालचे जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे अधिवेशनांत, सरकारी सभासद रावसाहेब भास्कर बहिरव महाबळ, न्यायमंत्री जमखंडी यांनीं आपली प्रकृति बरी नसल्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला असल्यानें त्यांचे रिकामे झाले जागीं रावसाहेब वामन त्रिंबक आपटे, M, A., LL. B., न्यायाधीश जमखंडी, यांची नेमणूक अलाहिदा दप्तरी हुकूम नं. ७० सन १९४२ इ. नें झाली असल्यानें त्यांचेकडील अधिवेशनाचें सेक्रेटरीचें काम चालूं अधिवेशनापुरतें ता. १८ ते ता. २१ माहे ऑगस्ट सन १९४२ इ. अखेर चार दिवस रावसाहेब गोपिनाथ विठ्ठल त्रिकेकर, मामलेदार व पर्सनल असिस्टंट टु दिवाण जमखंडी, यांनीं पाहाणेचें आहे, त्याप्रमाणें अम्मल होणेचा.

तारीख १० माहे ऑगस्ट सन १९४२ इसवी.

S. A. Patwardhan
राजे सं॥ जमखंडी.

हा अहवाल पुणें, पेठ भांबुर्डा, घ. नं. ९१५।१ येथें रा. रा. **विठ्ठल हरि बर्वे** यांनीं
आर्यभूषण मुद्रणालयांत छापला व तो जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे
सेक्रेटरी, रा. सा. **वामन त्र्यंबक आपटे**, एम्. ए., एलएल. बी.,
यांनीं जमखंडी येथें प्रसिद्ध केला.